# राष्ट्रवादी

## अनुक्रमणिका


**4**

सुरुवातीचे– **तयारीला लागा**

**– जयंत पाटील**

**5**

प्रबंध संपादकीय– **कार्यकर्त्यांची पाऊले**

**– दिलीप वळसे पाटील**



**6**

संपादकीय– **संशयी विजय**

**– डॉ. सुधीर भोंगळे**

**10**

प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस बैठक,मुंबई,भाषणे

१) आगामी विधानसभा निवडणुकीत तरुणांना संधी द्या

**- शरद पवार**



२) विधानसभेसाठी कार्यकर्त्यांनी ताकदीने काम करावे.

**– जयंत पाटील– १७**

३) विधानसभेसाठी अधिक जोमाने कामाला लागू या

**– अजित पवार– २४**



४) सोशल मीडियावर टार्गेट ओरिएंट ॲप्रोच हवा

**– डॉ. अमोल कोल्हे– २८**

**30**

जलयुक्त शिवार विदारक वस्तुस्थिती

**– डॉ. सुधीर भोंगळे**



**44**

शरद पवार : दुष्काळी दौरा

काळ कठिण आहे, मात्र आपण हरायचं नाही

**– शरद पवार**



**50**

जनादेश २०१९ अन्वयार्थ

**– आकाश – ५०**



**56**

चैत्रपालवी २०१९, बारामती, भाषणे–

१) शेतीत बदल करा, जीवनमान बदलेल

**शरद पवार– ५८**



२) खाता न येणारे पिकवा

**– विजय बोराडे – ६८**

३) शेतीकडे व्यावसायिक दृष्टीने पहा

**– राजेंद्र पवार– ७४**

४) शेतीच्या ज्ञानाचा कण कण गोळा करा

**– डॉ.सुधीर भोंगळे– ८०**



५) शेतीसाठी संघटित व्हा, टेक्नालॉजी वापरा

**– रोहित पवार– ८४**

**90**

मोदींचे मंत्रिमंडळ-२०१९, गुणवत्तेचे अभाव

**– तथागत**



**96**

आर्थिक आव्हानांची कसोटी

**– गहिनीनाथ**



**102**

शेवटचे पान–

भीती स्वातंत्र्याच्या गळचेपीची

**– हेमन्त टकले**





संचालक
**हेमन्त टकले**

प्रबंध संपादक
**दिलीप वळसे पाटील**

संपादक
**डॉ. सुधीर भोंगळे**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

कला निर्देशन
धनंजय सस्तकर

सजावट व मांडणी
दिलीप रोडे

छायाचित्रे
प्रशांत चव्हाण

वर्गणीचे दर–
**वार्षिक रु. ५००/–**

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

मुद्रक, प्रकाशक
**हेमन्त प्रभाकर टकले यांनी**
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.

संपादक–
**डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे**

# तयारीला लागा!

लोकसभा निवडणुकीत यावेळी आपल्या पक्षाच्या वाट्याला 21 जागा आल्या होत्या. त्यातल्या दोन जागा आपण समविचारी मित्रपक्षांसाठी सोडल्या होत्या. त्यातली एक जागा आपण जिंकू शकलो. एका जागी मात्र मित्र पक्षाचे उमेदवार पराभूत झाले. आपण घड्याळ या चिन्हावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे अधिकृतपणे महाराष्ट्रात 19 जागांवर उमेदवार उभे केले होते. त्यातले बारामती, सातारा, शिरुर आणि रायगड या चार जागांवर अनुक्रमे सौ. सुप्रियाताई सुळे, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, डॉ. अमोल कोल्हे आणि आपल्या पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुनिल तटकरे हे प्रचंड बहुमताने विजयी झाले. त्यांना विजय मिळवून देण्यासाठी पक्षाचे असंख्य नेते, कार्यकर्ते व मतदार जनता यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल सर्वांचे मी मनापासून आभार मानतो व विजयी खासदारांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. पराभव झालेल्या उमेदवारांनीही नाराज न होता व खचून न जाता पुन्हा कंबर कसून तयारीला लागावे व जनतेत रोज मिसळून त्यांची सेवा करुन विश्वास संपादन करावा अशी आग्रहीपणे विनंतीही करतो. या निवडणुकीत आपल्याला अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून कार्यकर्त्यांनी नाराज होऊ नये. चित्ताचे समत्व कायम ठेवून मनाचा समतोल राखण्याची हातोटी साधावी असे नम्रपणे सुचवितो.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला महाराष्ट्रात 10 ते 12 जागांवर विजय मिळेल असा आपला सर्वांचा अंदाज होता. मोदी आणि भाजपा यांना फारसे अनुकूल असे वातावरण नव्हते. लोक मोठ्या संख्येने सरकारच्या विरोधात होते. ग्रामीण भागातील जनता व विशेषतः शेतकरी वर्ग सरकारच्या निर्णय व चुकीच्या धोरणांमुळे पूर्णपणे उध्वस्त झालेला असल्यामुळे त्याच्या मनात संतापाची व अस्वस्थपणाची भावना होती. ती मतदानात व्यक्त होईल असा सर्वांचाच अंदाज होता. अनेक टिकाणी तसा तो व्यक्त झालाही. पण ईव्हीएम मशिनने या संतापाला परिवर्तनाचे रुप दिले आणि जनतेच्या मनातला उद्रेक हा लाभदायक मतांच्या पारड्यात रुपांतरीत केला अशी चर्चा आता जाहीरपणे होऊ लागली आहे. एक प्रकारे मतदान यंत्रावरचा अविश्वास सर्वत्र व्यक्त होत आहे.

अमेरिकेसारख्या अत्यंत प्रगत व बलाढ्य लोकशाही देशात आणि इंग्लंडसारख्या विकसीत राष्टमध्ये देखील निवडणुका या मतपत्रिकेच्या आधाराने घेतल्या जात आहेत. मग आपणच भारतात मतदानासाठी यंत्रे कशाकरिता वापरीत आहोत असा प्रश्न जनता व कार्यकर्ते जाहीरपणे विचारु लागले आहेत. देशातील सर्व विरोधी पक्षांनी देखील सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करुन निवडणुका मतपत्रिकांवर घ्याव्यात. त्यासाठी ईव्हीएम यंत्रे वापरु नयेत अशी भूमिका घेतली होती. परंतु न्यायालयही सरकारच्याच ओंजळीने पाणी पीत असल्यामुळे त्यांनी विरोधकांचा आवाज दाबून टाकला. याचा जो काही परिणाम व्हायचा होता तो झाला आहे. लांड्यालबाड्या करुन व जनतेच्या डोळ्यात धूळ फेकून सत्ताधाऱ्यांनी सरकारी यंत्रणांचा पुरेपूर वापर करुन यश पदरात पाडून घेतले आहे.

पण माझी कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे. या पराभवाने खचू नका, नाराज होऊ नका. अपयश ही यशाची पहिली पायरी असते असे म्हणतात. या पराभवापासून आपण काही धडा घेऊन पक्ष पुन्हा मजबुतीने उभा करण्याच्या कामाला लागूया. त्यासाठी बूथ बांधणीकडे लक्ष देवूया. अगदी तळापासून वरपर्यंत पक्की बांधणी आपण करु शकलो आणि प्रत्येक कार्यकर्त्यांने आपल्या वॉर्डातील, भागातील एक हजार मतदारांची व्यवस्थितपणे काळजी घेऊन, त्यांना अडीअडचणीत मदत केली तर आगामी विधानसभेच्या निवडणुकीत आपण विजय निश्चित मिळवू शकू असा मला विश्वास आहे. मनाचा समतोल राखत, बुद्धीचे ऐक्य ठेवून आपण निःस्वार्थी व निरपेक्ष मनाने जनता जनार्दनाची सेवा केली तर त्यांचा आपल्यावरील विश्वास व श्रद्धा निश्चित वृद्धींगत होईल आणि मग तो कसल्याही प्रलोभनाला किंवा खोट्या प्रचाराला बळी न पडता तुमच्या कामावर मतदानातून विश्वासाची मोहोर उमटवेल याबद्दल खात्री बाळगा. वेळ फार थोडा आहे. विधानसभेच्या निवडणुका उंबरठ्यावर उभ्या आहेत. रात्र वैऱ्याची आहे. कार्यकर्त्यांनो सावध राहा आणि विजयासाठी कंबर कसून तयारीला लागा एवढीच विनंती करतो.

**सुरुवातीचे**




# कार्यकर्त्यांची पाऊले

या वेळच्या लोकसभा निवडणुकीत आपल्या पक्षाला मनासारखे यश मिळाले नाही ही आपल्या सर्वांच्या मनातली खंत आहे. जय-पराजय, यश-अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विजयाने उन्मादी व्हायचे नसते आणि पराभवाने खचून जायचे नसते हेच आजपर्यंत आपण पूर्वजांकडून शिकत आलो आहोत. त्यामुळे यावेळचा हा पराभव आपल्याला नवीन आहे अशातला काही भाग नाही. पराभव झाला याचा अर्थ आपण कामात कुठे तरी कमी पडलो आणि जनतेच्या चरणी पुरेपूर सेवा रुजू करुन विश्वास संपादित करु शकलो नाही ही वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे. झालेल्या चुका दुरुस्त करुन व राहिलेल्या उणीवा भरुन काढून पुन्हा एकदा विश्वास संपादन करण्याच्या मार्गावरचा प्रवास सुरु केला पाहिजे. यासाठी कार्यकर्त्यांचा उत्साह, उमेद आणि जिद्द कायम मजबुतीने उभी राहिली पाहिजे. अमेरिकेच्या बॉम्बफेकीनंतर बेचिराख झालेला व्हीएतनाम जसा राखेतून उभा राहिला तितकी तर दुर्दशा आपली झालेली नाही. आपल्याला मा. श्री. शरद पवार यांच्यासारखे दूरदृष्टीचे, अभ्यासू, खंबीर नेतृत्व लाभलेले आहे. गेली 55 वर्षे अव्याहतपणे राजकारण व समाजकारण असलेल्या पवार साहेबांचे मार्गदर्शन ही आपल्या दृष्टीने अत्यंत जमेची बाजू आहे. वयाच्या 80 व्या वर्षात ते आता लवकरच पदार्पण करणार आहेत. या वयातही त्यांची कामाची जिद्द, उमेद व धैर्य वाखाणण्यासारखे आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल प्रतिकूल लागलेला असताना 23 मे ला दुपारीच पत्रकार परिषद घेऊन त्यांनी जनतेचा कौल मोठ्या मनाने स्वीकारीत असल्याचे मान्य केले आणि दुसऱ्या दिवशीपासून रणरणत्या उन्हात 45 डीग्री तापमानात ते दुष्काळात सापडलेल्या जनतेची सेवा करण्यासाठी, विचारपूस करण्याकरिता बाहेर पडले. याला काय म्हणायचे! निस्सीम निःस्वार्थ सेवेचा हा आदर्श आपण सर्वांनी कायम मनाशी बाळगून त्यांच्या मार्गदर्शनानुसार विचारांची वाटचाल केली पाहिजे.

विचारांचा पराभव हा शेवटी विचारांनीच करायचा असतो. जातियवादी व धर्मांध शक्तींशी लढताना आपल्याला वैचारिक लढाई करावी लागणार आहे. त्यासाठी अभ्यास करावा लागेल. मनाच्या धारणा स्वच्छ कराव्या लागतील. मनाचे समत्व राखून सगळ्यांना आपल्यात सामावून घ्यावे लागेल.

मनाची समज फार विलक्षण असते. कधी कधी आपल्या हातून काय घडते ते आपले आपल्यालाच कळत नाही. याचा अर्थ देहाचा ताबा मनाने घेतलेला असतो. मन हे प्रचंड शक्तीचा साठा आहे. काही वेळा शारीरीक क्षमतेपेक्षाही मनाची क्षमता मोठी असते. प्रख्यात वैज्ञानिक व अणुशास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी असे म्हटले आहे, "आत्मज्ञानविषयक दृष्टीकोन निर्माण होत नाही. केवळ विज्ञान हे आत्मज्ञानाशिवाय लंगडे आहे. आत्मज्ञानाचा विचार लक्षात घेण्यासाठी मन जितके आवश्यक आहे तितके आत्मज्ञान गरजेचे आहे." माणसाच्या अपेक्षा, गरजा व विचार रोज बदलत असतात. ते नित्यनूतन प्रवाही असतात. काळाप्रमाणे बदलणे हा समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीचा मार्ग मानला जातो. त्यामुळे सर्व क्षेत्रातली परिवर्तने ही स्वागतार्ह व स्वीकारार्ह मानली जातात. आपला कार्यकर्ताही काळाप्रमाणे परिवर्तनवादी व पुरोगामित्वाची कास धरणारा असला पाहिजे. जनतेच्या सुप्त इच्छा व आकांक्षा जाणून घेऊन त्याप्रमाणे तो स्वतःला परिवर्तीत करु शकला पाहिजे. जनतेच्या सेवेसाठी मी कार्यतत्पर आहे हा विश्वास कार्यकर्त्याला कामातूनच उभा करावा लागणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांना सामोरे जाताना आपला कार्यकर्ता हा जात, धर्म, संप्रदाय, लिंग भेद, वर्णवर्चस्व, जुन्या चालिरीती व परंपरा या सगळ्या बाजूला सारुन नवविचारांनी व परिवर्तनशील धोरणांची कास धरुन उभा राहिला पाहिजे. त्याची प्रत्येक कृती व प्रत्येक पाऊल हा समाज, देश आणि समोरच्या माणसाचे कल्याण याच उदात्त हेतूने पडले पाहिजे. तरच जनतेचा विश्वास, प्रेम आपण संपादित करु शकणार आहोत. आपल्या कामाला निरपेक्ष सेवेची व निःस्वार्थ वृत्तीची जोड असेल तर तो कार्यकर्ता जनतेच्या हृदयात कायमचे घर करुन राहतो. लोक त्याच्याकडे मोठ्या आशेने पाहतात. त्याला पाहिजे ती मदत करतात. त्याने एक पाऊल टाकले तर समाज दोन पावले टाकतो. हाच माझा आजपर्यंतचा अनुभव आहे.



**प्रबंध संपादकीय**



राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!

# संशयी विजय

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष पुन्हा म्हणजे 2019 च्या लोकसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवून सत्तेवर आला आहे. हे बहुमत श्री. मोदी यांना मिळेल असे यावेळी कोणालाही वाटत नव्हते. तसे लोक जाहीरपणे बोलून दाखवित होते. कारण 2014 ते 2019 हा मोदींचा सत्तेचा पहिला कटू काळ जनतेने अनुभवला होता. समाजातला कोणताही घटक या सरकारच्या कामावर खूष नव्हता. किंबहुना नाराजीच प्रचंड होती. याला कारण मोदींनी जे अनेक धाडसी पण चुकीचे व विध्वंसक स्वरुपाचे निर्णय घेतले ते कारणीभूत होते. नोटाबंदी, जीएसटी यांसह अनेक निर्णयांची झळ समाजातल्या प्रत्येक घटकाला बसून त्याचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यामुळे प्रत्येकजण मोदी यांच्याविरुद्ध बोलत होता. भाजपातले वरिष्ठ नेतेही खासगीत बऱ्याच काही गोष्टी सांगत होते. मोदींचा मनमानी कारभार व हुकूमशाही कुणालाच पसंत नव्हती. 2014 च्या निवडणुकीत जी असंख्य आश्वासने मोदी आणि त्यांच्या पक्षाने जाहीरनाम्यातून व जाहीर सभांमधून दिली होती त्यातले एकही आश्वासन त्यांनी पाच वर्षे सत्ता मनमुराद भोगूनही पूर्ण केले नाही. त्यामुळे जनतेच्या मनात हा 'खोटारडा पंतप्रधान' आहे आणि 'खोटं बोल पण रेटून बोल' ही भाजपची लाईन चालविणारा आहे, यावर ठाम श्रद्धा होती. मग असे वातावरण असतानाही मोदींना व भाजपला एवढे घवघवीत यश कसे मिळाले असा प्रश्न आज अनेकांना पडलेला आहे.

प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने, सोयीसोयीने, विचारांच्या कुवतीनुसार, उपलब्ध माहितीच्या आधारे (मग ती पूर्ण-अपूर्ण कशी का असेना) या विजयाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत आहे. यात बहुसंख्य लोकांमध्ये एकवाक्यता आहे ती म्हणजे, हा विजय सत्याचा नाही. लांडीलबाडी, कारस्थाने, क्लृप्त्या करुन व सगळी सरकारी यंत्रणा वेठीला धरुन व त्यांना वाकवून अनियतीच्या मार्गाने हा विजय मिळविलेला आहे. आता आपण लोकशाही मानत असल्यामुळे सारेचजण "जनतेचा कौल आम्हाला मान्य आहे" असे वरवरपणे व तोंड देखलेपणाने म्हणतात पण हृदयातल्या आतल्या आवाजाशी प्रामाणिक राहून सांगा असे विचारले तर "या निकालात काळेबेरे आहे. यावर आमचा विश्वास नाही" असे मनमोकळेपणाने कबूल करतात. आता पाच वर्षे मोदींची सत्ता अबादित आहे. प्रचंड बहुमताचे कवचकुंडल त्यांना प्राप्त झालेले असल्यामुळे आणखीन काय काय प्रताप ते घडविणार आहेत या विचारांनीच जनता अगोदरच दिग्मूढ झालेली आहे. अल्पसंख्य समाज तर भयभीत झालेला आहे. पहिल्या पाच वर्षात त्याने जे काही सोसले त्यामुळे तो अगोदरच गारठून गेलेला होता. या निकालाने तर तो गर्भगळीत व अधिक असुरक्षित व त्यामुळे अधिक संघटित होण्याच्या मागे लागला आहे.

या निवडणुकीत प्रचाराची पातळी

## संपादकीय



अत्यंत खालच्या दर्जाची होती. पंतप्रधान मोदींच्या वागण्या-बोलण्यामुळेच तिला ही अवकळा प्राप्त झाली होती. मालेगावच्या बॉम्बस्फोटात आरोपी असलेल्या आणि या कृत्याबद्दल जवळपास दहा वर्षे तुरुंगवास भोगून जामीनावर सुटलेल्या साध्वी प्रज्ञेला जेव्हा भोपाळमधून भाजपने निवडणुकीची उमेदवारी दिली तेव्हाच मोदींना या देशात धार्मिक उन्माद माजवायचा आहे आणि हिंदू-मुस्लिम अशी उघडपणे विभागणी करुन हिंदू बहुसंख्यांकांचे तूप आपल्या पोळीवर ओढून घ्यायचे आहे हे चाणाक्ष जनतेच्या नजरेतून सुटले नव्हते. खरं तर याही अगोदर म्हणजे पुलवामा-बालाकोट हल्ल्यानंतर त्यांनी जो धार्मिक रंग या घटनेला दिला होता त्यावरुन जनतेच्या मनात अगोदरच जी शंकेची पाल चुकचुकली होती ती खरी ठरत होती. मनसेचे राज ठाकरे यांनी अगोदरच या घटनेचे सुतोवाच केले होते. साध्वी प्रज्ञा ठाकूर यांनी नथुराम गोडसे याने महात्मा गांधींजींच्या केलेल्या खुनाचे ज्या शब्दात समर्थन व उदात्तीकरण केले त्यावेळी स्वतःला गांधींच्या गुजरात भूमीचा सुपुत्र म्हणवून घेणाऱ्या, गांधी विचारांचा पूजक आहे असा डांगोरा पिटणाऱ्या मोदींची भूमिका व प्रतिक्रिया किती वरवरची, दांभिक, ढोंगी आणि जनतेला मूर्ख बनविणारी होती हे कोणाला कळत नाही अशातला भाग नाही.

खरं तर ज्या निकष व नियमांच्या आधारे हार्दिक पटेल याला गुजरातमधून लोकसभा निवडणूक लढवायला सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोगाने बंदी घातली तोच न्याय आणि निकष त्यांनी साध्वी प्रज्ञा यांना लावून निवडणूक लढवायला बंदी करायला हवी होती. परंतु सत्तेपुढे कुणाचे शहाणपण चालत नाही असे जे म्हणतात तेच न्यायालय व निवडणुक आयोगाने सिद्ध करून दाखविले. हार्दिकवर अन्याय करुन साध्वीला न्याय दिला असे जर कुणाला

वाटत असेल तर त्याला लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य याची किती चाढ आहे हा प्रश्न न विचारलेलाच बरा! वास्तविक त्याच वेळी मोदींनी साध्वीची उमेदवारी रद्द करायला हवी होती. पण तसे न करता वेगवेगळ्या प्रकारची बेलगाम वक्तव्ये निरनिराळ्या राज्यात जाऊन सोयीसोयीने त्यांनी जी केली त्यामुळे निवडणुकीला धार्मिक रंग चढला. धर्माचा उन्माद वाढला. कळत-नकळत उघडपणे धर्मसंघर्ष व धर्मज्वर पेटवून जणूकाही हिंदु-मुस्लिम लढाईचे स्वरुप या निवडणुकीला आणले गेले. आजपर्यंत कधीही असे विद्वेषाचे वातावरण कोणीही निर्माण केले नव्हते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने दोनदा निवडणूक जिंकली होती. पण असा धर्म राजकारणात आणून धार्मिक उन्माद माजविला नव्हता. मागील पाच वर्षात मोदी सत्तेवर आल्यापासून देशभर जो धार्मिक हिंसाचार वाढलेला व माजलेला दिसत आहे त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य तर धोक्यात आलेलेच आहे पण आमची लोकशाही, सार्वभौमत्व आणि सहिष्णुता यांचादेखील गळा आता घोटला जातोय की काय असे संशयाचे व भितीचे वातावरण देशभर निर्माण झालेले आहे.

वास्तविक धर्म हे मागासलेल्या समाजातील जीवनात एक नशा आणणारे द्रव्य आहे. धर्म संकटात आहे अशी नुसती खोटी आरोळी जरी कुणी उठविली तर सगळे धर्ममार्तंड हाकाट्या पिटणे सुरु करतात आणि धर्म या द्रव्याचे सेवन करुन गुलाम प्राणपणाने मालकांचे रक्षण करतात. धार्मिक, राजकीय नेत्यांना धर्म हा धार्मिक आचरण करुन मोक्षाला जाण्यासाठी नको असतो. तर धर्माचा आधार घेऊन इहलोकातील हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हवा असतो. धार्मिक माणूस आणि धार्मिक राजकारणाचा राजकीय नेता यांच्यात एक मुलभूत फरक असतो. धार्मिक माणसाचे हितसंबंध कुठेतरी परलोकात गुंतलेले असतात. त्या हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी धार्मिक माणसाचे इहलोकातील जीवन ही एक साधना असते. धार्मिक माणसाला प्रेरणा जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटण्याची असते. हा मनाने रुढीवादी, परंपरावादी आणि धार्मिक माणूस सामाजिक प्रगतीला अडथळा असतोच, पण हा अडथळा त्याच्या स्वतःच्या मनात असतो. परिस्थितीच्या दडपणाने किंवा समजावून सांगून धार्मिक माणसाचे मन बदलता येत नसते. धार्मिक राजकारण करणाऱ्या राजकीय नेत्याचे मात्र असे नसते. हा नेता राजकारण धर्माच्या नावे करतो. पण याचे हितसंबंध इहलोकात गुंतलेले असतात. मोदींचे सगळे राहणे, वागणे, बोलणे पाहिल्यानंतर आपल्या ते जरुर लक्षांत येईल.

भूतकालीन धर्माच्या नावाने मोदी आणि भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पडद्यामागून राजकारण करीत असला तरी वर्तमानकालीन परिस्थितीच्या गरजा त्यांनी जाणून घेतलेल्या आहेत. त्यामुळे असे नेते आणि अशा संघटना काही इहलौकिक प्रश्न आणि पारलौकिक श्रद्धा यांची बेमालूम सांधेजोड करुन टाकतात की आपल्या गरजेला अनावश्यक असलेला धर्माचा भाग फटक्यात रद्द करतात आणि आवश्यक असलेला भाग धर्मात नसला तरी स्वीकारतात. हा मुलभूत फरक असल्यामुळे बहुसंख्यांक समाज धर्मप्रभावाखाली असला तरी त्याच्या संघटित निषेधाची प्रतिकाराची गरज नसते. तिथे गरज सातत्याने सुधारणा करण्याची असते. राजकीय नेतृत्व अशा चर्चांनी सुधारले जात नसते. तिथे धोरणांचे पवित्रे विचारपूर्वक व नियोजनबद्ध रितीने जाणीवपूर्वक घेतलेले असतात. त्यामुळे संघटित प्रतिकार करुन हे राजकारण मोडून काढावे लागते. तिथे समजावून सांगून चर्चांनी काही बदलण्याचा संभव नाही. अर्थात ही धार्मिक राजकारणाच्या नेत्यांसंबंधीची गोष्ट आहे. अनुयायी याहून निराळा असतो. त्याचा विचार स्वतंत्रपणे करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर मुख्यत्वे तीन गोष्टींवर भर देऊन त्या संबंधीचा विचार काँग्रेस, डावेपक्ष व भाजपविरोधी पक्ष यांना करावा लागणार आहे.

1) विरोधी व डावे पक्ष हे हिंदू धर्माच्या विरुद्ध आहेत असा सत्ताधारी भाजपाचा प्रचार आहे. तसे वातावरण त्यांनी देशभर तयार केले आहे. वास्तविक विरोधी पक्षांनी जनतेला विश्वासात घेऊन त्यांचे प्रबोधन केले पाहिजे व त्यांना वस्तुस्थिती समजावून सांगितली पाहिजे की हिंदू धर्म व हिंदुत्व या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. वेद, उपनिषदे, गीता, संतसाहित्य, भक्ती चळवळ, राजाराम मोहन रॉय, न्या. रानडे, महात्मा गांधी यांनी सांगितलेला जो विचार आहे तो हिंदु धर्माचाच विचार आहे. तो सर्वसमावेशक असून आम्ही तो मानतो. सर्व देव नमस्काराः केशवम् प्रतिगच्छती । म्हणजे कोणत्याही देवाला कुठूनही नमस्कार केला तरी तो केशवापर्यंत पोहोचतोच. याचा अर्थ साधा आहे. भक्तीचे, उपासनेचे अनेक मार्ग असू शकतात. प्रेम, सहिष्णुता, मैत्रभावना या सगळ्या गोष्टी त्यात आहेत. याऊलट हिंदुत्व जे आहे ती राजकीय विचारसरणी आहे. जी सत्ता मिळविण्यासाठी धर्माचा वापर करते. खऱ्या हिंदू धर्माशी यांना काहीही देणेघेणे नाही. ह्यांच्यासाठी हिंदुत्व ही एक राजकीय घोषणा आहे. आचाराचा त्यात काहीही भाग नाही. अंगी त्यांनी काही बाणवूनही घेतलेले नाही. त्यामुळे हिंदुत्व हे हिंदू धर्माच्या विरुद्ध आहे. हिंदू धर्मात विवेकवाद, विश्वबंधुत्व, सहिष्णुता व समतामूल्य आहे आणि भाजप विरोधी असणारे पक्षच त्याचे खरे पुरस्कर्ते आहेत हे जनतेला पटवून देण्याची गरज आहे. ते काम विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आता केले पाहिजे.

एवढेच नव्हे तर घरोघरी जाऊन लोकांना खरा इतिहास सांगितला पाहिजे की मुसलमानांशी करारामागून करार करत टिळक-गोखल्यांच्या वाटेने गांधीजी गेले असते तर भारत अखंड राहिला असता पण मग त्यावेळच्या 40 कोटी हिंदूंचे जीवन सांस्कृतिकदृष्ट्या उध्वस्त झाले असते आणि भारताचे भवितव्य राजकीयदृष्ट्या अंधारले असते, हिंदूचे भवितव्य उध्वस्त होऊ देण्यास गांधीजी तयार नव्हते, म्हणून फाळणी टळू शकली नाही. मुस्लिम समाजाला वेगळे राष्ट्र मिळत असताना त्यांना अल्पसंख्य म्हणून राहण्यात प्रेम कसे वाटावे? शिवाय त्यांच्या मदतीला इंग्रजांची फुटीर नीती होतीच. म्हणून गांधीजी अखंड भारत टिकविण्यात अयशस्वी झाले. गांधींचे हे अपयश मान्य केले तरी अखंड भारत टिकविण्याची लढाई ते सर्व सामर्थ्यानिशी खेळले होते. जे लढत राहिले आणि शक्ती अपुरी पडल्यामुळे पराभूत झाले त्यांचे नेते गांधीजी होते, पण ज्यांनी कधी लढाच दिला नाही, अखंड भारत टिकविण्याची लढाई लढण्यापूर्वीच ज्या मंडळींनी मुस्लिम लीगचा द्विराष्ट्रवादाचा सिद्धांन्त मान्यच करुन टाकला त्यांचे वर्णन कसे करावे? हिंदुत्ववाद्यांनी नेमके हेच कार्य केले. अखंड भारताचा तोंडाने जयघोष करत या मंडळींनी द्विराष्ट्रवाद मान्य केला आणि अखंड भारत टिकविण्यासाठी लढण्याऐवजी युद्धापूर्वीच रणांगणातून पळ काढला! शस्त्र आणि सेना हे काही गांधीजींचे बळ नव्हते. जनतेचे गांधींवर असणारे प्रेम गांधीचे एकमेव सामर्थ्य होते. जनतेचे प्रेम हेच ज्याचे एकमेव सामर्थ्य त्याला गोळी घालणारा माणूस जनतेलाच गोळी घालत असतो, तो हुतात्मा वा खरा देशभक्त नसतो, फक्त राजकीय खुनी असतो. हे तरी मोकळेपणाने मोदी आणि हिंदुत्ववादी भाजप नेते मान्य करणार आहेत काय? शेवटी जनता गांधींच्या मागे गेली म्हणजे तरी काय? मुस्लिम समाज गांधीजींच्या मागे कधीच नव्हता. गांधीजींचे नेतृत्व हे हिंदू समाजाचे नेतृत्व होते. त्यावेळी या देशात 85 टक्के लोक हिंदू होते. हिंदू जर हिंदुत्ववाद्यांच्या मागे गेले असते तर गांधीजींची राजकीय किंमत शून्य झाली असती. कारण हिंदूंचा पाठिंबा हेच गांधींचे सामर्थ्य होते.

आपल्या राजकारणात हिंदू विरुद्ध हिंदुत्ववाद हाच एक महत्त्वाचा प्रश्न आहे. जे हिंदू जनतेच्या वतीने उभे आहेत ते हिंदुत्ववादाच्या विरोधाच्या बाजूने उभे आहेत ते हिंदू जनतेच्या विरोधी उभे होते. त्याकाळी गोळवलकर गुरुजी आणि आजचे सरसंघचालक मोहन भागवत हे या हिंदुत्ववादी पण हिंदू जनताविरोधी प्रवृत्तीचे प्रमुख नेते व प्रतिनिधी आहेत. मोदी, शहांचा कंपू हा त्यांचा दत्तू आहे. हे आपण डोळे उघडे ठेवून समाजाच्या निदर्शनास आणले पाहिजे.

2) धर्माच्या नावाने समाजात विग्रह निर्माण करुन इतिहासाची मोडतोड करण्याचा सत्ताधारी भाजपाचा प्रयत्न आहे. भारतीय संस्कृती ही भारतात राहणाऱ्या सर्व धर्माच्या लोकांनी मिळून बनविलेली आहे. त्यात हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, ईसाई, ज्यू सगळे येतात. परंतु आज सत्ताधाऱ्यांकडून जाणीवपूर्वक धार्मिक व सांप्रदायिक दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी होते आहे. संपूर्ण मुसलमान राजांचा कालखंड हे जणू अंधारयुग होते अशा पद्धतीने संबोधिले जाते. इतिहासाची चुकीची मांडणी करुन समाजात व विशेषतः हिंदू-मुस्लिमांमध्ये वैरभाव, द्वेष, संघर्ष निर्माण करायचा प्रयत्न सातत्याने चालू आहे. मध्ययुगातले हे संघर्ष राजकीय होते. त्याला मुद्दाम हेतूपूर्वक धर्माची झालर चढविली जात आहे. हा संघर्ष दोन धर्मातला कधीच नव्हता. त्यामुळे त्याकाळी राजांच्या पदरी दोन्ही धर्मांचे सैनिक होते. अगदी महंमद गझनीच्या सैन्यातही हिंदू सैनिक होते आणि राष्ट्रकुटांच्या नौदलातही मुसलमान होते. त्यामुळे याबाबतीत आपण लोकांचे प्रबोधन करुन धर्माचा वापर चुकीचा होतो आहे हे त्यांना सोदाहरण पटवून दिले पाहिजे.

मनुष्याला मनुष्याच्या नात्यानेच पहा. तसे न कराल तर आम्ही हिंदु धर्माचा आत्मा गमावून बसू. हिंदू-धर्म म्हणतो, सर्वात एक आत्मा वास करीत असतो. हिंदू धर्म असा विशाल धर्म आहे की तो कोणत्याही तऱ्हेचा संकुचित भाव ठेवित नाही. आम्ही जर ही गोष्ट लक्षांत घेतली नाही तर हिंदू धर्माचा पायाच गमावून बसू. आमची शास्त्रे सांगतात की, 'एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति ।' सत्य एक आहे, परंतु उपासनेसाठी ते अलग अलग होऊ शकते. त्यांनी 'मूर्खाः बहुधा वदन्ति' असे म्हटले नाही. म्हणून अशी व्यापक वृत्ती असेल तरच आपण हिंदूंचीही सेवा करु शकतो हे जातीधर्माची झापडे लावलेल्या सरकारला निक्षून सांगितले पाहिजे.

काही लोक म्हणतात की, "मुसलमानांजवळ जसे एकच कुराण आहे तसे आमच्याजवळ धर्माचे एकमेव असे पुस्तक नाही, म्हणून आमची शक्ती विस्कळित होते. म्हणून गीतेलाच प्रमाण समजा." माझी गीतेवर कितीही श्रद्धा असली तरी हिंदु धर्मासाठी कोणताही एकच ग्रंथ प्रमाण नसावा असे मत विनोबांसह अनेकांनी व्यक्त केले आहे. हिंदुधर्म समुद्र आहे. समुद्रात सर्व नद्या येऊन मिसळतात. म्हणून आम्हाला समन्वय करण्याची खुबी साधली पाहिजे. उपनिषदांचा समन्वय गीतेने केला आणि गीतेचा समन्वय भागवताने केला. आता आम्हाला पुराण, कुराण, बायबल आणि गीता यांचा समन्वय करावा लागेल. ज्याप्रमाणे समुद्र सर्व नद्या आपल्यात सामावून घेतो तशीच आमची वृत्ती असावी. स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे की आमचा वेदान्त धर्म आहे. आम्ही सर्व उपासकांकडे सम भावाने पाहतो, ही आमची सर्वात महान शक्ती आहे.

ज्याप्रमाणे सर्व कावळे काळे असतात किंवा सर्व शिपायांचा पोशाख एकसारखा असतो त्याप्रमाणे हिंदूंचा एक ग्रंथ आणि एक मंत्र इच्छित असाल तर त्याने एकता तर वाढणार नाहीच उलट व्यापकता मात्र गमावून बसू.

रामकृष्ण परमहंसांनी इस्लाम आणि बायबलची ही उपासना केली होती. ते अगदी बरोबर होते. त्यांनी अशा प्रकारे नाना उपासना करुन आपल्या जीवनात त्यांचा समन्वय साधला होता. अशा उदाहरणाने आमची शक्ती वाढते. एक देव, एक पुस्तक आणि एक संघ इच्छिल्यामुळे आमची शक्ति घटेल. शंकराचार्य स्वतः मूर्तिपूजा मानीत नव्हते, तरी सुद्धा त्यांनी पंचायतन जनतेला दिले. त्यावेळी जितके पंथ अस्तित्त्वात होते त्या सर्वांना त्यांनी सांगितले की आमच्याकडे या, आम्ही समुद्र आहोत. आज सुद्धा आम्हांला हाच समन्वय केला पाहिजे.

3) भारतीय जनता पक्ष धर्माचा वापर करतो म्हणून आपण सवाई हिंदुत्ववादी बनणे चुकीचे आहे. दिग्विजयसिंह यांनी निवडणुकीसाठी साध्वीच्या विरोधात म्हणून अनेक साधू, मांत्रिक, धर्ममार्तंड गोळा करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. धर्म ही प्रत्येक माणसाची वैय्यक्तिक बाब आहे. तिचा राजकारणासाठी उपयोग करु नका असे आपली भारताची राज्यघटना सांगते आणि लोकप्रतिनिधीत्व कायदाही सांगतो. त्यामुळे सर्व धर्मांबद्दल आदर बाळगत असतानाही धार्मिक संस्था, धर्मगुरु, साधुसंत यांना राजकारणात आणून फुकटची प्रसिद्धी देणे वा त्यांचा मते मिळविण्यासाठी वापर करुन घेणे योग्य नाही. आपण क्षुल्लक स्वार्थासाठी राजकीय पक्षांच्या दावणीला बांधले जाऊ नये याचे भान धर्मगुरु, साधुसंत यांनी देखील ठेवले पाहिजे. पण त्यांनाच राजकारणात शिरुन सत्तेची पदे मिळविण्याचा मोह होत असेल तर त्यांनी उघडपणे राजकारण करावे पण त्यापूर्वी धर्मगुरु, साधुसंतपदाची वस्त्रे उतरवून ठेवावीत. याबाबत आता समाजानेच आग्रही राहण्याची गरज आहे. मी साधुसंत आहे, मी ब्रह्मचारी आहे, मला संसार नाही, कशाचा मोह नाही असे म्हणायचे आणि खासदार, मंत्री, मुख्यमंत्र्यासह सर्व पदे मिळविण्याची अपेक्षा करायची, त्यासाठी साम-दाम-दंड-भेद वापरायचे हे आपण योगी आदित्यनाथ, साक्षी महाराज यांच्यासह अनेकांच्या बाबतीत पाहिले आहे. राजकीय पदे मिळविण्याच्या अपेक्षेने प्रेरित झालेले व त्यासाठी उद्दामपणाची भाषा वापरणारे हे साधू, ब्रह्मचारी ढोंगी आणि लबाड आहेत. त्यांचा बुरखा आपण टराटरा फाडला पाहिजे.

आपण आपली जी घटनात्मक मूल्यावर आधारलेली धर्मनिरपेक्ष भूमिका आहे ती लोकांना समजावून सांगितली पाहिजे आणि ती समजावून सांगत असताना या भूमिकेमुळेच देश एकसंघ राहिल. समाज एकजिनसी राहिल आणि देशाची प्रतिष्ठा वाढेल हे ही ठामपणे सांगितले पाहिजे. जे पंडीत नेहरु, इंदिरा गांधी यांना शक्य झाले ते आपल्याला का शक्य होऊ नये? समाजाच्या विकासासाठी विवेकवाद, बुद्धीप्रामाण्यवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी मूल्ये आवश्यकच आहेत. सध्या जरी आपल्याला तात्पुरता पराभव पत्करावा लागला असला तरीही ही मूल्ये कायम महत्त्वाची ठरणारी आहेत याचे भान विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या डाव्या लोकांनी ठेवले पाहिजे.

या लोकसभा निवडणुकीत मोदी-शहा जोडगोळीला जो विजय मिळाला त्याने बहुतांश जनता आनंदी व समाधानी झाली आहे असे छातीठोकपणे कुणीही सांगू शकणार नाही. सत्ताधारी पक्षाचे लोकही इतका विजय मिळेल अशी खात्री देत नव्हते. प्रत्येकाच्या मनात शंकेची पाल चुकचुकायची की त्रिशंकू सरकार होईल. कोणालाच बहुमत मिळणार नाही. पण प्रत्यक्षात वेगळेच घडलेले आणि तीनशेहून अधिक जागा एनडीएला मिळाल्याचे चित्र आपण सारेजण पाहतो आहोत. यापूर्वी असे किंबहुना याहूनही अधिक जागा राजीव गांधी, इंदिरा गांधी यांना मिळाल्या होत्या. देश स्वतंत्र झाल्यानंतर अनेकदा लोकसभेच्या निवडणुका झाल्या. पंडीत जवाहरलाल नेहरुंपासून अगदी अटलबिहारी वाजपेयी व डॉ. मनमोहनसिंग यांच्यापर्यंत अनेकजण पंतप्रधान झाले. पण कोणाच्याही विजयाबाबत जनतेच्या मनात संशयाची पाल कधीही चुकचुकली नव्हती. अगदी 2014 च्या निवडणुकीत मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा व एनडीए सत्तेवर आली तेव्हादेखील लोकांना हा विजय संशयास्पद वाटला नव्हता. लोकांनी आनंदाने व विश्वासाने हा विजय स्वीकारला होता. पण 2019 चा मोदींचा विजय मोकळ्या मनाने स्वीकारण्याची जनतेची तयारी नाही हे वास्तव आहे, कटूसत्य आहे. ते तुम्हांला कोणाला आवडो ना आवडो. या विजयाला ईव्हीएम मशीन घोटाळ्यापासून सरकारी यंत्रणेच्या वशीकरणापर्यंत अनेक गोष्टींच्या संशयाची झालर लाभलेली आहे. हा मोदींच्या कामाचा आणि सत्याचा निखळ विजय आहे असे कोणीही म्हणताना दिसत नाही. देशाचा पंतप्रधानच जर धार्मिक द्वेष उत्पन्न करीत असेल, लोकांना भुलविण्यासाठी साधूची वस्त्रे घालून गुहेमध्ये ध्यानाचे ढोंग करीत असेल आणि प्रसिद्धी माध्यमे त्याचे जाणीवपूर्वक प्रसारण करीत असतील तर ही लोकसभा निवडणुक खुल्या मोकळ्या व निरपेक्ष आणि निःपक्षपाती वातावरणात पार पडली आहे असा दावा कुणालाही करता येणार नाही. मोदींच्या या विजयाला संशयाचे गालबोट लागलेले आहे. ते कसे व कोण पुसणार?

**लोकसभा निवडणुकीतील यशापयशाची चर्चा करून आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी करण्याच्या उद्देशाने १ जून २०१९ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख निवडक कार्यकर्त्यांची बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत शरद पवार यांनी केलेले हे मार्गदर्शन.**



निवडणुकीच्या निकालानंतर काही प्रमुख नेत्यांनी बसून निवडणुकीच्या निकालासंबंधीचं विश्लेषण करावं, जिथं दुरूस्ती करण्याची शक्यता आहे, तिथं दुरूस्ती करावी यासाठी आज सकाळी अध्यक्षांनी बैठक बोलावली आहे आणि मला आनंद आहे, की या बैठकीच्यानंतर आपल्या सगळ्यांना याठिकाणी निमंत्रित केलं. साधारणत: विजयाची आपली सगळ्यांची दिशा कशी असावी, यासंबंधीची चर्चा याठिकाणी झाली.

या निवडणुकीचा निकाल वेगळा लागला. संबंध देशातली अनेक वृत्तपत्रं, अनेक संघटना या सगळ्यांचं विश्लेषण जे काय या निवडणुकीच्या पूर्वी आलेलं होतं, त्यातून अशी एक बाब पुढे येत होती, की बहुतेक परिवर्तन या देशामध्ये होईल आणि परिवर्तनाची ही भावना लोकांच्यामध्ये आली आणि ती या मतदानाच्या रूपानं निश्चितपणानं स्पष्ट होईल. तर ते परिवर्तन आणि त्याबद्दलच्या अपेक्षांची पूर्तता याठिकाणी काय झालेली नाही. या संबंध प्रचारामध्ये एक प्रकारचा उन्माद समाजामध्ये कसा तयार होईल या प्रकारची खबरदारी प्रधानमंत्र्यांच्यावतीनं घेतली गेली आणि त्यांनी त्यांच्या प्रचाराचं सूत्र बदललं.

सर्वांची अपेक्षा असते, की पाच वर्षे राज्य केल्याच्यानंतर पाच वर्षाच्या पूर्वी लोकांना दिलेला कार्यक्रम, दिलेला शब्द, केलेली भाषणं आणि पाच वर्षांत त्याची अंमलबजावणी कशी केली याचं विश्लेषण करण्याची जबाबदारी नेतृत्वाची असते. पण प्रत्यक्षपणानं लोकांच्या मनावर ठसेल अशा प्रकारची कुठलीही भूमिका पाच वर्षाच्या कालखंडामध्ये घेतलेली नव्हती आणि त्यामुळं प्रचाराची दिशा त्यांनी बदलली.

# आगामी विधानसभा निवडणुकीत नवीन तरुणांना संधी द्या...

## शरद पवार यांची सूचना



खरं म्हटलं, तर अनेक प्रश्न होते. ज्याचा उल्लेख याठिकाणी मघाशी केला गेला, उदाहरणार्थ नव्या पिढीच्या मध्ये. बेरोजगारी हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता आणि तुम्ही आजची आणि कालची वर्तमानपत्रं बघितली असतील, तर केंद्र सरकारच्याच एका यंत्रणेच्यावतीनं देशामधला बेरोजगारीचा रोग हा उच्चांकाला पोहोचल्यासंबंधीचा निष्कर्ष काढलेला आहे आणि तो छापून आला आहे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न होता, की या देशातली शेती आणि या शेती व्यवसायात असलेला समाज आणि त्याचा परिणाम वाढत्या होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या. कदाचित आजच्या वर्तमानपत्रामध्ये तुम्ही पाहिलं असेल, की गेल्या दहा दिवसांमध्ये आत्महत्यांची संख्या एकट्या महाराष्ट्रामध्ये वाढलेली आहे आणि त्यासंबंधीची जिल्हावार माहिती आज काही वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केलेली आहे. आणि त्यामुळं साहजिकच एक वेगळं चित्र याठिकाणी होतं आणि ते मतदानाच्या रूपानं काही व्यक्त होईल अशा प्रकारची अपेक्षा आपल्या सगळ्यांची होती आणि लोकांची होती. पण नरेंद्र मोदींनी या सगळ्या स्थितीच्यासंबंधीचा आढावा घेवून संबंध निवडणुकीच्या प्रचाराचं सूत्र दुसरीकडं वळवायचा प्रयत्न केला आणि त्याच्यामध्ये त्यांना यश आल्याचे चित्र आज दिसतंय.



लोकसभा निवडणुकीत विजयी झालेल्या राष्ट्रवादीच्या खासदार अनुक्रमे सुप्रियाताई सुळे, डॉ. अमोल कोल्हे, सुनील तटकरे व उदयनराजे भोसले यांचा शरद पवार यांच्या

त्यांनी मांडलं काय? लोकांच्या भावनेला आवाहन करून प्रखर राष्ट्रवादाची संकल्पना ही त्यांनी प्रामुख्यानं देशामध्ये मांडली. पाकिस्तान आणि चीन ही दोन्ही राष्ट्रं आणि भारत यांच्यामध्ये एक प्रकारचं अंतर असलेली ही राष्ट्रं आहेत. त्यातल्या त्यात चीन हे एक शक्तीशाली राष्ट्र असल्यामुळं अनेक गोष्टी आपल्याला मान्य नसल्या तरी आपण त्यांच्या कधी नादाला लागत नाही. पण कधी कधी पाकिस्तानमधलं नेतृत्व सुद्धा काही चुकीच्या भूमिका घेतं आणि याठिकाणी ज्या विचारधारेला समाजामध्ये एकमताचं अंतर निर्माण करायचं, ज्याला आपण फुटीरता म्हणतो आणि त्याचा लाभ घ्यायचा ही भूमिका ज्यांच्या मनामध्ये असेल अशांच्या वक्तव्यामध्ये सातत्यानं पाकिस्तानचा उल्लेख केला जात असतो. आणि मोदींनी त्यालाच खऱ्या अर्थानं हात घातला होता.

काही गोष्टी या आधी बोलता येत नाहीत. या ना त्या निमित्तानं मी अनेकवेळा पाकिस्तानमध्ये गेलेलो होतो. कधी केंद्राचा मंत्री म्हणून गेलो आणि त्याहीपेक्षा अधिक वेळेला जगाच्या क्रिकेट संघाचा अध्यक्ष ज्यावेळी मी होतो, त्यावेळी पाकिस्तान हा एक महत्त्वाचा घटक त्या क्षेत्रातला असल्यामुळं अनेकवेळेला माझ्या बैठका तिथेही असायच्या. कधी मुंबईत,

दिल्लीत असायच्या. आणि मोठी गंमतीची गोष्ट आहे, की पाकिस्तान म्हटल्याच्यानंतर आपली एक मानसिकता, की त्या देशात गेल्याच्या नंतर कसा असेल, भारताच्याबद्दलचा विद्वेष किती असेल. पण तिथं गेल्यावर चित्र वेगळं बघायला मिळतं. तिथं गेल्याच्यानंतर दोन वर्ग दिसतात तिथं प्रामुख्यानं. एक ज्याच्या हातामध्ये सत्ता आहे, ज्याच्या हातामध्ये लष्कर आहे, त्याचा वापर करून भारताच्याविरुद्ध वातावरण तयार करण्याचा दृष्टीकोन जाणीवपूर्वक स्वीकरण्यात आला. त्यामुळे सर्वसामान्य आजही घेतली जात आहे.

पूलवामा हल्ला झाल्यानंतर त्यांना जबरदस्त उत्तर आपण दिले पाहिजे, अशी भारतीय जनमानसांत तीव्र भावना होती. हल्ला झाल्यानंतर गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी दुसऱ्या दिवशी सर्व विरोधी पक्षांची बैठक घेतली. तुमचे-आमचे राजकीय मतभेद असले तरी या ठिकाणी आम्ही मतभेद काढणार नाही आणि तुम्हांला प्रत्युत्तर द्यायचे असेल तर त्याला आमची साथ आहे, असे आम्ही त्यांना सांगितले. अपेक्षा अशी होती की,



शुभहस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी शेजारी जयंत पाटील, डी. पी. त्रिपाठी, माजित मेमन, रामराजे नाईक निंबाळकर व अरुण गुजराथी.

माणसांची मात्र फार मोठी अडचण झाली. या सर्वसामान्य माणसांचे नातेवाईक हैद्राबाद, लखनो, दिल्लीला आहेत. ते एकमेकांना भेटण्यासाठी खूप इच्छूक असतात. ते अनेकदा एकमेकांकडे जाऊ इच्छितात. पण तपासामुळे अनंत अडचणी उभ्या राहतात. हे सगळे नातेवाईक एकमेकांकडे आत्मीयतेने बघत असतात, पण याच्या उलट नेमकी परिस्थिती सैन्यदल, नेते, राजकीय नेते यांची असते. अपयश आले की भारताविरुद्ध उग्र भावना ते व्यक्त करतात. दुर्दैवाने भाजपकडून देखील देशात तेच होत आहे. उग्र राष्ट्रवाद आणि त्याच्या माध्यमातून शेजारच्या देशाबद्दल व एका घटकाबद्दल दुरावा कसा वाढविता येईल, याची खबरदारी भाजपच्या नेत्यांकडून जाणीवपूर्वक घेतली गेली व ते विरोधकांना विश्वासात घेऊन ऐक्याची भूमिका घेतील. पण बालाकोटवर हल्ला केल्यानंतर त्यांच्या मनात राजकीय फायदा कसा उठवता येईल व समाजा-समाजात विद्वेश कसा वाढविता येईल, याची खबरदारी त्यांनी घेतली. घरा-घरांत घुसून मारीन, ढूंढके मारूँगा, अशा प्रकारची आक्रमक भाषा पंतप्रधानांनी वापरली. या सगळ्या आक्रमक भाषणाचा परिणाम नवीन पिढीवर फार मोठ्या प्रमाणात झाला. या देशाच्या रक्षणासाठी पावले टाकून, पडेल ती किंमत देऊन, टोकाची भूमिका मोदी घेतायेत, त्यामुळे नवी पिढी त्यांच्या भाषणांना भूलली, आपण रोज मांडत होतो, शेतकऱ्यांचे, बेरोजगारांचे प्रश्न, गांधी-नेहरूंचा विचार, दुसऱ्या बाजूने समाजात अंतर कसे निर्माण होईल व एक

मोठा घटक बाजूला होऊन आपल्याला त्याचा फायदा कसा घेता येईल, याचा विचार चालू होता. हा विचार देशासाठी फार घातक ठरणार आहे.

इंदिरा गांधींची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. त्यांनाही निवडणुकीत ४०० जागा मिळाल्या होत्या. प्रचंड बहुमत देशानं स्वतःहून राजीव गांधींच्या पाठिशी उभे केले होते. त्यावेळी जनतेने कधीही निवडणूक यंत्रणेवर किंवा ईव्हीएम मशीनवर शंका घेऊन अविश्वास व्यक्त केला नाही. आज मात्र मोदींच्या या विजयावर शंका घेऊन निवडणूक यंत्रणेवर कधी नव्हे एवढा अविश्वास दाखविला जात आहे. ईव्हीएम घोटाळा हा चर्चेचा मोठा विषय बनला आहे. अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग व अनेक पंतप्रधान देशाने पाहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या निवडणुका पाहिल्या, पण जनतेने त्यांच्यावर कधीही अविश्वास व्यक्त केला नाही. आजच्या प्रधानमंत्र्यांपेक्षा अटलबिहारी वाजपेयींची लोकप्रियता कितीतरी अधिक होती. पण ते सर्वांना बरोबर घेऊन जात आणि सर्वांचा योग्य तो सन्मान राखीत. या वेळेला सातत्याने निवडणूक घेणाऱ्या यंत्रणेबद्दल समाजात गैरविश्वासचे वातावरण होते, ते अजून थांबलेले नाही. सर्वोच्च न्यायालयात याबद्दल आम्ही सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन भूमिका मांडली आणि ईव्हीएम मशीनवर निवडणुका घेऊ नका, असा आग्रह धरला. परंतु सुप्रीम कोर्टाने आमची भूमिका मान्य केली नाही, त्यांची अगोदरपासूनच यंत्रावर निवडणुका घेण्याची भूमिका होती. निकाल काहीही लागलेला असला तरी आणि आपण स्वीकारलेला असला तरीही 'म्हातारी मेल्याचं दुःख नाही, पण काळ सोकावता कामा नये', याची खबरदारी आपण घेतली पाहिजे.

आता महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकांना आपल्याला सामोरे जायचे आहे. ईव्हीएम मशीनबाबत समाजामध्ये खूप अस्वस्थता आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये जेव्हा निवडणुका झाल्या आणि तिथे भाजपचा थोड्या मतांनी पराभव झाला, त्यांची सत्ता गेली, त्याचवेळी माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती, ती मी जाहीरपणे एका बैठकीत बोलवूनही दाखविली होती. आता ती राज्य सरकारे पाडायला पुन्हा केंद्र सरकार पुढाकार घेत आहे. एक प्रकारचे संशयाचे, चिंतेचे वातावरण देशात आहे. लोकांच्या मनातही संशयाचे वातावरण आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेबद्दल आपण अत्यंत सावध होण्याची गरज आहे. आता विधानसभा निवडणुकांना फक्त १०० दिवस बाकी राहिलेले आहे. या शंभर दिवसांत आपण कसे कष्ट घेणार आहोत, यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून असणार आहे.

आंध्र राज्यात चंद्राबाबूंच्या नेतृत्वाखाली तेलगू देसमची सत्ता होती. मागील पाच वर्षांत जगन रेड्डी यांनी मतदारसंघ पिंजून काढला. दोन ते अडीच वर्ष ते अखंडपणे लोकांत राहिले.






एकही





मतदारसंघ त्यांनी सोडला नाही. सगळ्या ठिकाणी ते गेले. नवी पिढी उभी केली. आज तिथल्या जनतेने मोठ्या विश्वासाने त्यांच्या हाती संपूर्ण सत्ता दिली आहे. त्यांच्या हाती राज्यातली सत्ता




येईल, असे कुणीही म्हणत नव्हते. भाजपाला तिथे दहा जागाही मिळाल्या नाहीत. आता लोकसभा निवडणुकीचा निकाल काय लागला याचा विचार डोक्यातून काढून टाका. कोर्टाचे

निकाल बघितल्यानंतर त्यांच्याकडून फारशी अपेक्षा करण्यात काहीही अर्थ नाही. जे शंभर दिवस आपल्या हातात आहे, त्याचा पुरेपूर वापर कसा करता येईल त्याचा विचार करा. जनमानसांत आपला उमेदवार कसा उठून दिसेल, त्याचा विचार करून चांगले उमेदवार शोधण्याच्या कामाला आत्तापासूनच सुरूवात करा. प्रत्येक विभागात नेत्यांना पाठवून नवीन तरुण युवक शोधून काढा, आगामी निवडणुकीत हे सरकार आपल्याला सत्तेवरून घालवायचं, या दृष्टीने खबरदारी घेऊन उमेदवारांची निवड करा. आजचं चित्र आपण निश्चितपणे बदलू शकतो, असा विश्वास बाळगा. सत्ताधारी धार्मिक उन्माद केव्हा निर्माण करतील हे सांगता येणार नाही. त्या दृष्टीने ते प्रयत्नही करतील, लोकसभेचा निकाल हा जनमानसाने दिलेला कौल आहे, असं लोकांच्या मनावर बिंबवण्याचा सत्ताधाऱ्यांकडून प्रयत्न केला जाईल, पण हे सत्य नाही, हे जनतेला तुम्ही पटवून दिले पाहिजे.






आता निवडणुकीला कसे सामोरे जायचे, या दृष्टीने तयारी सुरू केली पाहिजे. एकूण 288 जागा आहे, त्यातल्या पन्नास टक्के म्हणजे निम्म्या जागांवर आपला अधिकार आहे. आपले जे मित्र पक्ष आहेत त्यांना काही जागा सोडाव्या लागणार आहे. शेकाप, स्वाभिमानी शेतकरी संघटना, रिपब्लिकन पक्ष (गवई व कवाडे गट) व अन्य समविचारी पक्षांना बरोबर घेऊन त्यांच्यासाठी काही जागा सोडाव्या लागतील. ९० टक्के जागासंबंधीचे निकाल यापूर्वी झालेले आहेत. त्यामुळे वाटाघाटी करण्यासारखी व त्यात वेळ घालण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. देशातला सत्ताधाऱ्यांचा धार्मिक उन्माद आवरायचा असेल तर सेक्युलर घटकांनी एकत्र आले पाहिजे व वेळप्रसंगी मागे जाण्याची थोडीफार तयारीही ठेवली पाहिजे. उमेदवार शोधण्यासाठी प्रत्येक विभागात माणसे पाठविण्याची प्रक्रिया लवकर सुरू करुयात. ४० आमदार तर आपले पक्के आहेत. १४४ जागा आपल्या वाट्याला येतील. त्यातल्या १०-१५ जागा मित्र पक्षांसाठी सोडाव्या लागतील. उर्वरित जागांमधून ४० जागा बाजूला केल्या तर ९० जागांची निवड करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू केली पाहिजे. या ९० जागांवर जास्तीत जास्त नवीन चेहरे द्यावेत, तरुणांना उमेदवारीची संधी द्यावी, हे धाडस आपण केले पाहिजे. त्याचे फायदे होतात, हे मी अनेकदा बघितले आहेत.

1979-80 मध्ये आम्ही 58 लोक निवडून आलो होतो. अंतुले साहेब त्यावेळी मुख्यमंत्री होते, काही कामानिमित्त मी परदेशात गेले होतो. तेथून मी परत आलो तर आमच्या पक्षात फक्त सहा लोक राहिले होते. बाकी सगळे जण सोडून गेले होते. आम्ही सहा जणांनी पुन्हा पार्टी बांधली आणि साठ जागा निवडून आणल्या. आज काही तशी परिस्थिती नाही. ४० जणांचा संच आपल्याकडे आहे, त्यांच्या कुवतीचे १०० लोक आपल्याकडे आहेत. त्या सर्वांच्या ताकदीचा वापर करून घेऊया. कालचा लोकसभेचा निर्णय हा प्रखर राष्ट्रवादाची संकल्पना उभी केली गेली. अतिरेक्यांनी काही उद्योग केले, त्याचे भांडवल केले गेले. हल्ल्यात कोण होते तर काश्मीरमधले अतिरेकी. टोकाची भूमिका घेणारे हे भारतीयच होते. त्या अतिरेक्यांना कदाचित पाकिस्तानची मदत आहे, म्हणून सरकारने पाकिस्तानवरच हल्ला करण्याची भूमिका स्वीकारून धर्मा-धर्मांत उघडपणे दोन तट पाडले. एका राज्यातल्या फुटीरतावादी संघर्षाच्या घटनेला आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्यात आले आणि पुलवामा-बालाकोटचा राजकीय फायदा सत्ताधाऱ्यांनी उठविण्याचा प्रयत्न केला. अनेक जवानांनी व

सैन्यातील निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी याबद्दल कडक शब्दांत आपली नाराजीही व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीचा सहावा टप्पा जेव्हा चालू होता, तेव्हा प्रधानमंत्र्यांनी तर विक्रमच केला. मतदानाच्या बरोबर ४८ तास आधी ते गुहेत ध्यानस्थ जाऊन बसले. भगवे कपडे परिधान केले. सातत्याने त्यांचे हे ध्यान प्रसार माध्यमांतून लोकांना दाखविण्यात येत होते. जाणीवपूर्वक याचा प्रचार करण्यात आला. उत्तर हिंदुस्थानातल्या निवडणुका होता. हा हिंदुत्वाचा विचार फार लवकर प्रसारित होणारा उत्तर प्रदेश हा भाग आहे. मोदी ध्यानस्थ किती होते आणि राजकारणात लाभ घेण्यासाठी जी दृष्ये दाखविण्यात आली, त्याचा विजयातला वाटा किती? हे आत्ता आपल्या लक्षात आलेच असेल. राजकीय फायदा घेण्यापर्यंतची मजल पंतप्रधानांनी मारली. तसा प्रयत्न आजपर्यंत कुणीही केला नव्हता. मोदी हा भक्कम माणूस आहे हे प्रोजेक्ट करण्यात सरकारला यश आले. उद्या विधानसभेची निवडणूक राज्यातली आहे. मोदी विरुद्ध तुम्ही अशी स्पर्धा काय होणार नाही. शेवटी महाराष्ट्राचं नेतृत्व कुणाकडे द्यायचे हे सर्वसामान्य माणूस ठरविणार आहे. त्या सर्वसामान्य माणसाचा विश्वास आपण संपादन करू शकलो पाहिजे. लोकसभेसारखे वातावरण राज्यात निर्माण होईल, ही गोष्ट मनातून काढली पाहिजे. त्या दृष्टीने जुळवाजुळव सुरू करा. फार मोठ्या प्रमाणावर लोक निवडून आल्यानंतरही बदल होत असतात. ४०० खासदार राजीव गांधींचे होते. पुढच्या निवडणुकीत ते १६० वर आले. आता मोदींना ३४० मिळाले म्हणून चिंता करू नका. आपण किती आक्रमकपणाने निवडणुकांना सामोरे जातो, हे जास्त महत्त्वाचे आहे.



ज्यांना एकत्र येऊन पर्याय उभा करू नये असे वाटते, त्यांनीच आपल्या विलीनीकरणाची एक पुडी जाणीवपूर्वक सोडून दिली. राहूल गांधी मला भेटायला घरी आले तेव्हा विलीनकरणावर एका शब्दाचीही चर्चा झाली नाही, सर्वत्र यासंबंधी ज्या बातम्या पसरविण्यात आल्या, त्या असत्यावर आधारित होत्या. आपण आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवणार आहोत. मित्रपक्षांची मैत्री आपण प्रामाणिकपणे करूयात. जागा वाटप झाल्यानंतरही प्रामाणिकपणे व एकजुटीने प्रचार करून एकमेकांना निवडून आणूयात. राष्ट्रवादीची शक्ती, नवा चेहरा, नवा संच निर्माण करू शकू, अशी परिस्थिती निर्माण करण्याच्या कामाला आता आपण लागूया. आज राज्याच्या काही भागात दुष्काळाची स्थिती गंभीर बनली आहे. या दुष्काळी जनतेला दिलासा देण्याच्या कामातही कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून दिले पाहिजे.



# विधानसभेसाठी नव्या चेहऱ्यांना संधी



# विधानसभेसाठी कार्यकर्त्यांनी ताकदीने काम करावे- जयंत पाटील

आज आपण एका महत्त्वाच्या क्षणी महत्त्वाच्या कालखंडात एकत्रित जमलेलो आहोत. लोकसभा निवडणुकीत आपल्याला अपेक्षित यश मिळालेले नाही. आपल्याला किमान कमीत कमी 9 ते जास्तीत जास्त 12 जागा येतील आणि काही चमत्कार झाला तर 13, 14पर्यंतही आपण पोहोचू अशी आम्हा सर्वांची अटकळ होती. अगदी एक्झिट पोलचे अंदाजदेखील पाचपासून 13पर्यंत दाखवले जात होते. सी-व्होटर्ससारख्या एक्झिट पोलने तर चौदा जागा दाखवल्या होत्या. इंडिया टुडेसारख्या सर्व्हेनेदेखील आठ जागा दाखवल्या होत्या. पोल अँड पोल्स म्हणून एक सर्वे होता, त्याच्यात आघाडीला मिळून 11 जागा दाखवल्या होत्या. हे सर्व आकडे मतदान झाल्यावरच्या आकडेवारीनंतर एक्झिट पोलचे मी सांगतोय आणि त्यात राष्ट्रवादी काँग्रेस जवळपास सगळे महाराष्ट्रातले पत्रकार, जे राजकारणात नाहीत, त्यांनी एक कौतुक केलेलं की राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवार देताना चोखंदळपणाने

दिले. चांगले उमेदवार दिले आणि त्यामुळं राष्ट्रवादीचा चांगला विजय होईल असं भाकीत अनेकांनी दाखवलेलं होतं.

महाराष्ट्रात आदरणीय पवार साहेबांनी एखाद्या तरूणाला लाजवतील एवढ्या मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रभर आदरणीय पवार साहेब फिरले आणि सर्वदूर ज्या ज्या ठिकाणी गेले, 273 तर नाही होणार यावेळी पण कदाचित 170वर मोदी येतील. काही लोकं शेवटी शेवटी म्हणायला लागले की दीडेशवर मोदी येतील. काही लोकांना असं वाटायला लागलं, की त्यांची टीव्हीवरील बॉडी लँग्वेज, त्यांची भाषा आणि मुद्दे असे मांडले जात होते, की लोकांना असं वाटायचं, की हे देशाचे पंतप्रधान आहेत का या देशाच्या जिल्हा परिषदेची किंवा स्थानिक कुठल्या तरी प्रचाराचे प्रमुख आहेत. त्यामुळं या देशातल्या पहिल्यांदाच पंतप्रधानांनी पुलवामाचा विषय, पुलवामाच्या नावानी, बालाकोटच्या नावानी मतं मागितली. राजीव गांधींच्याबद्दल अनुद्गार काढले. त्यामुळं अगदी शेवटी प्रज्ञा ठाकूरला उभं केलं, त्यावेळी महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य माणसाला ज्यांनी शहीद करकरे यांचं चित्र लावून त्यांना श्रद्धांजलीचा कार्यक्रम झाला नाही, असं कदाचित महाराष्ट्रात एकही गल्ली बोळ राहिलं नसेल एवढ्या मोठ्या प्रमाणात अशोक कामटे, साळस्कर आणि आपल्या करकरेंना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्या करकरेंचा अवमान करणाऱ्या साध्वी ठाकुरला ज्यावेळी तिकिट दिलं, त्यावेळी आम्हाला असं वाटलं, की आता फार मोठा असंतोष महाराष्ट्रीयन माणसाचा दिसल्याशिवाय राहणार नाही तिला तिकिट देण्याचं धाडस केलं म्हणून.




त्यामुळं एकूणच निवडणुकीचा प्रचार अगदी शेवटपर्यंत नरेंद्र मोदींचा वेगवेगळ्या मुद्यावर होता. पण या देशातले जे प्रमुख मुद्दे होते, जे आपण सगळे भाषणात मांडत होतो. मग या देशातली बेरोजगारी होती, या देशातले अल्पसंख्याक आणि दलित समाजावर झालेले हल्ले असतील, या देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचं काम असेल, असे जे मुद्दे आपण मांडत होतो त्या मुद्द्यांचा कुठेही स्पर्श देशाचे प्रमुख त्यांच्या भाषणात करत नव्हते, ना त्याला उत्तर देत होते. आणि या सगळ्या मुद्यांच्यापेक्षा या देशामध्ये आपल्याला वेगळ्या दिशेला नेण्याचं काम नरेंद्र मोदींच्या भाषणातून होत होतं.

बऱ्याच वेळेला आज सकाळी उमेदवारांशी चर्चा केली. हा विजय नक्की कोणाचा आहे, याची शंका प्रत्येकाला आहे. मग हा नरेंद्र मोदींचा विजय आहे का, का हा मशिनचा विजय आहे. याची स्वतंत्र चिकित्सा होईल अशी मला खात्री आहे. पण या देशामध्ये मतदान झालं आणि मतमोजणी केली, त्यामध्ये 370 लोकसभेचे मतदारसंघ असे आहेत, की ज्याठिकाणी झालेलं मतदान आणि मोजलेलं मतदान याची आकडेवारी जुळलेली नाही. 370 ठिकाणी भारतामध्ये आकडेवारी जुळली नाही. मी अनेक वर्षे निवडणुका बघतोय, जर 3 लाख 12 हजार 395 मतदान झालं असेल, तर 3 लाख 12 हजार 395च मतं मोजली जात होती आजपर्यंत. पण ही पहिली घटना आहे, की या देशामध्ये 370 लोकसभा मतदारसंघांमध्ये हे गणित चुकलं. त्यामध्ये अकोल्यासारखा मतदारसंघ असेल, केजला पण तशीच परिस्थिती होती. त्यामुळं खरं म्हणजे याची नीट चौकशी व्हायला पाहिजे होती. पण बरेच प्रसंग आहेत. ठाण्याच्या आमच्या आनंद परांजपेंबरोबर त्यांचे कार्यकर्ते आले होते, त्यांनी व्हीव्हीपॅट मशीन ओपन केलं तर त्यामध्ये सात ब्लँक स्लीप्स होत्या, मध्ये चिन्हांच्या स्लीप्स होत्या आणि परत सात ब्लँक्स स्लीप्स होत्या. आपल्या आनंद परांजपेंच्या कार्यकर्त्यांनी ऑब्जेक्शन घेतलं, तर त्यांना सांगण्यात आलं, की अशीच सिस्टिम असते, आधी सात ब्लँक स्लीप्स असतात, मग चिन्हांच्या स्लीप असतात आणि परत सात ब्लँक स्लीप्स असतात. दुसरा व्हीव्हीपॅटचा बॉक्स ओपन केला, तर त्यावेळी सगळ्या चिन्हांच्याच स्लीप्स निघाल्या. यावर त्यांनी ऑब्जेक्शन घेतलं, की आत्ता असं बोलतांय आणि आता असं खोटं का बोलतांय. पोलिसांनी कार्यकर्त्यांच्या पाठीवर हात ठेवला आणि म्हटलं, की तु फार वेळ बोलतोयंस, चल बाहेर निघ. दमदाटीनं माणसं बाहेर काढण्याचे काही प्रसंग आपण या

मागच्या कालावधीत बघितले आहेत.

आणि त्यामुळं माझ्यासारख्या कार्यकर्त्याला कधी कधी असं वाटतंय, की मोदींनी सगळ्याचाच वापर केला, या निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना सत्ता टिकवण्यासाठी दुसरा कोणताही पर्याय नव्हता असं माझं मत आहे आणि म्हणून सर्व मार्गांचा वापर मोदींच्याकडून झाला. मशीनचा झाला असेल, न झाला असेल, आपल्याला माहित नाही. आकडेवारी बऱ्याच ठिकाणी शंका निर्माण करणारी आहे. पण आक्रमक हिंदुत्व त्यांनी मांडलं, प्रखर राष्ट्रवाद त्यांनी मांडला आणि युद्धज्वराने त्यांना अधिक हातभार लावण्याचं काम केलं आणि या दोन-तीन गोष्टींच्याबरोबर साध्वीला तिकिट दिलं, त्या साध्वीला तिकिट देण्याची कृती ही त्यांची प्रतिकात्मक होती. आपल्याला असं वाटलं, की हेमंत करकरेंचा अवमान झालेला आहे. आपण सगळीकडं भाषणं करत हिंडलो. परंतु, साध्वीला तिकिट देण्यातून जो देशभर संदेश गेला, त्यातून त्यांनी प्रखर हिंदुत्व त्याठिकाणी मांडलं असं मला वाटतंय आणि त्यामुळं शेवटचे






दोन दिवस तर काही विचारू नका. मोदी केदारनाथला जावून बसले. मतदानाच्या दिवसापासून जवळपास दीड ते दोन दिवस टीव्हीवर त्याच्याशिवाय दुसरं काहीही दाखवत नव्हते. कुठल्या गुहेत बसले आहेत, कशा पद्धतीने ते ध्यान करतायंत. संपूर्ण टीव्हीवर एकही चॅनेल मोकळं नव्हतं.

त्यामुळं एकंदरच परिस्थिती आपल्या मागच्या सर्व निवडणुकीच्या बाबतीत बोलत असताना आपल्या सर्वांना मला हेच सांगायचंय, की येणाऱ्या काळामध्ये आपण सगळ्यांनी अधिक ताकदीनं काम करण्याची गरज आहे. आणि हे जे मघासपासून मी मुद्दे सांगतोय, आणि जे एकंदरच प्रसारमाध्यमांसमोर गेलं, त्यातनं आपण एका बाजूला एकेक शब्द बोलताना आचारसंहितेचा भंग होणार नाही याची काळजी घेत होतो आणि समोरच्या बाजूनी भारतीय जनता पक्ष आचारसंहितेच्या बाबतीत चिंता न करता सर्व गोष्टी करत होता. आपलं काम एवढंच राहिलं होतं, ते म्हणजे फक्त तक्रारी करणं आणि आचारसंहितेचा भंग कसा केला आहे हे सांगणं. किंबहुना त्याला फारसा प्रतिसाद निवडणूक आयोगाकडून मिळत नव्हता. तक्रारींबद्दल त्याच्यावर लगेच निर्णय होत नव्हता. असे देशाच्या अनेक भागातले वेगवेगळे प्रश्न आपण अनुभवले. भारतीय जनता पक्षाने आचारसंहितेच्या सोबत अक्षरशः खेळ केला केला, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

निवडणुकीमध्ये जे महत्त्वाचे मुद्दे होते, बेरोजगारी होती, अर्थव्यवस्थेची गंभीर स्थिती असेल, महागाई असेल, भ्रष्टाचार असेल या गोष्टींवर चर्चा कशी होणार नाही, यालाच जास्त प्राधान्य हे शेवटपर्यंत होतं. आणि त्यामुळं एकंदरच मी मघाशी सांगितलं तसं भारतातल्या जनतेला वास्तवापासून दूर ठेवून ही निवडणूक जिंकण्याचं काम हे भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्रांनी केलेलं आहे. पूर्ण निवडणुकीत वास्तवाची चर्चाच झाली नाही, आणि सामान्य माणसाला दैनंदिन जीवनात ज्या गोष्टींचं महत्त्व नाही त्या सर्व गोष्टींना महत्त्व निर्माण करण्याचं काम प्रसारमाध्यमं, सोशल मीडिया या सगळीकडे जर आपण बघितलं, तर याच बाबीला, याच मुद्याला जास्त मोठ्या प्रमाणात महत्त्व दिलं गेलं.

आज खरं म्हणजे आदरणीय पवार साहेबांनी महाराष्ट्रभर नुसत्या राष्ट्रवादीच्याच मतदारसंघांत नाही तर आदरणीय पवार साहेब काँग्रेसच्या मतदारसंघांतही जावून आले आणि

अनेक ठिकाणी, मला वाटतं की सगळ्यात जास्त मेहनत या निवडणुकीत कुणी घेतली असेल तर ती आदरणीय पवार साहेबांनी घेतली आहे. खरं म्हणजे अशा पद्धतीचं काम आणि आजही निवडणुकीच्या निकालानंतर आजची सभा घेण्याचा आग्रह आणि अर्जन्सी ज्या पद्धतीनं पवार साहेब दाखवत होते, बऱ्याच जणांना आमच्यासारख्यांना वाटलं होतं, की अजून चार-पाच दिवस जावू दे, आठ दिवस जावू दे, दहा दिवस जावू दे, पण पराभवाच्यानंतर पुन्हा एकत्र येवून आपण विधानसभेच्या तयारीला लागलं पाहिजे, ही भूमिका आदरणीय पवार साहेबांनी स्वीकारून आज आपल्या सगळ्यांना इथं निमंत्रित करण्याचा आदेश मला दिला.

खरं म्हणजे, आपले बरेच उमेदवार उशिरा जाहीर झाले आणि उशिरा उमेदवार जाहीर झाल्यामुळं बऱ्याच ठिकाणी मोठं नुकसान आघाडीला झालं. जर दहा बारा दिवस आधी निर्णय झाले असते, काही उमेदवारांना पंधरा-वीस दिवस जास्त प्रचाराला मिळाले असते, आणखीन थोडं जास्त उमेदवारांना तयारी करण्यासाठी उपयोगी पडले असते आणि म्हणून मला असं वाटतं, की उमेदवार सगळे सक्षम होते, आपण कुठं कमी पडलो असं मला वाटत नाही. बजरंग सोनवणेसारखा उमेदवार आपण बीडला दिला. सगळ्या बीडवासियांनी, बीड जिल्ह्यातल्या सगळ्या कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. अंतर पडलं, ठीक आहे. राजेश विटेकरच्या तिथेही नवा चेहरा आपण दिला. बजरंगचा नवा चेहरा होता. राजेश विटेकरांच्या तिथे तर कुठेही गेलं तर कुणीही म्हणायचं की ही सीट आलीच. बीडला मतदान झाल्यानंतर दोन दिवसांनी तिथे गेलो होतो, तर सगळे म्हणायचे, की शंभर टक्के बजरंग निवडून येईल यात काही शंका नाही. डॉ. शिंगणेंच्या मतदारसंघातही बूथ कमिट्या अतिशय उत्तम शिंगणे साहेबांनी बांधल्या होत्या, तिथेही शिंगणे साहेबांचा पराभव होईल, असं सांगणारा एकही माणूस तुम्हाला तिथे सापडला असता असं मला वाटत नाही. तर आपल्या सगळ्या उमेदवारांनी अतिशय सुरेख अशी लढत दिली.

बऱ्याच ठिकाणी आपण हरलेलो असलो तरी आधीपेक्षा जास्त मतं आपल्याला मिळाली. मी मावळचं उदाहरण आपल्या सगळ्यांना देईन. मावळमध्ये 2014च्या लोकसभा निवडणुकीत आपल्याला 1 लाख 82 हजार मतं होती. या मतांमध्ये वाढ होवून आता यंदा यावेळी जिथं पार्थ पवार उभे राहिले होते, त्याठिकाणी 5 लाख 4 हजार 750 एवढी मतं झाली. म्हणजे पावणे दोन, दोन लाखांची मतं जवळपास 5 लाखांपर्यंत वाढली आणि बीडमध्ये सध्याच्या खासदारांचं 2014च्या तुलनेत कमी मतं आहेत आणि आपलं मतदान वाढलंय, परभणीतदेखील आपली मतं वाढली आहेत. ठाण्याचे आपले उमेदवार आनंद परांजपेंनी जाहिरातीचं जे तंत्र वापरलं, ते अतिशय प्रभावी होतं. भागातील प्रश्न असेल त्याठिकाणी जावून त्याचा व्हिडिओ लोकांमध्ये व्हायरल करण्याचं काम आनंदनी अतिशय चांगल्या पद्धतीनं केलं. 2014च्या तुलनेत काही हजारांनी त्यांचं मतदान वाढलेलं आहे आणि हे करत असताना माझं एक असं ऑब्झर्वेशन आहे, की युती असो अथवा आघाडी, दोन्ही बाजूचे उमेदवार जे पाच वर्षे राबले, सतत ज्यांनी मेहनत घेतली, ज्यांना पूर्ण माहित होतं, की आपणच उमेदवार म्हणून उभं राहणार आहोत, जे लोकांच्या संपर्कात राहिले, तळागाळापर्यंत पोहोचण्याचं काम ज्या उमेदवारांनी केलं, त्यांना बऱ्यापैकी यश महाराष्ट्रात आणि देशात, विशेषत: महाराष्ट्रात मिळालेलं आहे.

आपल्या अमरावतीच्या उमेदवार नवनीत राणा ज्या आहेत, त्या पाच वर्षे परत निवडणूक लढवायची याच म्हणण्याने



तयारी करत होत्या, असं मला तिथल्या भागातल्या लोकांकडून सांगण्यात आलं. त्यामुळं पाच वर्षे किंवा दोन ते तीन वर्षे ज्यांनी निवडणूक लढवायची आहे, असं ठरवून काम केलं, ज्याला वेळ मिळाला, त्याला चांगल्या प्रकारे लोकांनी प्रतिसाद दिलाय, हेही या निवडणुकीचे वैशिष्ट्य आहे. संग्राम जगतापला आपण ऐनवेळी उमेदवारी दिली आणि शेवटी एवढा कमी वेळ संग्रामला मिळाला, की अपयश आलं पण संग्रामनंदेखील त्याठिकाणी चांगली लढत देण्याचा प्रयत्न केला. संग्रामच्या मतदारसंघात नगरलादेखील लोकं म्हणायची की काही झालं तर फार चांगला चेहरा तुम्ही दिला आहे, तरूण उमेदवार दिला आहे. निवडून

येईल. आपल्याला दुर्दैवानं तिथं अपयश आलं.

आपल्याला शिरूरमध्ये अत्यंत अभूतपूर्व यश मिळालं आणि मला वाटतं, की शिरूरमधलं यश हे साधारणपणे एखाद्या पर्सनॅलिटीचा लोकांवर किती प्रभाव असू शकतो याचे उत्तम उदाहरण आहे. बरेच जण म्हणायचे की प्रचाराला वेळ कमी आहे, त्यावेळी मी अनेकांना म्हणायचो की टीव्हीतून ते घराघरात घुसलेले आहेत. त्यामुळं प्रचार नाही केला तरी चालेल. मी शिरूरलाच त्यांच्या प्रचारसभेसाठी गेलो होतो. मला औत्सुक्याने विचारलं की काय होईल. मी म्हटलं की थोड्या वेळात सांगतो. आम्ही मंडपापर्यंत चालत गेलो. मी त्यांना मुद्दामहून पुढं चालायला लावलं. माणसं येवून अमोल कोल्हेंच्या पाया पडत



होते, मतदारांच्या चेहऱ्यावर इतका उत्साह होता, की स्टेजवर बसल्यानंतर मी म्हटलं, की काही चिंता करू नका, तुम्ही शंभर टक्के निवडून याल. ते म्हणाले, की कसं काय? मी म्हणालो, की एवढे पांढरे झाले आहेत या धंद्यात आमचे, तुम्ही काय चिंता करू नका. तुम्ही नक्की याल. अमोल कोल्हेंचा विजयदेखील अतिशय अभूतपूर्व होता. सगळ्यांनीच मदत केली. पण दिलीप वळसे पाटलांनी मेहनत घेतली. पूर्णपणे झोकून देवून त्यांनी अमोल कोल्हेंच्या विजयासाठी प्रयत्न केले. बाकीचे सर्वच त्या मतदारसंघातले आहेत, अशा सर्वच मान्यवरांनी त्याठिकाणी शिरूरला विजयासाठी मदत करण्याचं काम केलं.

वंचित बहुजन आघाडीमुळं राष्ट्रवादी आणि काँग्रेस आघाडीला आठ ते दहा जागांवर नुकसान झालं. लोकसभा निवडणुकीत जनादेश हा आपल्या बाजूला होता. पण मतविभागणीत या आठ ते दहा मतदारसंघांत आपल्याला त्याचा फटका बसला. आता जे झालंय ते झालेलं आहे, ते आपण दुरूस्त करू शकणार नाही. विधानसभेच्या निवडणुका आता शंभर दिवसांवर येवून ठेपलेल्या आहेत. महाराष्ट्रात अनेक प्रश्न आहेत. दुष्काळाच्या झळा आजही महाराष्ट्रातला ग्रामीण भागातला माणूस सोसतोय. राज्यभर दुष्काळ आहे. बेरोजगारीने कळस गाठलेला आहे. राज्यावरचं कर्जाचं प्रमाण वाढलेलं आहे. गेल्या पाच वर्षात राज्य प्रचंड अशा अडचणींतून जातंय आणि लोकांच्या जीवनावरदेखील नकारात्मक परिणाम झालेला आहे. जीएसटीचा परिणाम, नोटबंदीचा परिणाम आपण माणसांना सांगत राहिलो, लोकांनी वेगळी दिशा मघाशी सांगितली तशी घेतली, मुद्दे प्रभावी झाले नाहीत, पण लोकांना हे माहिती आहे आणि अनेक व्यापाऱ्यांशी जरी तुम्ही बोललांत, तरी नोटबंदी आणि जीएसटीबद्दल आजही ते नकारात्मक भूमिका घेतात. त्यामुळं साधारणपणानी महाराष्ट्रामध्ये, जे शंभर दिवस आपल्याकडे राहिले आहेत, त्या शंभर दिवसांत लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रभावी प्रयत्न आपल्या सगळ्यांना केला पाहिजे.

लोक म्हणतात, की लोकसभेला आता हे असं, विधानसभेला कसं? रोज देवेंद्र फडणवीस सांगतात, की 220, 225 जागी आम्हाला लीड आहे. आमच्या एवढ्या जागा निवडून येतील आणि त्यामुळं प्रत्येकाच्या मनात शंका आहे, की पन्नास हजाराचं लीड आहे, तीस हजाराचं लीड आहे. आता कसं होणार? मला वाटतं, की इथं अनेक मान्यवर बसलेले आहेत, मघाशी राजेश टोपेंचं उदाहरण सांगण्यात आलं. मागच्या लोकसभेच्यावेळी त्यांचा मतदारसंघ 25 ते 30 हजारांनी मायनस होता आणि निवडणूक झाल्यावर 43 हजारांच्या मताधिक्यानं ते विजयी झाले. मलाही पवार साहेबांनी 2014ला मंत्रिमंडळाला बोलावलं, त्यावेळी मला विचारलं, की तुझ्या मतदारसंघात काय? राजू शेट्टींना 23 हजारांचं मताधिक्य होतं, मी साहेबांना सांगितलं, की मी पडू शकतो. कारण पहिल्यांदाच मायनस झालेलं आहे आणि मी प्रत्येक गल्लीबोळात पंधरा एक दिवस खर्च केले आणि मला परत 75 हजाराचं मताधिक्य त्याठिकाणी प्राप्त झालं. हे प्रत्येकाच्या ठिकाणी होवू शकतं. ही निवडणूक मोदी विरूद्ध कोणच नाही, अशी झाली. समोर फेसच नव्हता मोदीला. पण याठिकाणी तुम्हा प्रत्येक उमेदवाराचा, आपल्या सगळ्यांचा फेस आहे, तुमचं तिथलं काम आहे, त्यामुळं आता मतदार जसं नगरपालिकेला राज्यात वेगळा विचार करतात, जिल्हा परिषदेला करतात, विधानसभेलाही तसाच वेगळा विचार महाराष्ट्रात होवू शकतो. गरज आहे, ती नाउमेद न होता आपण पूर्ण ताकदीनं

येणाऱ्या निवडणुकीत आपली तयारी करण्याची.

खरं म्हणजे हा जो जनादेश मोदी साहेबांना मिळालांय, मी अनेक ठिकाणी सांगतो, की फारसा जल्लोष मला कुठे दिसला नाही. म्हणजे हा अस्सल जनादेश आहे याची खात्री त्यांनाही वाटेना झालेली आहे. त्यामुळे मोदीभक्त म्हणून जो वर्ग आहे, तोही फार म्हणजे 230, 270, 280 जागा मिळाल्या असत्या तर कदाचित त्यांनी आनंद व्यक्त केला असता, पण एवढ्या जागा मिळालेल्या आहेत, की एवढा मोठा विजय मिळू शकतो हे भारतीय जनता पक्षातल्या खालच्या स्तरावरच्या कार्यकर्त्यांनाही कदाचित मान्य नसेल आणि त्यामुळं मला महाराष्ट्रात जल्लोष कुठं दिसत नाही. त्यासाठी आपण सगळ्यांनी पूर्ण ताकदीनं जर काम केलं, तर निश्चितपणानं महाराष्ट्राच्या मनात जे आहे, ते मतदान पुन्हा आपल्याला झाल्याशिवाय राहणार नाही.

आपल्याकडे असंख्य चांगले दमदार नेते आहेत. पूर्ण ताकदीनं, एकजिनसीपणानं काम करायचं ठरवलं तर निश्चितपणाने आपण महाराष्ट्रामध्ये एक चांगलं वातावरण तयार करू शकतो.

आपण खरं म्हणजे आपल्या प्रचारातच कमी पडतो. पंधरा वर्षात आपण जे काय लोकांना दिलं, ते सांगायला आपण कमी पडतो. आपण आपल्या प्रचारात मागचं सगळंच विसरतो आणि समोर झालेल्या आरोपांना उत्तरं देत बसतो. पण आपण खरं म्हणजे लोकांना जावून हे सांगितलं पाहिजे, की देवेंद्र फडणवीसांच्या सरकारनी या राज्यामध्ये काय ॲचिव्हमेंटस् केल्या. उलट राज्य मागं मागं जातंय. राज्याच्या प्रगतीच्या दृष्टिनं काय विशेष काम या सरकारनी केलेलं नाही. हे सगळे मुद्दे आम्ही पक्ष म्हणून आपल्या हातात देवू. पण त्याचबरोबर आपण आम्ही काय पंधरा वर्षात केलं आणि आपण यानिमित्तानं लोकांच्यामध्ये जावून हे सांगितलं पाहिजे, की यांच्यापेक्षा पंधरा वर्षांत राज्याची प्रगती अधिक वेगानं आम्ही केली.

आपण यावेळी जागा कमी उभ्या केल्या, तरीही आपली मतं पॉईंट सहा टक्क्यांनी फक्त कमी झालेली आहेत. मतं कमी झालेली आहेत, पण आपले उमेदवारही कमी होते आणि काँग्रेस पक्षाची सव्वा दोन टक्क्यांनी मतं कमी झालेली आहेत. भारतीय जनता पक्षाला मिळालेली मतं जवळपास तेवढीच आहेत. त्यात कुठलाही फरक नाहीये. पण शिवसेनेला मिळालेली मतं दोन ते अडीच टक्क्यांनी वाढलेली आहेत. त्यामुळं या मतदानाची आकडेवारी बघितली तर आपल्याला साधारणपणे प्रत्येक विधानसभा मतदारसंघात आठ ते दहा टक्क्याचा स्विंग तयार करण्याचं काम करावं लागेल. तुम्ही लोकसभेच्या मतदानावर जावू नका, पण आपण जर हे करू शकलो आठ ते दहा टक्क्याचा स्विंग तर आपली ताकद ही महाराष्ट्रात सगळ्यात मोठा पक्ष म्हणून येवू शकते.

आज आपण पंधरा, साडेपंधरा टक्क्यांवर आहोत. साधारणपणे बावीस टक्क्यांवर जर आपण पोहोचलो तर मला वाटतं, की आपली फार मोठ्या संख्येनी महाराष्ट्रात विधानसभेला जागा आल्याशिवाय राहणार नाहीत. आणि म्हणून आपल्याला लगेच कामाला लागायला पाहिजे आणि लागायचं असेल तर आम्ही सगळ्या महाराष्ट्रातल्या पक्षांशी अजितदादा, भुजबळ साहेब, आम्ही महाराष्ट्रातल्या सगळ्या पक्षांना एकत्रित केलेलं, त्यांनाही आम्ही सांगितलेलं आहे, की जे काही निर्णय असतील ते लगेच झाले पाहिजेत, वेळ घालवता कामा नये, आणि म्हणून आमचा प्रयत्न आहे, की आठ ते बारा दिवसांत जागावाटपावर वेळ न घालवता निर्णय लागला पाहिजे, कुणाला कुठली जागा मिळणार हे शक्यतो ठरवण्याचा काळ आहे. जर दोन-चार जागांचा वाद असेल तर त्या जागा बाजूला ठेवू, पण बाकीच्या



सगळ्यांना कामाला लावू, अशा पद्धतीनं आपल्याला काम सुरू करावं लागेल. त्यासाठी आपल्याला उमेदवारांच्यापर्यंत योग्य उमेदवार निवडीचं काम करावं लागेल.

आम्ही सगळे असा विचार करतोय, की राज्यातले जे काही प्रमुख नेते आहेत, त्यांना काही जिल्हे वाटून देवू. आणि ते प्रमुख नेते त्या त्या जिल्ह्यात जावून, त्या त्या मतदारसंघात जावून कार्यकर्त्यांशी संवाद साधतील आणि लोकांचं काय मत आहे, सध्याच्या परिस्थितीबद्दल काय, आणि त्याठिकाणी आपला सगळ्यात बेस्ट कँडिडेट कोण होवू शकतो याच्याविषयी साधारणपणे निष्कर्ष काढण्याचं काम करतील आणि मग पुढं केंद्रस्तरावर त्याच्याबाबत विचारविनिमय केला जाईल. पण लवकर निर्णय घेण्याच्या दृष्टिनं ताबडतोबीनं पुढच्या आठ-दहा दिवसांत महाराष्ट्रात सगळे प्रमुख आम्ही त्यांची जबाबदारी त्यांना

देवून सगळ्या प्रमुख नेत्यांना वेगवेगळ्या मतदारसंघात जाण्याची विनंती करणार आहोत. आपण जे मतदारसंघ लढवण्याची शक्यता आहे, अशा सर्व मतदारसंघात सर्व प्रमुख जावून उमेदवाराच्या बाबतीत सल्लामसलत करून त्यातल्या त्यात जे शक्य आहे, जो बेस्ट उमेदवार आहे त्याचं नाव काढण्याचा प्रयत्न आपण करू. आपल्याला जास्त नवे चेहरे देण्याची यावेळीही संधी येणार आहे. शेवटी पक्षाचा तरूण फेस असला पाहिजे आणि म्हणून जास्तीत जास्त नवे चेहरे उमेदवार म्हणून देण्यासाठी आदरणीय



सातारा लोकसभा मतदारसंघातून विजयी झालेले खासदार श्रीमंत उदयनराजे भोसले यांचा जयंत पाटील पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना.

पवार साहेब गेला आठवडाभर हा आग्रह करतायंत, की नवीन चेहरे देण्याचा आग्रह आपण धरला पाहिजे. ज्या ठिकाणी आपला वयस्कर झालेला चेहरा आहे, जास्त चालणार नाही अशी शंका आहे, त्याठिकाणी नव्या चेहऱ्याला संधी देण्याचं काम, तरूणांना जास्तीत जास्त संधी देण्याचं काम आपण महाराष्ट्रात करूया ही भूमिका आपण स्वीकारली पाहिजे.

शेवटी आपण हे सगळं करत असताना मला खात्री आहे, की प्रत्येकजण आपापल्या मतदारसंघात खंबीर आहे. आता आमच्या मुश्रीफ साहेबांचा मतदारसंघ मोठ्या प्रमाणात मायनस गेलेला आहे, पण जरी गेलेला असला तरी ज्यावेळी स्वत: मुश्रीफ उभे राहतील त्यावेळी मला खात्री आहे की त्याठिकाणच्या सामान्य माणसाचा त्यांना निश्चितच पाठिंबा मिळेल. त्यामुळं माझी आपणाला विनंती आहे, की आपण सगळ्यांनी याठिकाणी पूर्ण ताकदीनं कामाला सुरूवात केली पाहिजे. मला आपल्याला सगळ्यांना ही विनंती करायची आहे, मी सगळ्या पदाधिकाऱ्यांना पत्रं पाठवलेली आहेत, की तुमच्या बूथवर मतं किती पडली हे आम्हाला लेखी कळवा. अजून फारसं कुणी कळवलेलं नाहीये. महाराष्ट्राची जी कार्यकारिणी आहे, जिल्ह्याची कार्यकारिणी आहे आणि जी तालुक्याची कार्यकारिणी आहे त्या सगळ्यांनी ही माहिती द्यावी, ती यासाठी की जयंत पाटील जिथं राहतो, त्याठिकाणी जो बूथ आहे त्याच्यावर त्याला मतं किती. कमी पडली असतील तरी द्या. किमान तुम्हाला त्या बुथचा अध्यक्ष माहित आहे का? मी विचारलं आहे त्या पत्रात. तुमच्या बुथवर कमिटी नसेल तर तुम्ही किमान ती करा. अशा आशयाची साधारण प्रश्नावली मी सर्वांच्याकडं पाठवलेली आहे. आता त्या प्रश्नावलीच्या उत्तरांची थोडे दिवस वाट बघणार आहे, ज्यांची उत्तरं येतील त्यांनाच मला वाटतं, मिटिंगला बोलावलेलं बरं. कारण ज्याला आपली माहिती देण्याचीच इच्छा नसेल तर त्याला निमंत्रण देणं अवघड जाईल. त्यामुळं मी पुन्हा एक रिमाईंडर पाठवणार आहे.

आपल्याला पक्षातही अमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणं जो कामाचा आहे, त्याला प्राधान्य देणं, अनेक नवीन तरूण चेहरे आहेत, त्यांना राज्य पातळीवर संधी देण्याचं काम आपल्याला आता करायचं आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा ताकदीनं उभा करण्याचं काम आपण सगळ्यांनी ताकदीनं केलं पाहिजे. त्यामुळं नव्या चेहऱ्यांना, ताकदीच्या नव्या रक्ताला संधी देण्याचं काम हे आपण येणाऱ्या काळात करायचंय आणि मला खात्री आहे, की आपल्या सगळ्यांचं सहकार्य त्यासाठी आम्हा सगळ्यांना मिळेल, आपल्या पक्षाला मिळेल. हे करत असताना माझी आपल्याला एकच विनंती आहे, की येणारा 12 डिसेंबर हा पवार साहेबांचा 80वा वाढदिवस आहे आणि आपण सगळ्यांनी मनात आणलं तर 80 आमदारांची भेट आपण पवार साहेबांना देवू. 80च्या खाली जागा येणार नाही, याची काळजी आपण सर्वांनी करून ताकदीनं काम करावं, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



सकाळी दहा वाजता मिटिंग होती आणि त्यावेळी मी आणि दिलीप वळसे पाटील जवळ बसलो होतो आणि सातत्याने त्यांना फोनवर मेसेज येत होते, की असा कसा निर्णय घेता. बाहेर चर्चा चालली होती, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणत्या पक्षामध्ये विलिन करायची यावर गहन चर्चा चालली आहे. आपण सर्वजण जीवाभावाचे सहकारी आहात, साहेबांच्यावर आतोनात प्रेम करणारे आहात. मी एवढंच सांगतो, की कुठल्याही परिस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा आपलं स्वत:चंच अस्तित्व ठेवणार आहे, कुठंही जाणार नाही.

पेपरमध्ये सतत बातम्या असतात, की विरोधी पक्ष नेतेपद अमक्याला मिळणार, राष्ट्रीय अध्यक्ष तमका होणार, फलाना अमकं होणार, तमकं होणार. तुम्हाला सगळ्यांना आठवत असेल, की 1999 साली ज्यावेळेस पवार साहेबांनी, संगमाजींनी, तारिक अन्वर साहेबांनी सगळ्यांनी मिळून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, त्याही वेळेस निवडणुकीच्या काळामध्ये पिचड साहेबांना, भुजबळ साहेबांना आठवत असेल, त्यावेळेस दोघेही विधिमंडळाचे प्रमुख नेते होते, त्यावेळेस पण आपला पक्ष निवडून आल्यानंतर भारतीय जनता पक्षाबरोबर जाणार अशा प्रकारची एक कारण नसताना बातमी सोडलेली होती आणि आत्ताच्याही काळात या शंभर, सव्वाशे दिवसांमध्ये अशा प्रकारच्या बऱ्याच बातम्या ऐकायला मिळतील. आपण ठामपणे सांगितले पाहिजे, की हे धांदांत खोटे आहे. हे निव्वळ दिशाभूल करणारं आहे. याच्यामध्ये तसभूरदेखील तथ्य नाही. ही भूमिका प्रत्येकानं त्याठिकाणी घेतली पाहिजे. म्हणजे या गोष्टीचा बंदोबस्त होईल आणि परतदेखील अशा प्रकारची चर्चा करण्याचं धाडस कुणी करणार नाही, हे मला आपल्या सगळ्यांना सांगायचंय.

आपण पाहा. आत्ता विरोधी पक्षनेत्याचं पद रिकामं आहे. त्याची पण चर्चा सुरू झाली. परंतु, परवा भुजबळ साहेब, जयंतराव, धनंजय, सुनील तटकरे साहेब आम्ही सगळे बसलो होतो. आता राहिलेत दिवस तीन ते चार महिने, आत्ता राधाकृष्ण



# विधानसभेसाठी अधिक जोमाने कामाला लागूया

## अजित पवार

विखे पाटलांच्याबरोबर एक गट हा भारतीय जनता पक्षामध्ये जावू पाहतोय हे लवकरच या जून महिन्यामध्ये आपल्याला कळेल. परंतु, आत्ता हे करत असताना केंद्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात भारतीय जनता पक्ष सत्तेवरती आलेला आहे. राज्यामध्ये त्यांना 220चा आकडा सतत डोळ्यासमोर येतोय. या सगळ्या गोष्टी करत असताना आपल्यातल्या पण काही लोकांना, विशेषत: आमदारांना संपर्क साधण्याचा प्रयत्न ती मंडळी करतायंत. आपल्यामध्ये जयदत्त क्षीरसागर, विजयसिंह मोहिते पाटील आणि सुजय विखे या तिघांनाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उमेदवारी देत होतो, मी प्रांताध्यक्षांच्या देखत तुम्हाला सगळ्यांना सांगतो. या तिघांनीही उमेदवारी नाकारली आणि त्यांनी तशा प्रकारची भूमिका त्याठिकाणी घेतली.

कधी कधी काय होतं, की पेपरच्या बातम्या बघून तुम्हाला लक्षात येत नाही, की नक्की काय चाललंय आणि काय नाही. काही जणांची मानसिकता दुसऱ्या पक्षामध्ये जायची झाल्यानंतर त्यांना काहीना काही निमित्त पाहिजे असतं आणि ते निमित्त शोधण्याच्याकरता काही एक वेगळ्या प्रकारचा बाऊ लोकांच्यासमोर आणि कार्यकर्त्यांच्यासमोर निर्माण करण्याचा प्रयत्न काहीजण जाणीवपूर्वक करतात. याही गोष्टी आपण सर्व सहकारी मित्रांनी ध्यानामध्ये घेतल्या पाहिजेत. दुर्दैवानं आपले आमदार हनुमंतराव डोळस आपल्याला सोडून गेले. त्यांनाही मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मागच्याच वेळी एका मिटिंगमध्ये आपण त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. पण इथून पुढच्या काळामध्ये साधारण निवडणुकीच्या निमित्तानं सामोरं जात असताना लोकसभेचा जो निकाल लागला आहे, आणि त्याच्यामध्ये बऱ्याच सिटिंग आमदारांच्या मतदारसंघांमध्ये आपण मायनस आहोत. पण त्याला काही घाबरण्याचं कारण नाही. मी तर बऱ्याचदा, दिलीप वळसे पाटलांना आठवत असेल, की खेड लोकसभा मतदारसंघ असताना 60-60 हजार मायनस असताना खेड विधानसभा मतदारसंघ चार महिन्यांनी 30 हजार

प्लस व्हायचा आणि तिथं आपला उमेदवार त्याठिकाणी निवडून यायचा. अशाही घटना घडलेल्या आहेत अनेक ठिकाणी. त्याच्यामुळं जरी हसन मुश्रीफ साहेबांचा मतदारसंघ 70 हजार मायनस असेल, कुपेकर ताईंचा मतदारसंघ जवळपास 50 हजार मायनस असेल, सुमनताईंचाही असाच मोठ्या प्रमाणावर मायनस आहे, असं काहींचं जरी असलं तरी आपण इथून पुढच्या काळामध्ये लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्तानं देशातल्या बहुतांशी जनतेनी आम्हाला नरेंद्र मोदींना पंतप्रधान करायचंय आणि त्यांना पंतप्रधान करण्याच्याकरता कुठले चिन्ह आहे, तर कमळ आहे का, कमळ नसेल तर धनुष्यबाण आहे का एवढंच बघितलं आणि तिथं मतदान केलं. अशा प्रकारचा अनुभव आपण सगळ्या ठिकाणी घेतलेला आहे.

म्हणजे याच निवडणुकीत तसं करतील अशातला भाग नाही. कारण तीन ते चार महिन्यांपूर्वी छत्तीसगड, राजस्थान आणि मध्य प्रदेश या निवडणुका झाल्या. तिथं तिन्ही ठिकाणी काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत. छत्तीसगडला टोटल मेजॉरिटी काँग्रेसला मिळाली, तरी तिथं खासदार किती निवडून आले हे तुम्ही सगळेजणं पाहतांय. म्हणजे जनता लोकसभेच्यावेळी वेगळा विचार करतेय. तीन महिन्यांपूर्वी विधानसभेला वेगळा विचार करतेय. त्यामुळे उद्याच्याही चार महिन्यांनी येणाऱ्या निवडणुकीमध्ये निश्चितपणे तसा विचार केल्याशिवाय राहणार नाही.

दुष्काळाचे सावट आहेच. कर्जबाजारीपणा आहेच. बेरोजगारी प्रचंड मोठ्या प्रमाणावर आहे. शेतकरी हवालदिल झालेला आहे. या सगळ्या गोष्टी आपल्या सर्वांच्या समोर आहेत. आणि आता जास्त आक्रमकपणे लोकांच्यासमोर जाण्याचं काम आपल्याला सगळ्यांनाच करावं लागेल. हे एकट्या दुकट्याचं कुणाचं काम नाही आणि हे करत असताना भाकरी फिरवणार, बदल होणार असं आज पेपरमध्ये आहे. म्हणजे असं दाखवलं जातं, की आज खरं तर प्रांताध्यक्षही बदलणार आहेत, सगळंच बदलणार आहेत, काही होणार आहे. या ज्या काही बातम्या सातत्यानं पसरवल्या जातायंत, त्याच्यातनं शेवटचा जो कार्यकर्ता आहे, त्याच्या मनामध्ये एक प्रकारची संभ्रमावस्था निर्माण होते. जरूर पक्षाच्या प्रांताध्यक्षांनी किंवा मान्यवरांनी नंतर पवार साहेब सुद्धा भाषण करणार आहेत, परंतु साधारण काही नवे चेहरे देण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसचा उद्याच्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं आहे.

मधल्या काळामध्ये भुजबळ साहेब, जयंतराव, सुनील तटकरे, धनंजय, मी, दिलीपराव आम्ही सगळेजण बसून, त्याच्यामध्ये काँग्रेसचे अशोकराव, रणपिसे, वडेट्टीवार, समाजवादी पार्टीचे अबु आझमी, शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील, गणपतराव देशमुख, सीपीएम, सीपीआय, आरपीआय गवईचे राजेंद्र गवई, आरपीआय कवाडे गटचे जोगेंद्र कवाडे, बहुजन विकास आघाडीचे हितेंद्र ठाकूर, युवा स्वाभिमानी पक्षाचे रवी राणा आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, आपण समविचारी लोकांना एकत्र आणून मताची विभागणी होवू नये, म्हणून जे काही करता येणं शक्य असेल ते प्रांताध्यक्षांच्या लेवलला, राज्याच्या लेवलला करण्याचा आपल्या त्याठिकाणी प्रयत्न मनापासूनचा चालू आहे. त्याला किती साथ मिळेल हे आत्ता मी सांगू शकत नाही. परंतु, जेवढी त्याच्यामध्ये बेरीज करता येईल, ती बेरीज करण्याचा आपला त्याठिकाणी प्रयत्न आहे आणि त्याच्यातून जागावाटप करायचं आणि ते लवकर करून आपण आपल्या कामाला लागायचं अशा प्रकारची साधारण सूत्र आपण ठरवलेलं आहे.





स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पण, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकेच्या निवडणुका आहेत. आपण वेगवेगळ्या जिल्ह्यांतून येता. त्याच्यावर आपापल्या जिल्ह्यात जिथं निवडणुका आहेत. तिथं आता 3 तारखेला फॉर्म भरायला सुरूवात होणार आहे. त्याची पण व्यवस्था आपल्याला त्याठिकाणी करावी लागेल. त्याच्याहीबद्दलची नोंद ही आपण सगळ्यांनी आजच्या मिटिंगच्या निमित्तानं घ्यावी. त्याचबरोबर आत्ता कर्नाटकामध्ये, तिथं कुमारस्वामी मुख्यमंत्री असतानाही लोकसभेचा निकाल कसा लागला हे तुम्ही पाहिलं. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तिथं बॅलेट पेपरवरती झाल्या, तिथं बहुतांशी ठिकाणी काँग्रेस आणि कुमारस्वामी, देवेगौडांचा जनता पक्ष सेक्युलर हा तिथं सत्तेवरती आलेला आहे. लोकसभेचं मतदान 23 तारखेला झालं, स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुका 28 तारखेला झालं. लोकसभेला भाजपला निवडून दिलं आणि स्थानिक स्वराज संस्थेला काँग्रेस आणि जनता दल सेक्युलर यांना निवडून देण्याचं काम त्या भागातल्या जनतेनी केलेलं आहे. ही पण गोष्ट आपण यानिमित्तानं लक्षामध्ये घ्यावी.

मघाशी एक चर्चा होताना अशी पण झाली, की ईव्हीएम मशीन, जर आपण सुप्रीम कोर्टापर्यंत गेलो, त्याच्यामध्ये अनेक पक्षातल्या मान्यवरांनी त्याठिकाणी प्रयत्न केला, पण निवडणूक आयोगाने ऐकलं नाही, सुप्रीम कोर्टानं ऐकलं नाही. पण मघाशी सुचवत असताना नवाब मलिक साहेबांनी सांगितलं, की त्याच्यामध्ये एक नियम आहे, 63पेक्षा जास्त उमेदवार एका विधानसभा मतदारसंघातून उभे असतील, तर तिथं ईव्हीएम मशीन लावलं जात नाही. तिथं पूर्वीसारखा बॅलेट पेपर घेतला जातो. त्याच्यावर ज्यांना शंका येते, कोरेगावकरांना शंका असेल तर त्यांनी 63पेक्षा जास्त उमेदवार त्याठिकाणी द्यावेत. त्याच्यामध्ये एवढ्या सगळ्यांना खर्च फक्त करावा लागेल. हा उपाय त्याच्यामध्ये होवू शकतो. हेही आपण लक्षात घ्या.

त्याच्यासंदर्भात एकंदरीतच वेगवेगळ्या गोष्टी ज्या चालू आहेत, मी आपल्या सगळ्यांचा जास्त वेळ घेत नाही, परंतु पराभव हा पराभवच असतो. परंतु, पराभवाचे खचून न जाता, नाउमेद न होता आता मोठ्या उमेदीनं, मोठ्या जिद्दीनं, उद्याच्या 17 तारखेपासून आमचं अधिवेशन सुरू आहे, अधिवेशनाच्या निमित्तानं आपण सगळेजणं खालच्या सभागृहात, वरच्या सभागृहामध्ये योग्य पद्धतीची भूमिका मांडण्याचं काम आणि जे महत्त्वाचे प्रश्न आहेत, ते सगळे तिथं कसे आणता येतील आणि त्याच्यातनं या सरकारच्या संदर्भामधले वाभाडे काढण्याचे काम कसं करता येईल, हे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि सगळे मित्र पक्ष मिळून त्याठिकाणी करतीलच, याबद्दल कुणी मनामध्ये शंका-कुशंका ठेवायचं कारण नाही. जरी एखादा ग्रुप काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षामध्ये गेला, तर तुमच्या कुणाच्या मनामध्ये येईल, की आपण विरोधी पक्षनेतेपद मागावं. आपण ठरवलंय, की विरोधी पक्षनेतेपदाच्या इथं आपण काही लक्ष घालायचं नाही. कारण नसताना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर पडू नये, वेळ पडल्यास काँग्रेसला कुणाला द्यायचं असेल तर ते द्या अशा प्रकारची मानसिकता जयंतराव, भुजबळ साहेब, आम्ही सगळ्यांनी केलेली आहे. ती पण गोष्ट मनातून काढून टाका, नाहीतर लगेच बेरजा, वजाबाक्या करत बसाल. विरोधी पक्ष नेतेपद घेण्याच्यापेक्षा उद्याच्या येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं जास्तीत जास्त जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कशा निवडून येतील, याकरता आपण अधिक जोमानी कामाला लागूया, हीच विनंती यानिमित्तानं आपल्याला सगळ्यांना करायची आहे. जे निवडून आले, त्यांचं कौतुक करतो, त्यांच्या पुढच्या वाटचालीला शुभेच्छा देतो. ज्या ठिकाणी पराभव झाला, त्याठिकाणी खचून न जाता कशा पद्धतीनं यश मिळवता येईल यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करूया, हीच अपेक्षा व्यक्त करतो आणि आपली रजा घेतो.

# सोशल मीडियावर टार्गेट ओरिएंट ॲप्रोच हवा

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे विचार



प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील साहेबांनी जे मनोगत व्यक्त केलं, यातल्या बराचशा गोष्टी मी शिकण्याच्या फेजमध्ये असल्यामुळे यात अनेक गोष्टी आत्मसात करतोय. या निवडणुकीत ज्या पद्धतीनं आदरणीय पवार साहेबांविषयी जी भावना सगळ्यांनी व्यक्त केली, माझ्यासाठी एक फार मोठं गूढ होतं, माझ्यासाठी फार मोठं कोडं होतं, की आदरणीय पवार साहेबांनी जो विश्वास टाकला आणि तो विश्वास टाकल्यानंतर विशेषत: शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये आदरणीय अजितदादा असतील, दिलीपराव वळसे पाटील साहेब असतील या दोघांनी जातीनं लक्ष घालून शिरूरमधला जो विजय आहे, या विजयाविषयी मी कायम प्रामाणिकपणे असं सांगतो, की मी फक्त एक निमित्त होतो. पण शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये आदरणीय साहेबांचं मार्गदर्शन, अजितदादा आणि वळसे पाटील साहेबांची रणनीती आणि जो एकजिनसीपणा कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक नेत्यांमध्ये बघायला मिळाला हा आत्तापर्यंत ऐकण्यात आलेला, पाहण्यात आलेल्या एकजिनसीपणापेक्षा खूप वेगळा एकजिनसीपणा होता हे प्रामाणिकपणे नमूद करावे लागेल.

मघाशी सांगण्यात आल्याप्रमाणे, विधानसभेला सामोरं जात असताना जर 2014 आणि 2019 यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या वाढलेल्या मतांचा टक्का बघितला, तर खरोखर हा समजून घेण्याचा विषय आहे असं मला वाटतं आणि तो म्हणजे वाढलेल्या मतांमध्ये नवमतदार किती प्रमाणात आहे हा मुद्दा आणि वाढलेली मतं यांचा आकडा खूप जवळ जाणारा आहे, असं माझ्या निदर्शनास आलं. शिरूरमधल्या निकालानंतर मतदारांचा एक आढावा घेतल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी जयंत पाटील साहेबांनी मला फोन करून विचारलं, की नक्की ऑब्झर्वेशन काय आणि मागच्या बैठकीत साहेब जे जयंत पाटील साहेबांनी बूथ प्रमुखांची किती टक्केवारी आहे, ती जर बघितली तर बूथ प्रमुखांची टक्केवारी आणि त्या त्या मतदारसंघात

मिळालेलं मताधिक्य किंवा कमी राहिलेली बाजू ही खूप जुळते असं मला वाटतं आणि त्यामुळे जयंत पाटील साहेब म्हणतात, त्याप्रमाणे बूथ प्रमुखांची बांधणी आणि त्याचबरोबर तितकंच महत्त्वाचं बूथ प्रमुखांचं ट्रेनिंग या दोन गोष्टी गरजेच्या आहेत, असं मला वाटतं.

सोशल मीडियाचा वापर करताना एक गोष्टी जी निदर्शनास आली, ती गोष्ट पाळण्याचा प्रयत्न केला गेला. म्हणजे ही निवडणूक फॉलो करत असताना मी खरं तर खूप जास्त बारामती फॉलो करत होतो. बारामती लोकसभा मतदारसंघ मी खूप बारकाईने फॉलो करत होतो. त्यामध्ये सुप्रियाताईंची रणनीती, सुप्रियाताई ज्या पद्धतीने प्रचाराची एक रणनीती आखत होत्या त्याला फॉलो करण्याचा एक वेगळा पॅटर्न हा समोर येताना दिसला. सोशल मीडिया फॉलो करत असताना अनेकांनी मला



विचारलं, की शिरूर लोकसभा मतदारसंघातला सोशल मीडिया नक्की कसा फॉलो झाला. तर त्याचं एक साधं सोपं गणित असं होतं, की नक्की कधी कुठल्या मुद्यावर टार्गेट करायचंय, सोशल मीडिया म्हणजे केवळ सुप्रभात, शुभ रात्री, सण याच्या पलिकडं जावून सोशल मीडिया टार्गेट करावा, असं मला प्रामाणिकपणं वाटतं. त्यामध्ये सोशल मीडिया करत असताना नक्की सोशल मीडियाचे जे भाग आहेत, ट्विटर असेल, फेसबुक असेल, इन्स्टाग्राम असेल, स्नॅपचॅट असेल, व्हॉटस्ॲप असेल यामध्ये नक्की आपल्या मतदारसंघातला कुठला वर्ग व्हॉट्सॲप वापरतो, कुठला वर्ग ट्विटर वापरतो, कुठला वर्ग यू-ट्यूब फक्त बघत राहतो हे बघणं अत्यंत गरजेचं होतं, असं मला वाटतं.


हे बघत असताना ज्या दिवशी, ज्या भागात जो मुद्दा आपल्याला उचलायचा आहे, त्या दिवशीचं सोशल मीडियाचं हॅमरिंग हे संपूर्णपणे त्या मुद्यावर जर केंद्रीत झालं, मला वाटतं, याला टार्गेट ओरिएंट ॲप्रोच असं आपण म्हणतो. जेव्हा टार्गेट ओरिएंटेड ॲप्रोच ज्यावेळी सोशल मीडियावर होतो, तेव्हा तो सोशल मीडिया सगळ्यात जास्त प्रभावी होतो. कारण सोशल मीडिया हॅंडल करणाऱ्या अनेक एंजन्सींज समोर येत असताना जोपर्यंत त्याला पर्सनल टच मिळत नाही तो एकदा पर्सनल टच मिळाला, कारण तुम्ही सगळेजण दिग्गज आहात. तुम्ही सगळेजण त्या त्या भागातले ते ते स्थानिक प्रश्न हे अत्यंत बारकाईने जाणता आणि ते जर जाणून आपण या निवडणुकीला सामोरं गेलो, तर मला वाटतं, की जो सगळ्यांचा आशावाद आहे, जो जयंतराव पाटील साहेबांनी आशावाद व्यक्त केला, तो आशावाद या विधानसभेमध्ये नक्की खरा ठरेल आणि आदरणीय पवार साहेबांना आपण ८० आमदारांची भेट ही नक्की देवू असा एक आत्मविश्वास व्यक्त करतो आणि तुमच्या सगळ्यांच्या खांद्याला खांदा लावून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा एक कार्यकर्ता म्हणून पक्षनेतृत्व देईल ती जबाबदारी सांभाळण्यासाठी मी कायम तयार राहीन अशी मी ग्वाही देतो, धन्यवाद.



जलयुक्त शिवार योजनेमुळे ग्रामीण महाराष्ट्राचा पाणीप्रश्न सुटून तो टँकरमुक्त होईल, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आशावाद पोकळ आणि भ्रामक ठरला असून या योजनेमुळे राज्याचे फार मोठे व कधीही न भरून येणारे अशा प्रकारचे नुकसान झाले आहे.

# जलयुक्त शिवार

- डॉ. सुधीर भोंगळे



# विदारक वस्तुस्थिती

जलयुक्त शिवार योजनेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. गावे टँकरमुक्त होतील. पिण्याच्या पाण्यासाठी माणसांना व जनावरांना वणवण करावी लागणार नाही. महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणारी आणि मोठ्या धरणांना पर्याय असणाऱ्या या जलयुक्त शिवार योजनेमुळे कमी पैशात अधिक पाणी साचेल. जास्त लोकांना व जास्त शेतीला पाणी मिळून लगेचच दुसऱ्या वर्षीपासून कामांचा प्रभाव दिसू लागेल. भूगर्भातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर पुनर्भरण होऊन विहिरी, बोअरवेल्स, बारव, आड, कूपनलिका, हातपंप यांना प्रचंड पाणी लागेल. महाराष्ट्रातून कायमचा दुष्काळ हटविणारी अशी ही जलयुक्त शिवार योजना आहे, या व अशा शब्दांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेचे कौतुक व प्रचंड भलावण केली होती. आज या योजनेची महाराष्ट्रात काय अवस्था आहे व तिची अंमलबजावणी कशा प्रकारे झाली आहे याचा संक्षिप्त व धावता आढावा प्रत्यक्ष कामांना भेटी देऊन येथे घेतला आहे.













महाराष्ट्रात जवळपास गेली 70 वर्षे रोजगार हमी, मृद संधारण व अन्य योजनांमधून पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम तुकड्या तुकड्याने आपण राबवित आलो आहोत. एकात्मिक दृष्टीकोन ठेवून माथा ते पायथा या शास्त्रीय तत्त्वावर आधारित मृद व जल संधारणाचे सर्व उपचार एकाच वेळी कामे सुरु करुन पूर्ण केले नाहीत त्यामुळे या पाणलोट विकास कार्यक्रमाचे सर्व फायदे आपल्याला प्राप्त होऊ शकले नाहीत. इतकेच नव्हे तर या पूर्ण केलेल्या कामांच्या देखभाल, दुरुस्तीकडे आपण कधीही लक्ष दिले नाही, शासनानेही त्यासाठी निधी दिला नाही. त्यामुळे चार-पाच वर्षानंतर पाणलोटातली सर्व कामे मूळ पदावर येऊन पूर्ववत म्हणजे जैसे थे परिस्थिती निर्माण झाली. सिसीटी गाळाने भरून गेली. लूज बोल्डर स्ट्रक्चर जागेवर राहिले नाही. डोंगरावर झाडे आणि गवत लावलेच नसल्यामुळे वाढण्याचा प्रश्नच नव्हता. जिथे कुणी झाडे लावली ती मोकाट जनावरांनी खाऊन टाकली किंवा पाणी घालून जगविण्याची व्यवस्था नसल्यामुळे जळून गेली. नदी, नाले, ओढे यात केलेले बंधारे गाळाने भरून गेले. कोण यातला गाळ काढणार? सगळी पात्रे उथळ झाली. बंधाऱ्यांची साठवण क्षमता कमी झाली. पडणारा पाऊस वेगाने वाहून जाऊ लागला. यातून बंधाऱ्यातला गाळ काढण्याची, ते खोदून खोल करण्याची व साठवण क्षमता साठविण्याची मोहिम सुरु झाली. श्री. सुरेश खानापूरकर आणि श्री. अमरीशभाई पटेल यांनी धुळे, शिरपूरच्या परिसरात नदी, नाले, ओढे 20 ते 40 फूट खोल खोदून, त्यांचे रुंदीकरण करुन त्यावर 200 ते 250 सिमेंट बंधाऱ्यांची साखळी उभी केली होती. शिरपूर पॅटर्न या नावाने प्रसिद्ध झालेला हा कार्यक्रम महाराष्ट्रभर राबवावा अशा प्रकारचा आग्रह अनेकांनी धरला होता. शिरपूर पॅटर्नच्या धर्तीवर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण याची कामे सुरु झाली होती. जलयुक्त शिवार योजना हा या कार्यक्रमातलाच एक भाग आहे. किंबहुना पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमातला तो एक उपचार किंवा एक अंश आहे. अर्थात त्या दृष्टीने त्याकडे न पाहता केवळ एका प्रशासकीय अधिकाऱ्याच्या आग्रहातून जलयुक्त गाव या उपक्रमाचे रुपांतरण जलयुक्त शिवारात झाले. 2014 मध्ये मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सत्तेवर आलेल्या सरकारला आपले काही वेगळेपण समाजापुढे ठेवायचे होते. त्यातून त्यांना ही योजना भावली व त्यांनी जलयुक्त शिवार योजनेचा जी.आर. काढला.

पारंपारिक आपली जी धरणे, कालवे, वितरीका, पोटचाऱ्या, लाभक्षेत्रातल्या विहिरी यांची जी सिंचनाची चौकट ब्रिटिश काळापासून किंबहुना त्याही अगोदरपासून बसलेली होती याला शह देण्यासाठी पर्याय म्हणून जलयुक्त शिवार योजनेचा प्रचंड उदोउदो व गाजावाजा करुन ही अगदी नवीन योजना आहे असे भूत उभे करण्यात आले. याला आणखीन एक कारण घडले होते म्हणा किंवा पार्श्वभूमी लाभली होती म्हणा. 2011-12 या वर्षात 70 हजार कोटी रुपये खर्च करुन फक्त 0.1 टक्का सिंचन निर्माण झाले असा खोटा डांगोरा पिटून सिंचन घोटाळ्याचे भूत उभे करण्यात आले. या घोटाळ्याच्या वादळाचा परिणाम म्हणून धरण कालव्यांची जलसंपदा विभागाची (पूर्वीचे पाटबंधारे खाते) जी पारंपारिक व्यवस्था होती ती पूर्ण बदनाम झाली. या सिंचन घोटाळ्याच्या संदर्भात भाजपानेच वारेमाप खोटेनाटे आरोप केले होते. त्यातला एकही आरोप ते मागील पाच वर्षात सत्तेवर असूनही सिद्ध करु शकले नाहीत. पण याचा विपरीत परिणाम जलसंपदा विभागाच्या कामकाजावर झाला. कामकाज पूर्णपणे ठप्प

झाले. कर्मचारी, अधकारी यांचे मनोधैर्य खचले. सिंचनाच्या या पारंपारिक पद्धतीला आडगळीत टाकले गेले. समाजामध्ये अगोदरच काही लोकांचा मोठी धरणे, कालवे यांना विरोध आहे. त्यात पाणलोट क्षेत्र विकास, जलयुक्त शिवारातले हौशे नवशे सहभागी झाले. मोठ्या धरण बांधणी कार्यक्रमाला विरोध करणारा सगळा गोतावळा एकत्र झाला आणि त्यांनी शासनाची तळी उचलून जलयुक्त शिवार योजनेचा बेलभंडारा आणि खोबरं सगळीकडे उधळायला सुरुवात केली.

या जलयुक्त शिवार योजनेत पुढील 12 कामांचा समावेश आहे.

विहिरींचे पुनर्भरण, ओढे-नाले-कालवे खोदणे व जोडणे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधणे, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती, जुन्या पाझर तलावांची व तलावांच्या सांडव्याची दुरुस्ती, तलावातील गाळ काढणे, साखळी सिमेंट बंधारे बांधणे, पाणलोट क्षेत्र विकास, सूक्ष्म सिंचनाचा वापर, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण, झाडे लावणे, वनीकरण आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण.

ही सर्व कामे आपल्या गावात शासकीय यंत्रणा, सेवाभावी संस्था व योजनेचा फायदा लुटण्यासाठी त्यात घुसलेले गुत्तेदार, ठेकेदार, कंत्राटदार आणि अंमलबजावणी करणारी यंत्रणा यांनी किती प्रामाणिकपणे व सेवा व ध्येयभावी वृत्तीने केली आहेत हे गावकऱ्यांनी डोळ्यात तेल घालून बारकाईने व तटस्थपणे तपासून पाहावे. म्हणजे मग मी येथे जास्त भाष्य करण्याची गरज नाही. जाणीवपूर्वक मी येथे कोणत्याही गावाचे नाव घेणार नाही पण जे दृष्टोत्पत्तीस आले तेही तुमच्यापुढे ठेवल्याशिवाय राहणार नाही. सर्वच गावात चुकीचे व अप्रामाणिकपणे काम झाले आहे असा माझा दावा नाही. पण जिथे अशा पद्धतीने कामे झाली तिथला पाणीप्रश्न सुटला नाही व पुन्हा टँकर लागला आहे ही वस्तुस्थिती संबंधितांनी मोकळेपणाने मान्य करायला हवी.

मुळात जलयुक्त शिवार ही संकल्पना शास्त्रीय आधारावर उभी नाही. त्यामुळे चाललेले काम मोघम व अशास्त्रीय पद्धतीने चाललेले आहे. आणि होत असलेल्या कामाचा दुष्परिणाम हा भविष्यात दुरुस्त करण्याजोगा राहिलेला नाही. जगभर पाणलोट विकास हा शब्द प्रचलित आहे. ज्याला इंग्रजीत आपण वॉटरशेड असे म्हणतो. यात एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास ही संकल्पना अभिप्रेत आहे. 'जलयुक्त शिवार' हा शब्द कुणाला कितीही आवडत असला आणि कितीही इच्छा असली तरीही 'एकात्मिक' (इंटीग्रेशन) या अर्थाने स्वीकारला जाणार नाही. जलयुक्त शिवार ही संकल्पना पाणलोटाच्या उपचारांमध्ये फार तर 'सिंगल ॲक्टीव्हीटी' म्हणून संबोधली जाऊ शकते. या उपचाराचे फार दूरगामी विपरीत असे परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. कारण कधीही दुरुस्त न होणारी अशी ही ॲक्टीव्हीटी आहे.

नदी, नाले, ओढे यातली वाळू आपण पूर्वीच फॉकलंड, जेसीबी, ढंपर यांसारखी मोठमोठी मशिनरी लावून काढून टाकली आहे. भूजल विकास यंत्रणेने दोन फुटावरची वाळू काढायचा परवाना दिला तर महसूल यंत्रणेला हाताशी धरुन गुंड व धनदांडग्या ठेकेदारांनी 20-30 फुटापर्यंतची वाळू खाणकाम केल्याप्रमाणे खोदून काढली आहे. त्यामुळे जलद वाळवंटीकरणाकडे आपल्या शेतीची वाटचाल सुरु झालेली आहे. विहिरी व बोअरवेल लवकर आटणे, वादळ-वाऱ्याने माती उडून जाणे, जमिनीतली ओल व



सापेक्ष आर्द्रता कमी होणे, पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे उद्‌भव आटणे वगैरे ही त्याची प्रतिनिधीक उदाहरणे आहेत. वाळू काढून टाकल्यानंतर जे काही थोडेफार दगड गोटे नदीच्या पात्रात शिल्लक होते, त्याच्या खाली साधा मुरूम, नंतर कडक मुरुम व अन्य खडक ही साधारण भूस्तरीय रचना नदीनाल्यात शिल्लक होती. ही रचना कळत नकळत वाळूनंतर पाणी धरुन ठेवण्याचे काम करीत होती. नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करताना हे सगळे माध्यम यंत्राच्या सहाय्याने काढून आपण दोन्ही बाजूला टाकले. मधे मोठे खोल खड्डे केले. थोडासा पाऊस झाला की या खड्ड्यात पाणी साचते. जर तिथली भूगर्भरचना पाणी मुरायला अनुकूल

असेल तर ते पाणी पाझरून जमिनीत जाते. अन्यथा ते जागीच साठून राहते. सूर्याला जणू काही ते पाणी बाष्पीभवनासाठी आंदण म्हणून दिले आहे असेच चित्र पाहावयास मिळते. खोलीकरण व रुंदीकरण करताना शेतकऱ्यासह प्रत्येकजण समाधानी दिसत आहे. मोठमोठी स्वप्ने त्याने ऊराशी बाळगली आहेत असे दिसते. पण उद्याच्या दुष्परिणामाला सामोरे जावे लागेल याचा अंदाज कोणालाही येताना दिसत नाही. खोलीकरणामुळे पाणी दोन तीन पट आत साठविले जाणार एवढाच विषय प्रत्येकाच्या मनात होता आणि आहे. पण दुदैव असे आहे की हे पाणी भूगर्भात फार दुष्काळग्रस्त भाग हा या बेसॉल्ट खडकाचा म्हणजे कठीण काळ्या पाषाणाचा आहे. 10 टक्के भूभाग हा मेटॅमॉरफिक म्हणजे रुपांतरीत खडक आहे. त्याचीही गणना हार्डरॉक मध्येच होते. नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली येथे हा खडक आढळतो. उर्वरीत 8 टक्के खडकामध्ये चार टक्के खडक हा सेडीमेंन्टरी म्हणजे गाळापासून तयार झालेला आहे. तो चंद्रपूर, यवतमाळ व नागपूरच्या काही भागात आढळतो. उर्वरीत 4 टक्के प्रदेश हा तापी पूर्णेचा गाळाचा पट्टा आहे. तिथे पाणी चांगले मुरू शकते. म्हणून मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र मिळून तापीचे पाणी भूजलात सोडणारा 'मेगा रिचार्ज प्रोजेक्ट' हाती घेणार असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे.



प्रतिकूल भूगर्भरचनेबरोबरच आपल्या खडकाच्या भेगा या फार अरुंद आहेत. या भेगातून जर भूगर्भात पाणी जायचे असेल तर पावसाळ्यात वाहणाऱ्या प्रवाहाचे पाणी धरुन ठेवणारी व्यवस्था लागते जेणेकरुन धरुन ठेवलेले पाणी हळूवारपणे भेगांच्या माध्यमातून भूगर्भात जाण्याची प्रक्रिया होत असते. ज्या खडकाला छिद्रे, रंध्रे, भेगा, पोरस भाग असतो तिथेच पाणी आत मुरते. कठीण काळ्या पाषाणात यातले काहीच नसते. त्यामुळे तिथे पाण्याचा एक थेंबही आत जात नाही. कोयना धरणाच्या पाण्याच्या खाली 300 फूट जाऊन पाहा. वरती 103 टीएमसी पाणी आहे. पण खालचा काळा पाषाण पूर्ण कोरडा आहे. एक थेंबही पाणी तिथे पाझरताना वा पडताना दिसत नाही. शिरपूर सारखा भूगर्भ अपवादात्मक स्थितीत पाहायला मिळतो. त्याला 'बझाडा झोन' असे संबोधले जाते. हा भूस्तर पडणारा पाऊस भराभरा पिण्याची क्षमता ठेवतो. ही त्या भागाला मिळालेली निसर्गाची देणगी आहे. म्हणून तिथे ओढ्या नाल्यांवरचे खोलीकरण व रुंदीकरण यशस्वी होऊन बंधाऱ्यांची साखळी वाहती राहिली. पण हे सर्व ठिकाणी यशस्वी होऊ शकणार नाही. त्यामुळे शिरपूर पॅटर्नला सुद्धा मर्यादा आहेत. हा पॅटर्न संपूर्ण राज्यात यशस्वी होऊ शकणार नाही हे तत्कालिन मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण यांच्या लक्षात आले आणि त्यांनी शिरपूरच्या सिंचन परिषदेन हा पॅटर्न राज्यभर लागू करण्यास नकार दिला याकडे कानाडोळा करता येणार नाही. पण जलयुक्त शिवार योजनेतून राज्यभर चाललेल्या या खोलीकरण व रुंदीकरणाच्या माध्यमातून आपण उरलीसुरलेली पाणीधारण क्षमता ठेवणारी व्यवस्थाच उध्वस्त केली आहे. आता पावसाळ्यात पाणीसाठे जरुर

मोठ्या प्रमाणावर व वेगाने मुरायला आपली भूगर्भिय रचना अनुकूल नाही. 82 टक्के भूभाग हा बेसॉल्ट खडकाचा आहे. सगळा

पाहायला मिळतील पण भूगर्भीय पाणीसाठा वाढविण्यास ते फारसे उपयुक्त ठरणार नाही. म्हणून जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून पाणी क्षमता वाढण्याऐवजी घटण्याचीच शक्यता मोठी आहे. किंबहुना ते घटणारच आहे.

शास्त्रीयदृष्ट्या बारकाईने पाहायचे ठरविल्यास सर्व नद्यांचे नैसर्गिक आकार आपण बदलून टाकले. बहुतेक सगळ्या नद्या उलट्या धनुष्याच्या आकाराच्या होत्या. आता त्या बॉक्ससारख्या झाल्या. सगळ्या नद्या, नाल्यात, ओढ्यात आता झाडेझुडपेच उगवणार व ते प्रवाहाला कायम अडथळा करीत राहणार. हीच गोष्ट कालवे, चाऱ्या, उपचाऱ्या यांमध्येही पाहायला मिळते. जलसंपदा विभागात तर ही झाडेझुडपे काढून कालवा, चाऱ्या स्वच्छ ठेवण्यासाठी दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा निधी ठेवला जातो. पण काम न करता तो कुठे जातो हा संशोधनाचाच विषय आहे! अशा स्थितीत आता ढगफुटीच्या पाण्याचे व्यवस्थापन कसे करणार? म्हणजे पुढचे पुराचे पाणी शेतीत घुसणार. नदी, नाले, ओढे उकरताना जो भूस्तर काढून आपण थडीवर (बँक) दोन्ही बाजूला अशास्त्रीय पद्धतीने टाकला तो पण खाली येणार आणि ती उत्तम गाळाची माती असल्यामुळे तिचे सिमेंटीकरण होणार. ती घट्ट चिकटून बसणार. हे पर्यावरणवाद्यांना कसे दिसत नाही? एरव्ही नको तिथे नाक खुपसणारे हे पर्यावरणवादी आता का मूक गिळून बसले आहेत? यापुढील काळात जर यदाकदाचित वेडावाकडा प्रचंड पाऊस झाला तर तो शेतात घुसून पिकांचे पूर्ण नुकसान केल्याशिवाय राहणार नाही. जलयुक्त शिवार कार्यक्रमातून हा एक मोठा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय आणखीन दोन धोके निर्माण झाले आहेत.

प्रवाहाचे पाणी वाहत असताना पाणी शुद्धीकरणाचे काम दगड, गोटे, वाळू, रेती यांच्या माध्यमातून होत होते. याला आपण फिल्टरेशन म्हणतो. आणि तिसरे काम पाणी धरुन ठेवण्याचे ज्याला इनफिल्टरेशन म्हणतो. या दोन्ही व्यवस्था जलयुक्त शिवारमध्ये उध्वस्त झाल्या आहेत. या खोलीकरणामुळे माथ्यावरच्या (रिजलाईन) विहिरी या जलद गतीने कोरड्या होणार. कारण प्रवाहाला खोलीकरणामुळे गती मिळाली. त्यामुळे उलटे होऊन विहिरीतले पाणी प्रवाहात येणार. म्हणून जलयुक्त शिवार ही संकल्पना ज्या अपेक्षेने म्हणजे पाणी समृद्धीच्या हेतूने, ती पूर्ण होण्याची सुतराम शक्यता नाही. केवळ एकात्मिक पाणलोट विकास हीच संकल्पना सूक्ष्म पातळीवर राबविल्यास योग्य नियोजनाचे योग्य परिणाम मिळू शकतात आणि शंभर वर्षांपूर्वी हे शास्त्रीय परिभाषेत मांडण्याचे काम महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये एका परिच्छेदात केले आहे. त्याचा आज आम्हाला पूर्ण विसर पडलेला दिसतो.



2015-16 च्या दुष्काळामध्ये सरकारने प्रचंड पैसा या जलयुक्त शिवार योजनेवर खर्च केला. या काळात जलसंपदा विभागाला पैसे न देता सगळा पैसा या जलसंधारण विभागाला दिला. कंपन्यांनी सीएसआरचाही प्रचंड निधी दिला. गावोगावी स्वयंसेवी संस्थांचे पीक आले. अनेक ठेकेदार यात उतरले. बिनडोक काम होते. मशीनने नाल्याचे खोलीकरण करायचे आणि माती उचलून वर फेकायची. याला फार अक्कल लागत नव्हती. गंगा वाहती आहे. घ्या आपला लोटा बुडवून या न्यायाने कंत्राटदार व कार्यकर्ते यांनी योजना पूर्ण लुटली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र घसा फोडून फोडून सांगत होते, "16 हजार गावात पाच लक्ष कामे पूर्ण केली. 25 लक्ष सहस्त्र घन मिटर पाणी साठले. (म्हणजे 2500 दलघमी, याचा अर्थ 83.33 टीएमसी. म्हणजे एका जायकवाडी धरणाइतके) ते रिमोट सेन्सिंगच्या मदतीने तपासले. साठलेल्या पाण्यातून 22 लाख हेक्टर सिंचन

क्षमता निर्माण झाली आणि 11 हजार कोटी रुपये खर्च झाला." प्रकल्पातला गाळ काढायचा आणि धर कुठलाही नाला आणि कर त्याचे खोलीकरण, रुंदीकरण ही दुष्काळ हटविण्याची व्याख्या बनविली गेली. त्यावेळी पाटबंधारे (जलसंपदा) विभागातील अभियंत्यांच्याविरुद्ध वातावरण असल्यामुळे ते शांत बसले. सगळे उध्वस्तीकरण त्यांनी 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' या मुकाटपद्धतीने पाहिले. हातावर हात ठेवून फुकटचा पगार ते घेत राहिले. 2016-17 मध्ये पाऊस चांगला झाला. टँकरची संख्या कमी झाली. सरकारने त्याचे श्रेय जलयुक्त शिवारला दिले. 2018-19 हे वर्ष पुन्हा दुष्काळी आले. ज्या गावांना जलयुक्त शिवारची कामे उत्कृष्ट केल्यामुळे मोठमोठे रकमांचे पुरस्कार दिले होते त्या गावांना ऑक्टोबर महिन्यापासूनच टँकर सुरु झाला आणि आता तर जलयुक्त शिवारमधल्या बहुतेक सगळ्या गावांना टँकरने पाणी पुरवठा चालू आहे. इतकेच काय शिरपूर पॅटर्न राबविलेले

जलयुक्त शिवारमधला भ्रष्टाचार रोखा आणि या सगळ्या कामांची फेरतपासणी करा असे सरकारला सांगावे लागले. या संपूर्ण योजनेचे मूळ सुत्रधार कृषी खाते होते. त्यांच्यामार्फत प्रामुख्याने योजना राबविली गेली. जलसंधारण खात्यात अभियंते आहेत. पण त्यांच्याकडे नेतृत्व दिले गेले नाही.

कॉंक्रीटमध्ये बंधारे बांधणे आणि नदीनाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करणे अशा प्रकारची अभियांत्रिकी कामे कृषी खात्याच्या लोकांकडून करुन घेणे चुकीचे ठरणार आहे असे लेखन, भाषण यातून शासनाच्या नजरेस आणून दिले पण शासनाने हेतुपुरस्सर अशा योजनांकडे दुर्लक्ष करुन कृषी खात्यामार्फत काम करण्याच्या पद्धतीत बदल केला नाही आणि आजही त्याच पद्धतीने काम चालू आहे.

कॉंक्रीटच्या बंधाऱ्याची कामे कुशल स्वरुपाची असतात. त्यातला अभियांत्रिकी भाग महत्त्वाचा असतो. वाळू कोणत्या





धुळे, सिंदखेडा, शिरपूर हे तालुकेही सरकारने दुष्काळी म्हणून जाहीर केले आहेत. जलयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरणाच्या कार्यक्रमाची हीच फलश्रुती आहे काय? याचे उत्तर आता कोण देणार?

जलयुक्त शिवार कार्यक्रमातील गावांची निवडच मूळात गुणवत्तेवर न होता वशिल्याने व राजकीय हेतू समोर ठेवून झाली. शासनप्रणीत कार्यक्रम असल्यामुळे सरकारच्या सोयीची गावे निवडली. नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे बांधणे आणि तलावातला गाळ काढणे या तीन कामांवरच जास्त भर दिला. पक्षाचे कार्यकर्तेच ठेकेदार झाले. त्यांनी जेसीबी, फॉकलंड सारखी मोठमोठी मशिनरी घेतली. त्यांना काम दिले असे दाखवून खोटी बिले काढण्याची संधी सरकारनेच कार्यकर्त्यांना दिली. म्हणून शेवटी उच्च न्यायालयाला यात हस्तक्षेप करुन

प्रकारची असावी, खडीचा आकार कसा असावा, सिमेंट आणि पाण्याचे प्रमाण कसे असावे, पाण्याची गुणवत्ता कशी असावी व यासाठी कोणत्या यंत्रसामुग्रीचा वापर करणे आवश्यक आहे. (उदा. व्हायब्रेटर, मिक्सर, सेंटरींग, फॉर्म वर्क) याचे ज्ञान असणारी माणसे कृषी खात्याकडे नाहीत. पण कृषी खात्याला या कामांचे दायित्व दिले. सर्वसाधारणपणे अभियंत्यांनादेखील मोठ्या कामांचा मोह असतो आणि पाझरतलाव, सिमेंट बंधारे यांसारख्या लहान कामांमध्ये त्यांना लघु किमतींमुळे स्वारस्य नसते. ज्याला हे काम येतंय त्याला स्वारस्य नाही आणि ज्याला काही येत नाही त्याच्यावर हे काम लादले आहे.

नाला खोलीकरण आणि रुंदीकरण करीत असताना भूस्तराचा, मातीचा, खडकांच्या रचनेचा शास्त्रीय अभ्यास असणे फार महत्त्वाचे असते. अशा अभ्यासातूनच नदीनाले किती खोल

करावेत याचा निर्णय घेणे अपेक्षित असते. सरसकटपणे पोकलान, जेसीबीसारख्या अवजड यंत्रांच्या मदतीने जमेल तेवढे नदीनाले खोल करणे चुकीचे ठरते आणि तेच घडले. याचा परिणाम असा झाला की बाजूच्या विहिरीतील पाणी नदी नाल्यात येऊ लागले व विहिरी कोरड्या पडू लागल्या. तशा अनेक तक्रारी येऊ लागल्या. खोदलेली माती पुन्हा नदीनाल्याच्या पात्रात येणार नाही अशा पद्धतीने भरावाला विशिष्ट उतार देऊन तिला सुरक्षितता देणे आवश्यक असते. तसे राज्यात कोठेही घडलेले नाही असेच दिसते.

नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण केल्यानंतर त्याचे मोजमाप घेणे हा देखील एक अभियांत्रिकीचा भाग आहे. लांबी, रुंदी, उंची आणि बाजूचे उतार मोजणे. यावरुन माती नेमकी किती खोदली याचा आणि पाणी नेमके किती साठणार आहे याचा अंदाज बांधता येतो. असे घडलेले नाही हे म्हणण्यास पुरेपूर वाव आहे. उपग्रहाच्या मदतीने मिळालेल्या छायाचित्रांच्या आधारे रुंदीकरण आणि खोलीकरण यातून निर्माण झालेल्या पाणी



साठ्याचा अंदाज बांधणे तर्काला धरुन होत नाही. याची जाण ना शासनाला, ना प्रशासनाला झाली असे म्हणणे वावगे वाटू नये. यामुळेच इतके टीएमसी पाणी साठले आणि इतके लक्ष क्षेत्र सिंचनाखाली आले असे म्हणणे शासकीय यंत्रणेला सोपे गेले असेच म्हणावे लागेल. याची शहानिशा न करता या कामांवर हजारो कोटींचा निधी खर्च करण्यात आला. पण दुष्काळ हटलाच नाही असे 2018 च्या तुटीच्या पावसाने दाखवून दिले आहे.

जलयुक्त शिवार हा उपक्रम दुष्काळमुक्तीचा आहे असा गाजावाजा करण्यात आला. एखादे तरी गाव या उपक्रमामुळे 100 टक्के टंचाईमुक्त झाले आहे का याचे उत्तर शासन व प्रशासनाला देता येत नाही हाच मोठा पराजय आहे असे म्हणावेसे वाटते.

दुष्काळमुक्तीची प्राथमिक व्याख्या किमान अंशी पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भासू नये इतकी मर्यादित स्वरुपाची केल्यानंतर सुद्धा बोटावर मोजण्याइतकी गावेसुद्धा याची पूर्तता करु शकत नाहीत हीच वस्तुस्थिती 2018 च्या दुष्काळाने दाखवून दिली आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या दुष्काळावर रामबाण उपाय सुचविणाऱ्या आदर्श गाव योजनेच्या आणि राज्याच्या सभागृहामध्ये या विषयातील तथाकथित तज्ज्ञ म्हणून मिरविणाऱ्या महाभागांच्या प्रबोधनाच्या कार्यक्रमाची यशस्वीता कुठे गेली? ५० वर्षांच्या परिश्रमानंतर सुद्धा कमी पावसाच्या वर्षात केवळ पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता निर्माण करता येवू नये यासारखा दुसरा मोठा पराजय नसावा असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये.

2018 च्या दुष्कालात उपक्रम राबविले पण पाऊसच आला नाही असे समर्थन केले जात आहे. पाऊस पडला नाही असे पृथ्वीच्या उत्पत्तीपासून वर्ष नाही. पाऊस कमी पडतो आणि टंचाई निर्माण होते हा महाराष्ट्रासारख्या प्रदेशाला निसर्गाकडून मिळालेला शाप आहे. यावर उपाययोजना करण्याचे आणि कमी पावसाच्या वर्षात पण पिण्यासाठी पाणी कमी पडेल अशी परिस्थिती उद्‌भवू न देणे यामध्ये मानवी कौशल्याची यशस्विता दडलेली असते. नेमके हे घडले नाही असेच हताशपणे म्हणण्याची वेळ आलेली आहे.

शासनाचे जलयुक्त शिवाराचे उपचार कमी पडले की काय म्हणून पाणी फाऊंडेशन, नाम फाऊंडेशन आणि त्याच्या जोडीला राज्यात निर्माण झालेली सेवाभावी संस्थांची पिलावळ यांचीही साथ घेण्याचा विचार शासनाने राबविलेला आहे. राज्यातील उद्योगपतींकडून सीएसआरच्या स्वरुपात हजारो कोटींचा निधी टंचाईमुक्तीसाठी उपलब्ध होत आहे. एका अर्थाने टंचाईमुक्तीचा कार्यक्रम विपुल प्रमाणात दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीचा विल्हेवाट लावण्याचा कार्यक्रम ठरत आहे. याच्या जोडीला राज्यातील कंत्राटदार कसा काय मागे राहणार? अनेक मंडळी खोदाईच्या मशिन्स खरेदी करुन गुत्तेदार म्हणून या क्षेत्रात उतरलेली दिसत आहेत. महाराष्ट्र राज्य हे पोकलान व जेसीबी सारखी यंत्रसामुग्री बाळगण्यामध्ये (हजारोंच्या संख्येने) देशामध्ये अग्रेसर



# मोसमी पावसाची वैशिष्ट्ये

भारतीय हवामानशास्त्र विभाग 1875 मध्ये सुरु झाला. त्यावेळेपासून म्हणजे 150 वर्षांची पाऊस व हवामानाबाबतची सर्व माहिती आपल्या वेधशाळेकडे उपलब्ध आहे. याही अगोदर म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या व्यापाराच्या उद्देशाने हवामानाची माहिती गोळा करण्यासाठी देवळाली (नाशिक), कुलाबा (मुंबई), चेन्नई येथे हवामान वेधशाळा उभारल्या होत्या. भारतात कामासाठी येणाऱ्या ब्रिटिश सैनिकांसाठीही ही हवामानाची माहिती त्यांना हवी होती. या वेधशाळेमुळे किमान 150 वर्षांची मोसमी पावसाची आकडेवारी आज आपल्याकडे उपलब्ध आहे. त्यावरुन एक ठाम निष्कर्ष निघतो तो म्हणजे मोसमी पाऊस हा दरवर्षी न चुकता येतो. तो येतच नाही असे कधीही होत नाही. फक्त या पावसाची काही वैशिष्ट्ये आहेत.

1) वाऱ्यांची दिशा वर्षातून दोनदा बदलते. मोसमी वारे जेव्हा हिंद महासागरावरुन भारताकडे येतात तेव्हा ते सोबत बाष्प घेऊन येतात. त्या बाष्पाचा पाऊस पडतो. सहा महिने हे वारे हिंद महासागराकडून आशिया खंडाकडे वाहतात. त्यांना नैऋत्य मान्सून (साऊथवेस्ट) वारे म्हणतात. म्हणून या पावसाला नैऋत्य मोसमी पाऊस म्हणतात.

2) उरलेले सहा महिने हे वारे आशिया खंडाकडून हिंद महासागराकडे वाहतात. त्यांना ईशान्य मान्सून (नॉर्थ ईस्ट) वारे म्हणतात. जमिनीकडून समुद्राकडे वाहणाऱ्या या वाऱ्यांमध्ये बाष्प नसते म्हणून सहा महिने पाऊस पडत नाही. हे वारे न चुकता सहा महिन्यांनी बदलतातच.

3) प्रत्येक वर्षीच्या मान्सूनचे स्वरुप निरनिराळे असते. कधी तो लवकर येतो. कधी तो उशीरा येतो. कधी कधी तो खूप जोरदार सुरुवात करतो , कधी कधी सुरुवात धीम्यागतीने असते. या चार महिन्यांच्या पावसात खंड पडतात. कधी हे खंड लहान असतात. कधी लांब मोठे असतात. तेव्हा दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होते. कधी कमी दाबाची क्षेत्रे तयार होतात. तेव्हा चांगला पाऊस पडतो. नद्यांना पूर येतात. अशी क्षेत्रे तयार झाली नाही तर पाऊस धीमा पडतो. कधी कधी परतीचा मान्सून रेंगाळतो व ऑक्टोबरमध्ये सुद्धा पाऊस पडत राहतो. कधी कधी तो लवकर परत जातो.

सारांश, दरवर्षी नियमितपणे येणारा मोसमी पाऊस हा वेगवेगळी रुपे घेऊन येतो. त्याचे चार महिने अगोदर पूर्वानुमान करणे सध्या तरी शक्य नाही. भारतीय हवामान वेधशाळा ही अमूक एका ठिकाणी दुष्काळ पडेल आणि पावसाची नेमकी स्थिती दुष्काळी भागात काय राहील हे सांगत नाही आणि सांगूही शकत नाही. त्यामुळे दुष्काळावर दुष्काळ पडला तर जलयुक्त शिवार योजना नापासच होणार.



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



ठरले आहे. अनेक जिह्यांमध्ये जिल्ह्याच्या प्रशासकीय यंत्रणेनेसुद्धा पोकलान व जेसीबी सारखी यंत्रे खरेदी करण्याचा मोह टाळता आलेला नाही. ज्याचे काम त्याने करावे या निसर्गनियमाला त्यामुळे तिलांजली मिळाली आहे असेच म्हणावे लागते.

जलयुक्त शिवाराच्या कार्यक्रमाची वावटळ अनेक प्रकारच्या चुकीच्या प्रथा रुजविण्यामध्ये पुढाकार घेऊन यशस्वी झालेली आहे असेच खेदाने म्हणावे लागते. पाणी फाऊंडेशनसारख्या अशासकीय संस्था राज्यातील लहान मोठ्या खेड्यांमध्ये दुष्काळमुक्तीची हुलकावणी देऊन आणि लोकसहभागाचे हत्यार पुढे करुन लहान मोठ्या, गरीब श्रीमंत, बाल व वृद्ध नागरिकांना झुंडीने जमा होऊन श्रमदान करण्यास परावृत्त करण्यासाठी यशस्वी झालेली आहे असे दिसते. दुष्काळापासून मुक्ती मिळणार आहे आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध केले जाणार आहे या भावनिक आवाहनाखाली लोकसहभागाची चळवळ निर्माण करण्यामध्ये या संस्थांना निश्चित भरीव यश मिळाले आहे. पण प्रश्न राहतो दुष्काळ मुक्ती मिळाली का याच्या उत्तराचा?

2018 च्या दुष्काळाने याचे उत्तर दिलेले आहे आणि जलयुक्त शिवार हे अभियान राबविलेले गावे आणि या अभियानाचा स्पर्श न झालेली गावे हे दोघेही एकाच होडीतून दुष्काळाचा दाह सोसत येणाऱ्या पावसाळ्याची चातकाप्रमामे वाट पाहात आहेत. दरवर्षी काही हजार गावांची निवड करणे, उद्योगसमुहांकडून सीएसआर चा निधी उपलब्ध करुन देण्यात पुढाकार घेणे, पोकलान, जेसीबी सारख्या अवजड मशिनरी बाळगणाऱ्या संस्थांची, गुत्तेदारांची मदत घेणे आणि एप्रिल-मे या एक दीड महिन्याच्या कालावधीत उन्हातान्हात पाणी निर्माण करण्याचा एक रामबाण उपाय म्हणून गावागावामध्ये स्पर्धा लावणे हा एक दुष्काळमुक्तीचा कौतुकाचा विषय ठरलेला आहे. पारितोषिकाच्या रकमा 50-75 लाखांच्या घरात आहेत. वर्षाकाठी पारितोषिके मिळालेल्या डझनवारी गावांचा शासकीय अधिकारी आणि सत्ताधारी यांच्या उपस्थितीत गाजावाजा करुन प्रसिद्धी देऊन सत्काराचा कार्यक्रम राबविला जातो. पाणी मिळेल आणि पारितोषिकाची मोठी रक्कमही हातात पडेल या खुळ्या भावनेने एकत्र आलेली ग्रामीण मंडळी सणावारात घालावयाचा पोषाख परिधान करुन सत्कार मेळाव्यात सहभागी होत आहेत. एका अर्थाने खासगी सेवाभावी संस्थेने राबविलेल्या अशा उपक्रमात शासन सहभागी होऊन अशा सत्काराच्या उपक्रमांना शासकीय आधार व प्रोत्साहन देत आहे असे म्हटले तर वावगे वाटू नये. हे सर्व करुन सुद्धा दुष्काळ हटला का? पाणीटंचाई संपली का? टँकरमुक्त झाला का? याचे उत्तर नाही म्हणूनच देण्याची नामुष्की शासकीय आणि या खासगी व्यवस्थेवर आलेली आहे ही वास्तविकता कोणीही नाकारु शकत नाही.

लोक आशेवर जगतात. त्यांची निराशा करणे याला निसर्गपण क्षमा करणार नाही असेच वाटते.

वरील वर्णन काही मंडळींना मत्सरापोटी आरोप केल्यासारखे वाटेल. या मंडळींनी उन्हातान्हात थोडेसे कष्ट करुन राज्याच्या अवर्षणग्रस्त ग्रामीण भागात फिरण्याचे आणि डोळे उघडे ठेवून वस्तुस्थिती जाणून घेण्याचे प्रयत्न करावेत असे सुचवावेसे वाटते. माथा ते पायथा, सीसीटी, लूज बोल्डर, कंटूर बंडींग, बांधबंदिस्ती, विहिरीचे पुनर्भरण, गॅबियन बंधारा, मातीनाला बांध, सिमेंट बंधारा, नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण, वनीकरण, तलावातला गाळ काढणे व शिवार गाळयुक्त करणे

इत्यादी स्वरुपाची केलेली कामे पोटतिडकीने स्थानिक लोक प्रामुख्याने तरुण वर्ग गावाला भेट देणाऱ्या आपणासारख्या त्रयस्थाला दाखविण्यामध्ये पुढाकार घेत असल्याचे दिसून येते. दुष्काळमुक्तीच्या अभियानात झपाटलेले आणि सहभागी झालेले गावोगावचे हे कार्यकर्ते आहेत. 2018 चा दुष्काळ पाऊसच पडला नाही तर जलयुक्त शिवार अभियानाची पूर्तता कशी होणार या प्रश्नाच्या माऱ्यामध्ये झाकले जात आहेत. पुढच्या वर्षी पाऊस पडेल आणि जमिनीवर निर्माण केलेली भांडी पाण्याने भरतील आणि गावकऱ्यांचे हाल कमी होतील अशा आशेवर निराशाग्रस्त मंडळी गावोगाव आपणास पाहावयास मिळत आहेत. पुढच्या वर्षीचा चांगला पावसाळा त्यांचे समाधान करेल का याचे उत्तर येणारा काळच देणार आहे. आजच्या घडीला मात्र जलयुक्त शिवार व या अभियानास अंगाखांद्यावर राबविणारे नाम, पाणी फाऊंडेशनसारख्या सेवाभावी संस्थांकडून राबविले गेलेले दुष्काळमुक्तीचे अभियान अपेक्षित ते उत्तर देऊ शकले नाही असेच म्हणावेसे वाटते. 1972 साली सुरु झालेला पाण्याचा टँकर 50 वर्षांच्या अथक परिश्रमानंतरसुद्धा थांबविता आलेला नाही हे सत्य स्विकारावे लागेल.

गेल्या काही वर्षात कोरड्या पडलेल्या नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा विषय काही सेवाभावी संस्थाच्या पदाधिकाऱ्यांकडून राज्यात हिरीरीने मांडण्यात येत आहे. राज्यातील काही स्थानिक जाणकार मंडळी या विचाराला मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्यातील एका भागात अनुकूल अशा भूगर्भीय रचनेमध्ये आणि मर्यादित स्वरुपाचा पाणीवापर करणाऱ्या पीकपद्धतीचा स्वीकार करणाऱ्या समाजरचनेमुळे काही तांत्रिक उपचारांच्या माध्यमातून नदीला वर्षातील काही मर्यादित कालावधीसाठी वाहत्या नदीचे रुप देण्यामध्ये यशस्विता लाभली म्हणून तसाच प्रयोग देशाच्या इतर भागात व्यापक स्वरुपात राबविता येतो आणि नद्यांना जिवंत करता येते असा विचार मांडणे म्हणजे निसर्गरचनेला जाणण्यामध्ये अज्ञान दाखविण्यासारखे होते. प्रतिष्ठेचे व पुरस्कारांचे वलय लाभल्यानंतर माणूस अहंकाराच्या पिंजऱ्यात सापडतो व त्याचा परिणाम म्हणून एकच उत्तर सर्व प्रश्नांवर असेच काहिसे या मंडळींना वाटू लागते. राज्यामध्ये सुद्धा अशा प्रवृत्तींचा अनुभव अनेकजणांना अनेक ठिकाणी येत आहे.

विटा, खानापूरजवळील अग्रणी नदीचे उदाहरण या ठिकाणी या संबंधात उद्धृत करणे आवश्यक वाटते. राज्याच्या उंच भागावरुन वाहते म्हणून या नदीचे नाव अग्रणी असे आमच्या पूर्वजांनी ठेवले असावे. अतिशय कमी पाऊस पडणारा हा प्रदेश आहे. भूस्तरीय रचना पाणी मिळण्यास प्रतिकूल आहे. वर्षाकाठी कधीतरी वाहणाऱ्या या नद्यांची नावे येरळा, सुखना, सीना अशी आहेत. शेती पिकविण्यासाठी शेतकऱ्यांना पाण्याची गरज असते. पृष्ठभागावर पाणी दिसले नाही तर तो जमिनीत मुरलेले पाणी उपसतो. मुरणाऱ्या पाण्यापेक्षा उपसलेल्या पाण्याचा वेग वाढला तर भूजल पातळी खोलवर जाते. याचा अतिरेक झाला तर भूप्रदेशाचे वाळवंटीकरण होते. अग्रणी नदीचा परिसर याच परिस्थितीचा बळी ठरलेला आहे. अशा नदीला पुनरुज्जीवित करणाऱ्या माणसाची भाषा स्थानिक लोकांना भूलवित असते. निसर्ग प्रतिकूल, पाऊस कमी आणि माणूस बदलण्यास तयार नाही अशा हतबल झालेल्या अवस्थेत अग्रणी नदीसारख्या परिसंस्थेचे पुनरुज्जीवन कसे होणार हा जाणकारांपुढे पडलेला यक्षप्रश्न आहे? स्थानिक शहाणपण नेहमी उजवे ठरते. शासनाच्या विविध योजनांचा आणि उद्योगसमुहांकडून मिळणाऱ्या सीएसआरचा



टेंभू उपसा जलसिंचन योजनेच्या चौथ्या टप्प्यातील पाणी २९ मे २०१९ रोजी वीटा (जि. सांगली) गावाजवळील अग्रणी नदीवर बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्यांच्या साखळीमध्ये सोडले असता घेतलेले छायाचित्र.

पुरेपूर उपयोग करुन या मंडळींनी या नदीच्या उगमस्थानावर साधारणतः 15-20 कि.मी. लांबीत लोकांची श्रमशक्ती उभी करुन पाच ते सहा डझनापेक्षा जास्त, ओळीने एकाखाली एक साखळी सिमेंट बंधारे उभे केले आहेत. अशा बदललेल्या अवस्थेत टेंभू उपसा जलसिंचन योजनेच्या मदतीने चौथ्या टप्प्यातील पाणी अग्रणी नदीच्या पात्रात सोडण्यात येत आहे. लोकांनी स्वतःच्या श्रमातून, पुढाकारातून बंधारे बांधले आणि शासनाकडे पाठपुरावा करुन कृष्णा नदीतील पाणी टेंभू उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून अग्रणी नदीत आणले. निसर्गाचा कोप शमविण्यात स्थानिक लोकांना यश मिळालेले आहे. सर्व प्राणीमात्रांना नदी पुनरुज्जीवित होण्याचा आधार मिळाला आहे. हे घडले आहे स्थानिकांच्या प्रयत्नांतून. याचे श्रेय मात्र काही मंडळी आपल्याकडे लाटू पाहण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असल्याबद्दल खेद व्यक्त करावा लागतो. उचलून आणलेल्या पाण्याचा उपयोग व त्याचे अर्थशास्त्र हा वेगळा विषय आहे. पण त्याच्यातून स्वतःची प्रसिद्धी करुन घेण्याचा मोह इतरांनी बाळगू नये असे सांगण्याची वेळ सभोवतालच्या मंडळींवर येऊ नये. यात वावगे वाटण्यासारखे काहीही नाही. अग्रणी नदी स्वतःच्या स्त्रोतातून पुनरुज्जीवित झालेली नाही. या नदीला मिळालेले पाणी कृष्णा नदीचे व तात्कालिक आहे. टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी सोडणे ज्या दिवशी बंद होईल त्या दिवशी अग्रणी नदीचे वाहणेही बंद होणार आहे. या प्रक्रियेस नदीचे पुनरुज्जीवन असे नामकरण करणे कितपत बरोबर आहे याचा विचार जलतज्ज्ञ म्हणून मिरविणाऱ्या मंडळींना का करु नये याचे आश्चर्य वाटते !



खोलीकरणाचे मोजमाप कसे घेतले? जर ते एक फूट वाढवून दाखविले तर खिशात न खोदताही पैसे पडू शकतात. हे काम जलयुक्त शिवारमध्ये फार मोठ्या प्रमाणात झाले आहे. शेतकरी यासाठी समाधानी होता की काम परस्पर चाललेले आहे. कोण काय मिळवितो याच्याशी त्याला देणेघेणे नव्हते. असेही झालेले निदर्शनास येते की गावकऱ्यांनी डिझेल भरायचे. मशिन पाठवितात पुढारी. सांगतात खोलीकरण करुन घ्या. या व्यवस्थेला सगळेच भुलले. डिझेल लोकांकडून काढले. मशिन एका दात्याकडून मिळविले आणि बीले मात्र सत्ताधारी पक्षाच्या पुढारी व कार्यकर्त्यांनी काढली आणि हे काम आजही बिनबोभाट चालू आहे. मूळातच जलयुक्तमध्ये कॉन्ट्रॅक्टरचा शिरकाव झाला हे चुकीचे व घातक आहे. त्यामुळे पूर्वी साडेतीन ते चार लाखात होणारा सिमेंट बंधारा आज दहा ते वीस लाखात झालेला आपण पाहतो. आणि हे डिझाईन शासनाच्या 'मेरी' या संस्थेने बनविल्याचे सांगितले जाते. आता मेरी ही शास्त्रीयदृष्ट्या डिझाईन करणारी यंत्रणा आहे. पण त्यांनी शास्त्रीयदृष्ट्या डिझाईन केले का ठेकेदारांच्या सोयीसाठी केले हे प्रत्यक्ष जागेवर जाऊन काम तपासल्यानंतरच लक्षात येऊ शकेल. अशा तपासणीला भरपूर वाव आहे. आपण फ्लड डेप्थ जर तपासल्या तर हे सहज लक्षात येईल. पूराची उंची तेवढी येत नसतानाही वाढवून दाखविली, चार-पाच पट पूर येणार असं दाखवून विंगवॉलवर जो 40 टक्के खर्च होतो तो अवास्तव करुन टाकला. शिरुर तालुक्यातील न्हावरे गावात या फ्लड डेप्थ आपल्याला पाहायला मिळतील.

या जलयुक्त शिवारमध्ये पैसे खाण्याची नवनवीन सुत्रे शोधून विकसित करण्यात आली असे दिसते. तालुक्यामध्ये किती बंधारे झाले याचा जर अंदाज घेतला तर किमान तीस ते चाळीस टक्के बजेट हे व्यवस्थेवर उधळण्यात, काम मिळण्यासाठी कोणालातरी वाटण्यात खर्ची पडलेले दिसण्याची जास्त शक्यता आहे. एक तर अवास्तव डिझाईन. हे डिझाईन मेरीचं आहे असे कसे म्हणायचे? याचा शोध घेतला पाहिजे. जलयुक्त मध्ये निर्माण झालेले बंधारे यांचे मोजमाप कोणी केलं आहे का? हे बंधारे जलयुक्तमधूनच झाले की पूर्वीचेच झालेले नवे म्हणून दाखविले. असे बऱ्याच ठिकाणी झालेले असण्याची शक्यता आहे. जुन्याच बंधाऱ्यांना डागडूजी केली. हरियाली, डीपीएपीमधून व संस्थांनीदेखील पूर्वीच्या काळात बंधारे केले होते. हे जुने बंधारेही नवीन बंधारे म्हणून दाखवून त्यांचीही बीले काढली गेली आहेत अशी बाहेर बरीच मोठी चर्चा आहे. तपासणीअंती खरेखोटे समजू शकेल. सत्य समजावून घेण्याची शासनाची तयारी आहे का? हाच खरा प्रश्न आहे. कारण मुख्यमंत्र्यांनी जलयुक्त शिवार ही योजना निव्वळ प्रतिष्ठेची बनविलेली आहे. प्रतिष्ठेपेक्षा प्रश्न सोडविण्यासाठी योजनेची उपयुक्तता जास्त महत्त्वाची आहे. मुख्यमंत्र्यांना हे ज्या दिवशी कळेल तो महाराष्ट्राचा सुदिन असेल.

Best

Compliments

# शरद पवार यांचा दुष्काळी दौऱ्याचा वृत्तांत

सातारा–आज संबंध महाराष्ट्रात भीषण दुष्काळ परिस्थिती आहे. काळ कठिण आहे मात्र आपण हरायचं नाही. दुष्काळासंबंधी राज्य सरकारकडून मदत घेवू आणि आपण सर्व मिळून पुन्हा अशी स्थिती येवू नये म्हणून प्रयत्न करू असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दुष्काळग्रस्त भागातील लोकांमध्ये निर्माण केला. आज सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील चिलेवाडी व नागेवाडी या गावात जावून शरद पवार यांनी तेथील दुष्काळी भागाची परिस्थिती जाणून घेतली. संकट आलं म्हणजे नाउमेद व्हायचं नसतं, संकटाने खचून जायचं नसतं असा आत्मविश्वासही शरद पवार यांनी दुष्काळी भागातील लोकांच्या मनात जागृत केला. यावर्षी पाऊस उशिरा येईल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. नंतर पाऊस चांगला पडेल असं म्हटले जात आहे. पाऊस चांगला पडेल परंतु त्यासाठी आपण त्यासाठी तयार रहायला हवं. पाण्याचे योग्य नियोजन करावे लागेल. पावसाचा थेंब न थेंब वाचण्याचा प्रयत्न आपण करायला हवा. पाणी फाऊंडेशन सध्या राज्यभरात चांगले काम करत आहे त्यांना गावकरी मदत करतात हे पाहून समाधान वाटत आहे. हे सुरूच ठेवलं पाहिजे किंबहुना आपण हे वाढवलं पाहिजे असेही




**महाराष्ट्रातील जनता सध्या तीव्र अशा दुष्काळाचा सामना करीत आहे. लोकांना पिण्यासाठी पाणी नाही. 50–100 कि.मी. वरून टँकरने पाणी आणावे लागते आहे. जनावरांना चारा–वैरण नाही. पाणीदेखील नाही. जनावरांच्या छावण्याही पुरेश्या संख्येने उभ्या राहिलेल्या नाहीत. गाई–गुरे कशी जगवावीत असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला आहे. १०० वर्षांत कधी पाहिला नव्हता, असा दुष्काळ आम्ही आता सध्या अनुभवित आहोत. असे गावोगावचे आणि जनावरांच्या छावणीतले लोक सांगतात. संकटाने पोळलेल्या या जनतेला दिलासा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातून अनेक गावांचा दौरा केला. या प्रसंगी त्यांनी जे विचार व्यक्त केले, ते संकलित स्वरुपात येथे संक्षिप्तपणे देत आहोत.**

शरद पवार म्हणाले.  आज अनेक गावांमध्ये टँकरची मागणी आहे. रेशन कार्डवर धान्य मिळत नाही अशी तक्रार आहे. चारा छावणीऐवजी गावातच चारा डेपोची व्यवस्था व्हावी अशा विविध मागण्या जनता करत आहे. आम्ही या सर्व गोष्टी सरकारपर्यंत पोहोचवू. या कठिण प्रसंगी आम्ही तुमच्या सोबत आहोत असा ठाम विश्वास शरद पवार यांनी दुष्काळी भागातील जनतेला दिला.

## सरकारने आता गांभीर्याने दुष्काळाचा मुद्दा हाताळावा-शरद पवार

मुंबई – दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. आम्ही या सर्व गोष्टींचा आढावा घेतला आणि परिस्थिती मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. सरकारने आता गांभीर्याने दुष्काळाचा मुद्दा हाताळावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे.

दुष्काळाच्या मुद्द्यावर आणि ईव्हीएम मशीनबाबत शरद पवार यांनी सातारा येथे पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना आपले मत व्यक्त केले आहे. दुष्काळाच्या मुद्द्यावर आम्ही कोणतेही राजकारण करत नाही. प्रश्न सरकारला लक्ष्य करण्याचाही नाही,प्रश्न माझ्या शेतकऱ्यांचा आहे. आमची सुरुवातच शेतकऱ्यांपासून  झाली आहे. संकटसमयी त्यांच्या बांधावर जाऊन त्यांची विचारपूस केली नाही तर आमच्यासारखे नतद्रष्ट दुसरे कोणी ठरणार नाही असेही शरद पवार म्हणाले. सगळ्याच मशीनमध्ये असे असेल असे मला वाटत नाही मात्र मी हे पाहिलेलं आहे म्हणून काळजी व्यक्त केली. यासाठी आम्ही



# काळ कठिण आहे मात्र आपण हरायचं नाही

## शरद पवार यांचे उद्गार



न्यायालयात गेलो, मात्र दुर्दैवाने न्यायालयाने आमचे म्हणणे ऐकले नाही अशी खंत शरद पवार यांनी व्यक्त केली. निवडणुकीच्या काळात ईव्हीएम मशिनमध्ये बिघाड झाल्याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत. गुजरात व हैदराबाद येथील काही ईव्हीएम मशिन्सची तपासणी केली असता घड्याळाचं बटन दाबलं तर कमळाला मत गेल्याचे मी स्वतः डोळ्यांनी पाहिलंय, त्यामुळे ईव्हीएम मशीन्सबाबत मला चिंता वाटते असा संशयही शरद पवार यांनी व्यक्त केला आहे.

## सौताडा येथील चारा छावणीला शरद पवारांची भेट...

बीड - बीड जिल्ह्याच्या दुष्काळी दौऱ्यावर असलेल्या खासदार शरदचंद्रजी पवार यांनी आज सकाळच्यावेळी खडकत येथील शेतकऱ्यांची संवाद साधल्यानंतर पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील एका चारा छावणीला भेट दिली.यावेळी समस्याग्रस्त शेतकरी व चारा छावणी मालकांनी शरद पवार यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या.

स्वामी बहुउद्देशीय सेवा संस्थेने चालवलेल्या छावणीमध्ये प्रामुख्याने एक तक्रार आली की, छावणी जवळ जवळ २७ मार्चला सुरु झाली परंतु अद्यापही छावणीचे अनुदान शासनाने दिलेले नाहीये परिणामी व्याजाने पैसे घेवून छावणी चालवण्याचा प्रसंग छावणी चालकांवर आलेला आहे. यासाठी ९० रुपये दिले जातात हे सुद्धा चाऱ्याचे भाव पाहता कमी आहेत. पाणी दूर अंतरावरून आणावं लागतं ते सगळं पाहता छावणीचा खर्च पाहता तो परवडणारा नाहीय त्यामध्ये वाढ करून देण्याची मागणी ही छावणी चालकांनी, शेतकऱ्यांनी शरद पवार यांच्याशी बोलताना केली.

दुधाचे दर दोन रुपयांनी कमी झाले आहेत. आधीच दुधाचे उत्पादन घटले. शेतकरी वर्गावर हे एक मोठे संकट आले आहे.विम्याचे पैसे मिळाले नाही.फळबागा जळून गेलेल्या आहेत त्यासाठी कोणत्याही प्रकारचे अनुदान नाही. त्या वाचवण्यासाठी सुद्धा समस्या आहे. अशा अनेक समस्या, अडचणी शेतकऱ्यांनी

शरद पवार यांच्याजवळ बोलून दाखवल्या. छावणी चालकांनी एक नवीन समस्या यावेळी शरद पवार यांच्याजवळ मांडली. त्यामध्ये टॅग जनावराला लावतात. जनावरांची संख्या अचूक रहावी त्यामध्ये फेरफार होवू नये म्हणून. परंतु हा जरी शासनाचा उद्देश असला तरी टॅग लावून अपलोड करणे हे जिकिरीचे काम आहे त्यामुळे शासनाने त्यासाठी स्वतंत्र व्यक्ती नेमावा.शासनातर्फे ते केल्यास पारदर्शकतेच्या दृष्टीने चांगले होईल आणि चारा छावणी चालकावरील हा अतिरिक्त भार कमी होईल अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली. शरद पवारसाहेबांनी पाटोदाकडे जात असताना रस्त्यातही अनेक गावांमध्ये थांबून जनतेशी संवाद साधला त्यावेळी अनेक ठिकाणी त्यांचे महिलांनी औक्षण करूनही स्वागत केले. यावेळी विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, माजी आमदार राजेंद्र जगताप, उषाताई दराडे, युवा नेते रोहित दादा पवार, जिल्हाध्यक्ष बजरंग सोनवणे, बाळासाहेब आजबे, सतीश शिंदे, महेंद्र गर्जे, शिवाजी राऊत, व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे दुष्काळी परिस्थितीवर मुख्यमंत्र्यांना पत्र...

मुंबई – सातारा, सोलापूर, बीड, अहमदनगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात १९७२ पेक्षा गंभीर दुष्काळी परिस्थिती आहे. मी या जिल्हयांचा दौरा केल्यानंतर विस्ताराने मांडलेल्या समस्यांकडे राज्याचे प्रमुख म्हणून आपण लक्ष घालावे व संपुर्ण दुष्काळी भागासाठी सर्वकष निर्णय घ्यावेत अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

दरम्यान राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्र्याची वेळही शरद पवार यांनी पत्राद्वारे मागितली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी लोकसभेचा रणसंग्राम संपताच सोलापूर, सातारा, बीड, उस्मानाबाद, अहमदनगर या दुष्काळी जिल्ह्यांचा दौरा करत शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या शेतीच्या बांधावर थेट जात आणि चारा छावण्यातील शेतकऱ्यांच्या, मालकांच्या अडचणी शिवाय धनगर समाजातील प्रतिनिधींनी शेळ्या मेंढ्याकरीता चारा छावणीच्या धर्तीवर स्वतंत्र व्यवस्था करण्याची मागणी केली. त्यांच्या दृष्टीने तो दिलासा ठरेल असेही शरद पवार यांनी पत्रात म्हटले आहे.

शरद पवारांनी शेतकऱ्यांच्या जाणून घेतलेल्या समस्या,






त्यांच्या अडचणी यावर उपाययोजना काय करायला हव्यात यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात प्रत्येक मुद्दे आणि समस्या व दुष्काळावर काय उपाययोजना कराव्यात याबाबतचे सविस्तर म्हणणे मांडले आहेत.

## दुष्काळप्रश्नी पवारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट...

मुंबई – राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आज संध्याकाळी ८ वाजता राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. सोलापूर जिल्ह्यातील काही गावे त्याचप्रमाणे दिनांक १२ आणि १३रोजी सातारा जिल्ह्यातील माण, अहमदनगर जिल्ह्यातील काही गावे आणि बीड जिल्ह्यातील गावांना शरद पवारांनी भेट देत तेथील जनतेच्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला आणि त्या समस्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर बैठकीदरम्यान मांडल्या.

पिण्याच्या पाण्याच्या समस्याबद्दल सांगताना पिण्याचे पाणी हे पुरेसं नियमित वेळेवर नाही. कमी अधिक प्रमाणात त्याचबरोबर अशुद्ध पाणी पुरवठा व जनावरांसाठी पाणी नसताना





या सगळ्या बाबींचा विशेषत्वाने उल्लेख केला. टँकरसाठी पाणी भरताना त्यामुळे वीजेची समस्यासुद्धा टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात मोठी अडचण असल्याचे निदर्शनास आणलं. शिवाय बीड जिल्ह्यामध्ये भेट दिली. त्यावेळी येथील चारा संघटनेने आंदोलनाचा पवित्रा घेतला. छावण्या सुरू झाल्या तरी चारा न मिळाल्यामुळे लाखो रुपयांचे कर्ज डोक्यावर असल्यामुळे व्याजाचा भुर्दंड बसत असल्यामुळे जनावरांना चारा न देण्याची परिस्थिती उद्भवली. त्यामुळे छावण्या बंद करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या सगळ्या समस्यांचे गांभीर्य निदर्शनास आणून देत त्यांची देयके वेळेवर जातील याकडे शरद पवारांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

त्याचप्रमाणे चारा छावणी चालण्यातील अडचणीत केवळ उसाचा चारा देवू केला जात आहे. त्याचे प्रमाण कमी असणे याची पद्धत क्लिष्ट स्वरूपाची असेल असं जनावरांचे आकडेवारी रोजच्या रोज कळवणं अशा बऱ्याच समस्या या बाबींचा चारा छावणी चालकांना त्रास होत असल्याचा प्रामुख्याने निदर्शनास आणून दिले. प्रति जनावर 90 रुपये इतके चारा छावणी चालवण्यासाठी असणारे अनुदान अपुरे असल्याचे देखील शरद पवारांनी निदर्शनास आणले. ते आता शंभर रुपये प्रति जनावर करण्यात आल्याचे मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी सांगितले.

केंद्रशासनाने अन्नसुरक्षा कायदा लागू केल्यानंतर सुद्धा दुष्काळी भागातील जनतेला रेशन कार्डवर अन्नधान्य मिळत नसल्याची तक्रार शरद पवारसाहेबांनी केली. त्यावेळेस साधारणतः बीपीएल अंतर्गत 7 कोटी लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याचा शासनाचा विचार असल्याचं शासनातर्फे सांगण्यात आलं मात्र दुष्काळी परिस्थितीमध्ये बीपीएल, एपीएल आणि सर्वांनाच यांना अत्यल्प दरात आणि त्यावरील असलेले घटक असतील त्यांना परवडेल असे दरामध्ये धान्य सरसकट देण्यात यावे ही विनंती देखील शरद पवारांनी केली. या बैठकीत प्रति जनावर रुपये शंभर येथे चारा छावण्या अनुदान केल्याचं मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलं आणि त्यामध्ये 120 रुपयेपर्यंत वाढ करण्याच्या दृष्टीने निश्चित लक्ष देईल असेही आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.



बीड जिल्ह्यामध्ये धनगर समाजातील प्रतिनिधींनी शरद पवार यांच्या निदर्शनास आणले की, शेळ्या-मेंढ्यांचा सुद्धा जनावरांच्या छावणीत प्रमाणे विचार करण्यात यावा त्यासाठी स्वतंत्र विचार करण्यात यावा ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणली. या गोष्टीकडे देखील लक्ष पुरवू असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार, आमदार राणा जगजितसिंह, आमदार राजेश टोपे आदींसह दुष्काळी भागातील काही प्रतिनिधी उपस्थित होते.




फ्लॅशबॅक 2014 : नरेंद्र मोदी आणि अमित शहा प्रचारात सगळीकडे ठासून सांगत, 'एकाही राज्यात काँग्रेसला दोन आकडी जागा मिळणार नाहीत!' म्हणजे कोणत्याही राज्यात काँग्रेसला दहा जागा मिळणार नाहीत !

2019 : 'अब की बार तीन सौ पार'! भाजपची संख्या बरोब्बर तीनशे दोन वर जाऊन थांबते.

केंद्रीय मंत्री पियुष गोयल एका वार्तालापात सांगतात की भाजपला 297 ते 303पर्यंत जागा मिळतील. इतका अचूक अंदाज ? त्यांची ही क्लिप सोशल मीडियावर फिरत आहे.

राजस्थान, गुजरात, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यात पैकीच्या पैकी जागा लागोपाठ दुसऱ्या निवडणुकीत जिंकल्या जातात. 2014 आणि 2019 मध्ये!

याला योगायोग म्हणायचे की आणखी काही ?

इतका अचूक अंदाज आणि तोही लागोपाठच्या निवडणुकांमध्ये कसा दिला जाऊ शकतो ?

हे काही प्रश्न आणि शंका आहेत आणि त्याची उत्तरे तूर्तास मिळणे अवघड आहे.

अर्थात निवडणूक प्रचाराचे मुद्दे बदलून ते कमालीचे भावनिक आणि उन्मादयुक्त करण्यात सत्तापक्षाच्या सूत्रधारांनी यश मिळविले आणि बघताबघता लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित समस्यांचे मुद्दे मागे पडले. निवडणुकांचे वारे वाहू लागलेले असतानाच 14 फेब्रुवारी रोजी पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या काफिल्यावर आत्मघातकी हल्ला झाला. त्यात चाळीस जवान मृत्युमुखी पडले. त्या घटनेची भावनिक व स्फोटक प्रतिक्रिया देशात उमटणे नैसर्गिक होते. देशात पुन्हा एकदा दहशतवादाचा मुद्दा आघाडीवर आला. पाकिस्तानला धडा शिकविण्याची चर्चा जोरजोरात होऊ लागली होती. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान-स्थित जैश ए मुहम्मद या संघटनेने घेतली. वाजपेयी सरकारने सुटका केलेला मौलाना मसूद अजहर हा या संघटनेचा म्होरक्या ! 25 व 26 फेब्रुवारीच्या




नवी दिल्ली

# यार्थ

रात्री भारतीय हवाईदलाने पाकिस्तानी सीमा पार करुन बालाकोट या ठिकाणी असलेल्या जैशच्या तळावर हल्ला केला. या हल्ल्यात किती अतिरेकी, दहशतवादी मारले गेले याबाबतची निश्चित संख्या आजतागायत समजलेली नाही.

पण या प्रसंगातून निवडणुकीसाठी वातावरणनिर्मिती करण्यात आली. यामध्ये दहशतवाद, त्याचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रवादी शक्तींची आवश्यकता आणि त्यावर निर्णायक कारवाई करण्याची चोख प्रत्युत्तर देण्याची क्षमता असलेला नेता अशी प्रतिमा पध्दतशीरपणे तयार करण्यात आली. हा नेता म्हणजे नरेंद्र मोदी हे सांगण्याची गरजच नाही. त्यासाठी निवडणुकीच्या आधीपासूनच देशात राष्ट्रवादाचा गवगवा करण्यात आला. एका नियोजनबध्द आराखड्यानुसार हे केले गेले. न्यायालये, निवडणूक आयोग आणि खुद्द सेनादलांनीही या प्रसंगांचे राजकीय भांडवल करु नये आणि या प्रसंगाच्या आधारे निवडणुकीत मते मागू नयेत अशी सूचना देऊनही पंतप्रधान व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी त्या सूचनेकडे केवळ दुर्लक्षच केले नाही तर ती सूचना चक्क धाब्यावर बसवली. निवडणूक आयोगाने या प्रकारावर कारवाई करण्यात निष्क्रियता व उदासीनतेची कमाल पातळी गाठली. पंतप्रधान व त्यांचे सहकारी बिनदिक्कतपणे बालाकोट कारवाई, सेनादले यांचा उल्लेख करुन मते मागत सुटले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नकवी यांनी जाणीवपूर्वक सेनादलांचा उल्लेख 'मोदी सेना' असा केला. याबाबत त्यांच्याविरुध्द कारवाई म्हणून त्यांना दोन-तीन दिवस प्रचारास बंदी करण्यात आली. परंतु त्यापलीकडे कोणतीही कारवाई आयोगाने केली नाही किंवा तशी हिंमत दाखवली नाही.

संपूर्ण निवडणुकीतच प्रचाराबाबत पक्षपाती धोरण अवलंबिण्यात आल्याचे अनेक उदाहरणांवरुन स्पष्ट झाले. 'नमो टीव्ही' नावाचे चॅनेल निवडणुकीच्या सुरुवातीलाच सुरु करण्यात आले. त्याच्यावर बंदी घालण्याबाबत विरोधी पक्षांनी वारंवार

निवडणूक आयोगाला सांगितले परंतु आयोगाने निवडणूक संपेपर्यंत त्यावर निर्णय केला नाही. ते चॅनेल व त्यावरुन मोदी यांचा प्रचार चालू राहिला. निवडणूक संपल्यानंतर हे चॅनेल अचानक अदृष्य झाले. बॉलीवूडमधील अंधभक्त संप्रदायाने युगपुरुषांवर एक सिनेमा काढला. तो त्यांना निवडणुकीच्या वेळीच प्रदर्शित करायचा होता परंतु त्यास मनाई करण्यात आली. त्यामुळे तो सिनेमाघरांमध्ये प्रदर्शित होऊ शकला नाही. परंतु खासगी पातळीवर त्याचे प्रसारण व जाहिराती चालू राहिल्या. थोडक्यात या निवडणुकीत सत्तापक्षाला प्रचारासाठी मोकळे रान देण्यात आले होते असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. परिणामी प्रचार एकतर्फी राहिला.






बेकारी व रोजगारनिर्मिती, शेती व शेतकऱ्यांची दुरावस्था आणि असंतोष, व्यापारी, उद्योग-व्यावसायिक अशा वर्गांमधील असंतोष हे सर्व मुद्दे जाणीवपूर्वक मागे टाकण्यात आले. फक्त निर्णायक नेता, पाकिस्तानला धडा शिकवणारा नेता, असा व्यक्तिकेंद्रित प्रचार करण्यात आला. खुद्द मोदी यांनी भाजपला मत म्हणजे 'मोदीला मत', 'आप का व्होट मोदी के खाते में जाएगा' असा स्वकेंद्रित प्रचार सुरु केला. मोदींनी केलेल्या कारवायांबद्दल प्रश्न उपस्थित करणे म्हणजे देशद्रोह आणि विरोधी पक्ष सेनेच्या विरोधात असल्याचा पध्दतशीर प्रचार करण्यात आला. परिणामी (अप)प्रचारतंत्रामुळे सर्वसामान्यांचा बुध्दीभेद करणे शक्य झाले.विकास व प्रगतीचे मुद्दे मागे पडले. विरोधी पक्ष या प्रचाराचा प्रतिवाद करणे व त्याला चपखल प्रत्युत्तर देण्यात कमी पडले. किंबहुना अपार साधनसंपत्ती व महाकाय प्रचारयंत्रणेच्या आधारे हा विषम सामना विरोधी पक्षांना लढणे जड गेले व त्यांची हार झाली. त्याचबरोबर पुलवामा घटना आणि बालाकोट कारवाई या दोन प्रसंगांचा ठसा उत्तर भारतावर अधिक राहिला. कारण बहुसंख्य शहीद जवान हे हिंदी भाषक राज्यातले होते आणि त्यामुळे या राज्यांमध्ये राष्ट्रवाद व हिंदुत्व हे दोन मुद्दे विशेषत्वाने प्रभावी ठरले. विरोधी पक्ष त्यास प्रत्युत्तर देण्यात असफल ठरले.





जी माहिती हळूहळू बाहेर येत आहे त्यामध्ये बहुजन समाज पक्षाची मते समाजवादी पक्षाकडे 'ट्रान्सफर' झाली नाहीत असे निदर्शनाला येत आहे. परंतु समाजवादी पक्षाची मते मात्र बहुजन समाजाला मिळाली व त्यामुळेच हा पक्ष दहा जागा जिंकू शकला. समाजवादी पक्षाची फारच दारुण अवस्था झाली व त्याना केवळ पाच जागांवर समाधान



मानावे लागले. उत्तर प्रदेशात हिंदुत्व व राष्ट्रवाद हे दोन मुद्दे जोरदारपणे चालले आणि त्यात सामाजिक न्यायाच्या शक्तींची पीछेहाट झाली.

बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यांची अनुपस्थिती हा विरोधी पक्षांच्या महागठबंधनच्या पराभवातील प्रमुख घटक ठरला. लालूप्रसाद यांचे चिरंजीव तेजस्वी हे मुख्यमंत्री नीतीशकुमार यांच्यापुढे फिके ठरले. मुख्य म्हणजे महागठबंधन करताना राष्ट्रीय जनता दलाने केलेल्या काही चुका महागात पडल्या. ही निवडणूक संसदेची व राष्ट्रीय होती. त्यामुळे राष्ट्रीय जनता दल व काँग्रेसने अधिक जागा लढविणे अपेक्षित होते. परंतु जीतनराम मांझी यांचा पक्ष हिंदुस्तानी आवाम मोर्चा आणि उपेंद्र कुशवाहा यांचा राष्ट्रीय लोकसमता पक्ष यांना विनाकारण जास्त जागा देण्याचा पोरकटपणा करण्यात आला. परिणामी काँग्रेसचा या आघाडीतला रसच संपला. कन्हैयाकुमार हा भविष्यात आपल्या नेतृत्वाच्या आड येऊ नये या भीतीने त्याला बेगुसराय मध्ये पाठिंबा न देण्याचा

या पार्श्वभूमीवर राज्यवार चित्र तपासावे लागेल. भाजपने उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, गुजरात व राजस्थान या राज्यांमध्ये पैकीच्या पैकी जागा मिळविण्याचा दुसऱ्यांदा विक्रम केला. ही एक आश्चर्यकारक बाब मानावी लागेल. उत्तर प्रदेशातही समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष आणि राष्ट्रीय लोकदल यांच्या दरम्यानचे सामाजिक समीकरण हे केवळ प्रभावीच नव्हे तर निर्णायक मानले जात होते. त्यांचे सामाजिक समीकरण पन्नास टक्क्यांहून अधिक सामाजिक समूहांना प्रभावित करणारे होते. प्रत्यक्षात हे समीकरण निष्प्रभ ठरले. भाजपची किंवा मोदींचा बुलडोझर थांबविण्यास ते यशस्वी ठरले नाही. ज्या भाजपला गेल्या वेळेस 71 जागा मिळाल्या त्या जागांमध्ये केवळ आठ ते दहा जागा कमी करण्यात हे समीकरण सफल ठरले. काँग्रेसला राहूल गांधी यांची जागा गमवावी लागली. केवळ सोनिया गांधी निवडून येऊ शकल्या.

या पाडावाची कारणमीमांसा करण्यात येत आहे. आता

आणखी एक पोरकटपणा तेजस्वी यांनी केला. परिणामी कुठेही त्यांचा पक्ष भाजप व संयुक्त जनता दलापुढे टिकाव धरु शकला नाही. यादव व मुस्लिमांनी राष्ट्रीय जनता दलाला साथ दिली नाही व एकप्रकारे नीतीशकुमार यांच्यामागे ते गेले असे चित्र बिहारमध्ये दिसून आले. राष्ट्रीय जनता दलाला तर बिहारमध्ये खाते देखील उघडता आले नाही. सर्वाधिक फायदा रामविलास पास्वान यांचा झाला. सहा जागा त्यांनी लढल्या व सर्व जिंकल्या. जमुई येथून त्यांचे चिरंजीव चिराग निवडणूक लढले.



मतदानानंतर त्यांनी नीतीशकुमार यांनी त्यांना मदत केली नसल्याचे सांगून पराभूत होणार असल्याचे मान्य केले होते. पण प्रत्यक्षात ते काही लाख मतांनी निवडून आले. हे या निवडणुकीतले चमत्कार तपासण्यासारखे आहेत. काँग्रेसला किशनगंजच्या एका जागेवर समाधान मानावे लागले.

वर उल्लेख केल्याप्रमाणे उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये पुलवामा व बालाकोटचा प्रभाव विशेष राहिला. त्यामुळेच उत्तराखंडमधील पाचही जागा व हिमाचलमधील चारही जागा भाजपने जिंकल्या. हिमाचलमध्ये वीरभद्रसिंग व सुखराम हे दोन अत्यंत मुरब्बी नेते एकत्र येऊन व त्यांनी लोकांची माफी मागूनही काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. उत्तराखंडमध्ये याचीच पुनरावृत्ती झाली.

राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढमधील काँग्रेसचे अपयश हे आश्चर्यकारक आहे. सहा महिन्यांपूर्वीच काँग्रेसने तेथे विधानसभा निवडणुका जिंकलेल्या असताना लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला जागा जिंकता येऊ नयेत हेही धक्कादायक आहे. राजस्थान व मध्य प्रदेशातील अपयशाला काँग्रेसचे स्थानिक नेतृत्व जबाबदार अधिक आहे. राजस्थानात मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट हे एकजूट दाखवू शकले नाहीत. अशोक गेहलोत यांचे चिरंजीव निवडणूक लढवत होते व तेही जिंकू शकले नाहीत. गेहलोत यांची निष्क्रियता अद्भूत स्वरुपाची ठरली. त्यामुळेच राहूल गांधी



त्यांच्यावर चिडले हे स्वाभाविक मानावे लागेल. मध्य प्रदेशात मुख्यमंत्री कमलनाथ हे त्यांचे चिरंजीव नकुल नाथ यांना विजयी करु शकले. परंतु इतरत्र ते प्रभाव पाडू शकले नाहीत. कमलनाथ व गेहलोत हे मुरब्बी राजकारणी मानले जातात परंतु मुख्यमंत्री असूनही आपल्या राज्यातून ते पक्षासाठी किमान पाच-सहा जागा देखील जिंकवून देऊ शकले नाहीत. छत्तीसगढमध्ये काँग्रेसचा फाजील आत्मविश्वास नडला. भाजपने तेथील सर्व विद्यमान खासदारांना तिकिटे नाकारली होती. सुरुवातीला तेथील स्थानिक पातळीवर असंतोष निर्माणही झाला व भाजपला धडा शिकविण्याची भाषा झाली होती. परंतु कोठून काय कळ फिरली कुणास ठाऊक ! अकरापैकी काँग्रेसला केवळ दोन जागा मिळवता आल्या. 2014मध्ये काँग्रेसला केवळ एकाच जागेवर समाधान मानावे लागले होते. यावेळी काँग्रेसच्या दुप्पट जागा झाल्या असे मानावे लागेल.


नाही म्हणायला काँग्रेसने फक्त केरळ व पंजाब या दोन राज्यांमध्ये टिकाव धरला. महाराष्ट्रातही काँग्रेसला केवळ एकच जागा मिळविण्यात यश आले. कर्नाटकातही काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दलाची राजकीय आघाडी व सामाजिक समीकरण निष्प्रभ ठरले. पंजाबमध्ये मुख्यमंत्री अमरिंदरसिंग यांना मुक्त हस्त देणे पक्षाला फायदेशीर ठरले. केरळमधील लढत ही दोन समानधर्मी म्हणजे दोन भाजपविरोधी आघाड्यांमध्येच असल्याने विजय व पराभवाची किंमत समानच होती. परंतु केरळने काँग्रेसला हात दिला. राहूल गांधी यानी वायनाडमधून निवडणूक लढविण्याचा निर्णय केल्याने केरळमधील काँग्रेसमध्ये उत्साह व चैतन्य निर्माण झाले आणि बघताबघता तेथे पक्षाने 16 जागा जिंकल्या. त्यामुळेच काँग्रेसला 52 जागांची मजल गाठणे शक्य झाले.


पश्चिम बंगाल या राज्यावर सर्वांचे लक्ष होते. भाजप अध्यक्ष अमित शहा यांनी निवडणुकीपूर्वी बोलताना या राज्यातील 42 पैकी 23 जागा मिळविण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. भाजपने 18 जागा जिंकून या राज्यात मारलेली मुसंडी विलक्षण मानावी लागेल. काँग्रेसला केवळ एक जागा मिळू शकली.

राज्यात सत्तारूढ तृणमूल काँग्रेसचे 32 ते 35 जागा मिळविण्याचे उद्दिष्ट होते पण त्यांना 23 जागांपर्यंतच मजल मारता आली. या राज्यात 1977पासून तेहतीस वर्षे अव्याहत राज्य करणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला यावेळी भोपळाही फोडता आला नाही. ही किमया कशी घडली ? पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने मार्क्सवाद्यांचा पाडाव करताना त्यांच्याच युक्त्या त्यांच्या अंगावर उलटविल्या. मार्क्सवादी ज्या असामाजिक घटकांच्या आधारे आपली सत्ता टिकवून ठेवत त्या घटकांना ममता बॅनर्जी यांनी स्वतःकडे खेचले. त्यानंतर तृणमूल काँग्रेसने निवडणूक जिंकण्याची ही 'जबरी यंत्रणा' तर प्राप्त केली पण मार्क्सवाद्यांना मतदान करणाऱ्या मतदारांना पूर्णतया आकर्षित करण्यात त्यांना यश आले नाही. परिणामी भाजपने ही पोकळी भरुन काढताना मार्क्सवाद्यांच्या मतदारांना आपल्याकडे आकर्षित केले. हा मतदार मूलतः काँग्रेस व तृणमूल विरोधी असून गलितगात्र झालेल्या मार्क्सवाद्यांबरोबर जाण्यापेक्षा त्याने नव्या जोमाच्या भाजपच्या पदरात आपले माप टाकले. या मतदारांना आकर्षित करण्यासाठी तृणमूलमधील फुटीरांची भाजपला मोठी मदत मिळाली. त्याचबरोबर ममता बॅनर्जी यांच्या अल्पसंख्यक अनुनयाच्या भूमिकेचाही फायदा भाजपने उठवून हिंदुत्वाच्या आधारे या वर्गाला आवाहन केले. त्याचा फायदा भाजपला मोठ्या प्रमाणात मिळाला.

भाजपने या निवडणुकीत यश मिळविले खरे पण ते मिळविण्यासाठी अवलंबिलेले मार्ग किती उचित किती अनुचित याची चर्चा करावी लागणार आहे. धार्मिक ध्रुवीकरण, पक्षपाती निवडणूक यंत्रणा, सेनादलांच्या नावाने मते मागण्याचे प्रकार, राष्ट्रवाद-हिंदुत्व या मुद्यांची सरमिसळ, विरोधी पक्षांच्या विरोधात पातळी सोडून प्रचार अशा सर्व मार्गांचा अवलंब भाजपतर्फे करण्यात आला होता. त्याचबरोबर अपार साधनसंपत्ती आणि महाकाय प्रचारयंत्रणा ही हत्यारेही पक्षाकडे होती. ही सर्वसाधारण कारणे असली तरी भाजपच्या या विजयाबाबत आता दबक्या आवाजात मंडळी बोलू लागली आहेत. त्यातील सत्य बाहेर येण्याची वाट पहावी लागेल.




चैत्रपालवी
बारामती २०१९



महाराष्ट्रात आधुनिक तंत्रज्ञानाची, किफायतशीर फायद्याची शाश्वत शेती सुरू व्हावी, तिचा प्रसार व्हावा आणि हे प्रसाराचं काम प्रयोगशील व प्रगतीशील शेतकऱ्यांनी करावं. त्यांनी गावोगावी जाऊन व आपापल्या भागातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचं मार्गदर्शन करावं, या हेतूने कृषीविकास प्रतिष्ठान, बारामती व कृषीविज्ञान केंद्र, बारामती यांच्या वतीने गेली सात वर्षे दरवर्षी बारामती येथे 'चैत्रपालवी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी बारामती येथील डॉ. आप्पासाहेब पवार सभागृहात २५ ते २७ मे २०१९ या काळात झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व कर्नाटक राज्यातूनही जवळपास दीड हजार शेतकरी उपस्थित होते. माजी केंद्रीय कृषीमंत्री आणि कृषी विषयाचे गाढे अभ्यासक खासदार शरद पवार यांनी 'चैत्रपालवी' कार्यक्रमाला भेट देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांचे हे भाषण येथे देत आहोत.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील शेतीसंबंधी आस्था असणारे आपण सर्वजण आहात. सुरवातीलाच बकरी पालन कारोबार हे मोरारे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे विमोचन मी करतो. साधारण पुस्तकाचे विमोचन मी ऐनवेळेला कधी करत नाही. शक्यतो त्याची प्रत मागवतो. ती चाळतो. आणि त्याच्यावर काही भाष्य करायचे असेल तर ते मी त्या विमोचनाच्या प्रसंगी करतो. कदाचित हे मोरारे यांना माहिती असावे, त्यामुळे या विमोचनाप्रसंगी जी प्रत माझ्या हातात दिली, ती ऊर्दूमध्ये आहे आणि त्यामुळे त्यात काय लिहिले आहे, ते मला कळत नाही. पण, मी त्यांना सांगितले आणि मग त्यांनी मला या पूर्वीची मराठी प्रत माझ्याकडे पाठवली. ती मला मिळाली नसेल तर ती मला देण्याची ते व्यवस्था करत आहेत. जरूर मी त्याचे वाचन करेल. कारण गेल्या कित्येक दिवसांपासून मी त्याचा विचार करतोय. त्याचे कारण की, शेतीला जोडधंदा, हे मी अधिक सांगण्याची गरज नाही.

महाराष्ट्रात आपण दुधाचा धंदा वाढवला, पण तो राज्याच्या सगळ्या भागात काही गेला नाही. तो कोल्हापूरला आहे, सांगलीला आहे, साताऱ्याला आहे, पुण्याला आहे, सोलापूरला आहे, अहमदनगरला आहे, धुळे- जळगावला थोडा बहुत आहे, आणि लातूर आणि उदगीर त्या परिसरात काही प्रमाणात आहे.

हा दुधाचा धंदा वाढला. मी आज इंदापूर तालुक्यातील दुष्काळी गावांमध्ये फिरत होतो. आणि येताना आमचा एक



# शेतीत बदल करा जीवनमान बदलेल

**शरद पवार**

कार्यकर्ता, प्रवीण माने हा माझ्या सोबत होता. तुम्हाला त्यांचा परिवार माहिती असेल. प्रवीणचे वडील हे भारतीय सैन्यात जवान होते. आणि त्यावेळी मी संरक्षण मंत्री होतो. त्यावेळी मला महाराष्ट्रात काही कारणांमुळे यावे लागलं. आणि प्रवीणचे वडील सांगतात की, मी संरक्षण मंत्र्याचा राजीनामा दिला म्हणून त्यांनीही सैन्य दलाचा राजीनामा दिला. आणि ते इथं येऊन शेती करायला लागले, उद्योग करायला लागले. शेतीमध्ये काही फारसे जमत नव्हते. मग ते थोडा व्यापार करू लागले. आणि शेवटी दुधाच्या धंद्यात पडले. मी आज प्रवीणला विचारले की, तुझं दुधाचं कलेक्शन किती आहे. त्याने सांगितले की, दुष्काळी परिस्थितीमुळे कलेक्शन कमी झालंय. आता फक्त 18 लाख होतंय. त्याला विचारले काय भाव देतोस सध्या, तर तो म्हणाले, 24 ते 25 रुपये लिटरला देतो. मग मी काही खोलात शिरलो नाही. कारण, माझं गणित कच्च आहे. पण, त्याच्या कुटुंबाने एक ब्रँड तयार केला आणि तो तुम्ही महाराष्ट्रात पाहातच असाल. आणि तो आहे, सोनाई. आणि एक आधार झाला शेतकऱ्यांना.

बारामतीत आम्ही लोकांनी या कामात लक्ष घातलं. मी सुरवात केली आणि मग अप्पासाहेबांनी लक्ष घातलं. या ठिकाणी दूध जमा होऊ लागलं. सुरवातीला आम्ही प्लास्टिक पिशवीत दूध पुण्याला पाठवू लागलो. नंतर लक्षात आलं की, जसं जसं पूशपालनाची आस्था वाढू लागली, तसं तसं दूध जास्त जमायला लागलं. मग आम्ही तालुका पातळीवरचा संघ काढला. पण,



तोही पुरेसा पडेना. त्यामुळे मग शेवटी खासगी क्षेत्रातील लोकांना बोलावले आणि त्यांना या ठिकाणी कारखाना टाकायला लावला. जगातली उत्तम कंपनी या ठिकाणी आणली. आणि डायनामिक्स नावाची कंपनी येथे सुरू केली. आणि साधारण 12 लाख लिटर दूध त्या ठिकाणी प्रोसेस केलं जातं. आणि ते महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेर विकलं जातं. संपूर्ण मशिनरी ही पूर्णवेळ चालू शकत नाही. युटीलायझेशन होत नाही. म्हणून दुपारपर्यंत डायनामिक्समध्ये दुधावरची प्रक्रिया होते. आणि नंतर त्यांचे टँक आणि बाकीच्या गोष्टी क्लीन केल्या जातात. आणि फळांवर प्रक्रिया केली जाते. कदाचित तुमच्यापैकी कोणी ज्यूस पाहिला असेल. काही ज्यूस या ठिकाणी तयार केले जातात. त्याचा ब्रँड संबंध जगामध्ये गेला आहे, त्या ब्रँडचे नाव आहे, ट्रॉपिकाना. आज तुम्ही इंग्लंडमध्ये गेला की, ट्रॉपिकाना मिळतो. पण तो तिथं तयार होतो, ती फळं आपली नाहीत. दुबईला गेला की तो तिथंही पाहायला मिळतो. तो खूपदा इथून गेलेला असतो. आणि तो ब्रँड खूप लोकप्रिय झाला आहे. मग त्याच्यात ऑरेंज ज्यूस आहे. त्याच्यामध्ये डाळिंबाचा ज्यूस आहे. त्याच्यात ग्रेप ज्यूस आहे. मिक्स ज्यूस आहे. आणि दुधापासून जी पावडर तयार केली जाते. त्यापासूनही काही आयटम त्या ठिकाणी तयार केले जातात.

याच्यामध्ये आम्ही गेलो कसे, तर सुरवातीला गाईंचा धंदा जोडधंदा द्यावा म्हणून. मग त्याच्या विक्रीचे प्रश्न आले म्हणून त्याचे पाउचेस तयार करून विकू लागलो. त्यामुळे दूध वाढू लागले म्हणून हा डायनामिक्सचा कारखाना काढायला लावला. त्याच्यामध्ये संपूर्ण मशिनरी वापरता येत नाही, हे लक्षात आल्यानंतर दुधापासून पावडर तयार करायला सुरवात केली. मार्केट सर्व्हे केला होता. पावडर चांगली जाईल असं वाटलं होतं, पण अमूल आणि इतरांच्या स्पर्धेमध्ये आम्हाला काही टिकता आलं नाही. मग विचार केला की, पावडरपासून काही करता येईल का. आणि मग मी एकदा इटलीमध्ये असताना विमानात काही तरी टॉफी वगैरे देतात, त्यानुसार माझ्यासमोर चॉकलेट देण्यात आले. तर मला सवय आहे की, शेतीसंबंधी माल असेल तर तो कोणी बनवला, कसा बनवला, त्याच्यात काय कंटेन्ट आहे, याचं लेबल असतं, त्याच्यावर माझं अधिक लक्ष असतं. ते बघितल्यानंतर माझ्या लक्षात आले की, हे चॉकलेट चांगलं आहे. त्याची मूळ कंपनी कुठली आहे, त्याची चौकशी केली तर ती इटलीतील होती. त्या लोकांची भेट घेतली. त्यांना सांगितले की, तुमची गरज काय आहे. त्यांनी सांगितले की, उत्तम मिल्क पावडर ही आमची गरज आहे. मग त्यांना सांगितले की, तुम्हाला उत्तम मिल्क पावडर दिली तर तुम्ही एखादा कारखाना काढणार का. त्यांनी सांगितले की, आम्ही विचार करतो. मग त्यांनी माहिती घेतली. आणि मग त्यांनी या ठिकाणी कारखाना काढायची तयारी दाखवली. आज मी जो पदार्थ इटलीमध्ये खाल्लेला होता. पाहिलेला होता.



**बकरी पालनासंबंधी श्री. मोरारे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे शरद पवार प्रकाशन करताना, शेजारी विजय बोराडे**

तो आज बारामतीमध्ये तयार होतो आणि तो संबंध देशामध्ये जातो. आशिया खंडामध्ये सुद्धा जातो. एक दिवस मी दुबईमध्ये असताना परत येताना विमानतळावर काही लोकांच्या हातात चॉकलेट आणि इतर बॉक्स होते. मी पाहिल्यावर माझ्या लक्षात आले की, हे बॉक्स कुठं तयार झाले आहेत. त्यांना विचारले की हे काय आहे, तर ते म्हणाले चॉकलेट आहेत. तर त्यांना म्हणालो की, हे आपल्याकडे तयार होतात. तर ते म्हणाले, हे फॉरेनचे आहेत. फॉरेनचे म्हणून घेऊन जायचे. काही हरकत नाही म्हणालो. त्यांना म्हणालो, हे तुम्ही बारकाईने पाहिले का. नाही म्हणाले. आम्ही दुबईतून घेतले. मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअरमधून



डॉ. सुधीर भोंगळे हे पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचे स्वागत करताना.

घेतले. मी त्यांच्या हातातला बॉक्स घेतला. पाठीमागे मॅन्यूफॅक्चर इन इंडिया, बारामती असं लिहिलेले होते. मग त्यांना म्हणालो, तुम्ही फॉरेनचा म्हणून तिकडे घेऊन जाताय. काही हरकत नाही. आज तो संपूर्ण माल गल्फ देशात आणि संपूर्ण हिंदुस्थानात जातो.

मी हे सगळं सांगण्याचे कारण की, तुम्ही सगळे शेतीत रस घेणारे आहात. उत्तम उत्पादन घेता. जे पीक घ्याल ते दर्जेदार कराल. ज्याचे मार्केटिंग देशात आणि देशाच्या बाहेर करायचे असेल, त्या आंतरराष्ट्रीय पातळीवर या संबंधीची जी नियमावली आहे, त्या नियमावलीचाही अभ्यास आपल्याला करावा लागेल.

आपल्या कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ नावाचा तालुका आहे. तिथं चांगली शेती करतात. तिथं उसाबरोबर भाजीपाला चांगला करतात. आणि नंतर माझ्या लक्षात आले की, त्या भागात लोकांमध्ये कॅन्सरचे प्रमाण फार वाढत आहे. आणि त्या भागात तयार होणाऱ्या शेतीमालापासून होत आहे. कधी तरी मी त्या भागात होतो. त्यावेळी सहकाऱ्यांना सांगितले की, दुपारनंतर काही कार्यक्रम ठेवू नका. मला त्यांची शेतं पाहायची आहेत. आणि दुपारनंतर मी शिरोळमध्ये जाऊन धडकलो. आणि अनेकांना भेटलो. आणि माझ्या लक्षात आले की, ती जी काही पिकं घेतली जातात, त्यामध्ये ती रोगमुक्त होण्यासाठी प्रमाणापेक्षा अधिक फवारणी केली जाते. आणि त्या फवारणीचे जे काही अधिक परिणाम आहेत, ते त्या ठिकाणी पाहायला मिळतात. आणि आज जगामध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात तुम्ही तुमचा माल घेऊन गेल्यानंतर त्यातील कीटकनाशकाचा अंश जगामध्ये तपासला जातो. आपल्याला आपले उत्पादन वाढवायचे आहे, ते दर्जेदार करायचे आहे. ग्राहकाच्या त्यांच्यासंबंधी ज्या अपेक्षा आहेत, त्या परिपूर्ण करण्याची खबरदारी आपल्याला सुरवातीपासून घेतली पाहिजे. आणि आपण त्याच्यावर प्रक्रिया करणे सोपे असेल, तर त्या सगळ्या गोष्टीचा विचार केला पाहिजे.

म्हणून आम्ही दुधावरून सुरवात केली. गावची सोसायटी काढली. तालुका संघ काढला. प्रक्रिया कारखाना काढला. त्याच्यातून पदार्थ तयार करायला लागले. त्या पदार्थांना अधिक मार्केट असूनही पावडर करायला लागले. त्या पावडरपासून चॉकलेट करायला लागलो आणि आज त्यातून छोटे मोठे उद्योग वाढवले आणि त्याचा परिणाम लोकांच्या जीवनावर झालेला मला बघायला मिळतो. लोकांचे राहणीमान बदलले. ते काही दुधाच्या धंद्यात नाही. फळबागही आम्ही वाढविल्या. त्याचा परिणाम आहे. उसाची शेती या भागात होते. त्याची परिणाम आहे. या सगळ्यामुळे या भागात शेतकऱ्यांचे जीवनमान बदललेले आहे.

मला आठवतंय की, मी 1967 साली पहिल्यांदा विधानसभेला निवडणूक लढवली. मी त्यावेळी 26-27 वर्षांचा होता. त्यावेळी प्रचाराला घरोघरी जायचो. आजच्या पेक्षा त्यावेळी काम सोपे होतं. आणि खेड्यात गेल्यानंतर परातीत चहा मिळायचा. तो चहा म्हणजे गरम पाणी आणि गुळाचा खडा. तो असा परातीत मिळायचा. आम्ही सुरवातीला असा परातीत चहा घेत होतो. मी काही फारसा चहा घेत नाही. पहिल्या दिवशी प्रचाराला गेल्यानंतर मला परातीत चहा दिला. मी तोंड वाकडं केलं. आणि मी म्हणालो, मी चहा पीत नाही. तर ते म्हणाले, तुम्ही आमच्या घरचा चहाही पीत नाही, तर तुम्ही आमच्यासाठी काय करणार. मी म्हटलो अवघड आहे. आपलं मत जाईल. पितो बाबा. आणि मी तो चहा पिलो. पण नंतर या लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी आम्ही अनेक उद्योग या भागात आणले. पाच वर्षानंतर मी निवडणुकीला गेल्यानंतर ती परात गेली आणि कपबशी आली. पण जी कपबशी होती,



त्याचा कान तुटलेला होता. कारण, त्या काळातसुद्धा असे कान तुटलेले कप देत असत, फेकून देत नसत. त्यानंतर परत 15 वर्षांनी उभे राहिल्यानंतर चांगली कपबशी आली. आणि ज्यावेळी मी त्यांच्या घरात जातो, त्यावेळी ती बैठक चांगली आहे, पूर्वी घोंगडे टाकायचे. आता सतरंजी आली. सतरंजीच्या जागी खुर्ची आली. आता खुर्चीच्या जागी साधा का होईना पण सोफा सेट आला. आणि लोकांचे जीवनमान बदलले.

हे कशामुळे घडले. त्याचे कारण शेती आहे. शेतीमध्ये सुधारणा आणि घरामध्ये शिकलेल्या मुली आल्या. सुना शिकलेल्या आल्या. त्या शिकलेल्या मुली घरात आल्यामुळे घरातील राहणीमानामध्ये आमूलाग्र बदल झालेला आहे. आणि शेतीमध्ये अधिक लक्ष घालून आपल्याला काही परिवर्तन करायचे असेल, तर दर एकरी उत्पादकता वाढविण्यासाठी खबरदारी, त्यासाठी उत्तम बियाणे मिळेल, या संबंधीची काळजी, त्यावर औषधासंबंधीचा वापर करायचा असेल, तर त्या संबंध देशामध्ये आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जी मानके आहेत, त्या मानकांचा वापर करून त्या संबंधीचा वापर आणि हे सगळे करत असताना त्याबाबत प्रक्रिया करायची व्यवस्था होत असेल तर आनंद, नसेल तर त्याच्या विक्री संबंधी मार्केटिंगसंबंधी अधिक खबरदारी घेणे, हा दृष्टिकोन ठेवून आपल्याला पावले टाकावी लागतील.

या भागातील महाराष्ट्रातील काही शेतकऱ्यांनी शेतीत काही बदल करण्याचे ठरवले. आणि विषयुक्त औषधांचा वापर करायचा नाही, फक्त शेणखत आणि तत्सम खतांचाच त्यामध्ये वापर करायचा. आणि उत्पादनासंबंधी मर्यादा असल्या तरी उत्तम माल तयार करून त्याला उत्तम वेस्टन तयार करून



त्याच्या विक्रीसंबंधी काळजी घ्यावी. असा प्रयत्न काही शेतकऱ्यांनी केला. त्याच्यामध्ये मार्केटिंगचा प्रश्न होता. त्याच्यामध्ये आम्ही लोकांनी त्यांच्यासंबंधी बैठका घेतल्या. आणि पुण्यामध्ये त्याच्या संबंधी दुकान उघडले. मगरपट्ट्यामध्ये मोरफा त्याचे नाव. त्यांच्यासंबंधी मी चौकशी करत होतो. त्यातील काही शेतकरी मला म्हणत होते, आणखी शाखा उघडा. दोन पैसे अधिक मिळायला लागलेत. आणि म्हणून शेतीमध्ये जे जगात बदल होत आहेत, त्यावर लक्ष ठेवणे, त्यासंबंधीचे वाचन करणे, आणि त्या संबंधी व्यासंग वाढवून खबरदारी घेणे, हे करत असताना इतरांनाही सोबत घेऊन प्रोत्साहित करणे, यासंबंधीची कार्यक्रम आपल्याला राबवला पाहिजे. डॉ. सुधीर भोंगळे या ठिकाणी आहेत. ते यासंबंधी सातत्याने शेतीत जे जे काही बदल होत आहेत, ते लोकांसमोर आणण्यासाठी आपली लेखणी झिजवत आहेत.

आज महाराष्ट्रामध्ये दुष्काळाची स्थिती आहे. मी गेले दोन- तीन आठवडे महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यामध्ये गेलो. बीडमध्ये गेलो. सोलापूरला गेलो. काल साताऱ्याला होतो. आज पुणे जिल्ह्यामध्ये होतो. अहमदनगर जिल्ह्यामध्ये होतो. आणि चित्र असं दिसतंय की, या सगळ्याच्या मुळाशी पाणी आहे. आणि पाण्याचा वापर करण्याच्या पद्धती हे महत्त्वाचे कारण आहे. ही गोष्ट खरी आहे की, पाऊस कमी पडला. परतीचा पाऊस आला नाही. या गोष्टी खऱ्या असल्या, तरी एकंदर देशाचे सिंचनाचे प्रमाण, ओलीताचे प्रमाण पाहिल्यानंतर पण आपण देश म्हणून 40 टक्क्यांच्या पुढे गेलेलो नाही. पंजाबमध्ये 98 टक्के असेल, हरियानात 95 टक्के असेल, काही राज्यामध्ये 60 टक्के असेल.



शरद पवार यांच्या भाषणाला उपस्थितांमध्ये (डावीकडून) कृषी संहसंचालक दिलीप झेंडे, कृषी आयुक्त सुहास दिवसे, माजी कृषी सचिव डॉ. सुधीर गोयल, विजय बोराडे, डॉ., सुधीर भोंगळे आणि विष्णूपंत हिंगणे.



आपण महाराष्ट्रात 18 ते 19 टक्के आहोत. मला आठवतंय की, मी जेव्हा सुरवात केली, सार्वजनिक जीवनात, त्यावेळी माझ्या जीवनाची सुरवात ही, पाण्याच्या संचयनातून झाली. ही गोष्ट 1964- 65 मधली आहे. जेव्हा मी कॉलेजमधून बाहेर पडलो. आणि या भागामध्ये कालव्याचे पाणी मिळत होते, 1884 साली दुष्काळ पडला, त्यावेळी दुष्काळग्रस्त लोकांना काम देण्यासाठी हे काम केले आणि एक धरण भाटघर म्हणून वरच्या भागात बांधले. त्याच्याबरोबर आपण ज्या भागात बसलोय, तिथे सुबत्ता होती. पण, इथून फर्लांगभरावर असलेल्या कालव्याच्या पलीकडे संबंध दुष्काळ होता. पाणी नाही. धरणाच्या योजना शक्य नाही. काही केल्या आहेत. पण, सातत्याने दुष्काळ. इकडे उसाची शेती असेल, द्राक्षाची शेती असेल, काम करायला लोकं नसतील, तर पलीकडच्या भागातून लोक आणायचे, आणि शेतीत कष्ट करायचे आणि परत जायचे, म्हणजे या भागातील 40 टक्के भागात पाणी आहे आणि 60 टक्के भागात मोलमजुरी करणे, रोजगार हमीच्या कामावर जाणे, याशिवाय पर्याय नाही. तेव्हा या ठिकाणी एक मिशन होते, ऑस्ट्रेलियन मिशन नावाची संस्था. आणि त्या मिशनच्या मदतीने एफ. अेओ. युनायटेड नेशन आर्गनायझेशच्या मदतीने एक योजना ते राबवत होते. त्या योजनेचे नाव होते, फूड फॉर हंगर. म्हणजे भूकेलेल्याला अन्न. ही मोठी राष्ट्र अमेरिका, ब्राझील वगैरे वगैरे त्यासाठी गहू या ठिकाणी पाठवायची आणि एफ.अेओ. आणि तत्सम संस्थांच्या मदतीने या मिशनरींच्या मदतीने हा गहू फुकट वाटायचे. मी ते बघितले. त्यांना भेटलो. त्यांच्या सोबत गावोगाव फिरलो. माझ्या मनाला काही पटत नव्हते. हे फुकट देणं नको. त्याचे जे वरिष्ठ अधिकारी होते. ते पुण्याला होते. मुंबईला होते. दिल्लीला होते. सगळ्यांच्या भेटीगाठी केल्या. त्यांना म्हणालो, तुम्हाला हात जोडतो, पण हे फुकट देऊ नका. त्याच्याऐवजी हा दुष्काळ कायमचा हटविण्यासाठी काही कार्यक्रम हाती घेतला, आणि पडणाऱ्या पाण्याचा थेंब आणि थेंब वाचवायचा, त्याची काळजी घेतली आणि त्याच्या कामाला येणाऱ्या लोकांना मजुरीऐवजी गहू दिला, तर कदाचित आपण या प्रश्नाची सोडवणूक करू शकतो. तेथे माझी फारच चिकाटी होती म्हणून ते म्हणाले, ठीक आहे. एक प्रयोग करून पाहू. तुम्ही एक प्रोजेक्ट करून दाखवा. इथं तांदूळवाडी म्हणून एक गाव आहे, तिथे आम्ही एक तलावाचा प्रकल्प हाती घेतला. आणि सहा महिन्याच्या आत आम्ही तो तलाव पूर्ण केला आणि सुदैवाने त्या वर्षी पाऊसही पडला आणि तलाव पाण्याने भरला. आणि मग लोकं पाहायला येऊ लागले.

मग ज्यांनी आम्हाला गहू दिला, त्यांनी पाहिल्यानंतर त्यांना हे पटले, मग आम्ही ही मोहीम सुरू केली. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण आम्ही तीनशे तलाव बांधले. त्यातून सिंचन काही प्रमाणात वाढलं. मग मी त्यांना विनंती केली की, हे नाव पहिले बदला. फूड फार हंगर्स हे नाव बदला. आणि फूड फार वर्क हे नाव तुम्ही त्याला द्या. ते त्यांनी बदलले आणि मला आनंद आहे की देशामध्ये रोजगार हमी ठिकठिकाणी सुरू झाली. आज त्यात बरेच प्रश्न निर्माण झाले. त्याच्यात खूप अडचणी आहेत. आता त्याच्यात गाळ साचलाय. तलावात पाणी कमी साचतय. कोणी तरी माझ्यासारखा बनेल असेल तलावाजवळ तर त्याने तिथे तलावाखाली विहीर काढली आणि ते पाणी घेतले. तिथे ऊस लावला. जे काही गरीब लोकं होते, त्यांच्यासाठी आम्ही



बलदंडांनी ते पाणी शिल्लक ठेवले नाही. त्यामुळे हे तलाव जरी आम्ही केले, तरी त्याचा लाभ काही सगळ्यांना होईना. आता आम्ही त्याच्यात प्रयत्न करत आहोत की, पाण्याचा वापर कसा करायचा. हे तलाव बांधल्यानंतर भूगर्भातील पाण्याची पातळी वाढल्यानंतर पाणी काढणीसाठी विहिरी घेतल्या पाहिजेत, याबाबत माझ्या मनात दुमत नाही. पण त्या विहिरीतून काढलेले पाणी पाटातून उसाला देण्याऐवजी ठिबकने पाणी देऊन उसाऐवजी जर आपण फळ बागांची पिके घेऊ शकलो, उदाहरणार्थ डाळिंब आहे, किंवा तत्सम कमी पाण्याची पिके आहेत. ती जर घेऊ शकलो आणि ड्रीपने जर घेऊ शकलो, तर सबंध शिवाराला पाणी देण्याऐवजी मुळाला पाणी द्यायची कल्पना ठिबकने राबवली, तर आपण दोन पैसे अधिक मिळवू शकतो. आज या ठिकाणी त्या संबंधी चांगले काम झालेले आहे.

आज अण्णा बोरडे या ठिकाणी आहेत. त्यांनी जालनाजवळील कडवंची या गावातील लोकांनी पाण्याच्या थेंबान थेंबाचा वापर त्या लोकांनी नीट केला, आणि 1100 एकरांत द्राक्षाचे पीक घेतले आहे. आणि या दुष्काळात 64 कोटीची द्राक्षे त्यांनी विकली. तुमचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी एक दिशा दिली. मी हे कशासाठी सांगतोय, तर हे पाणी कसं वापरूया. त्या पाण्याचा थेंब अन थेंब वापर कसा करूयात. त्याच्यातून पिके कोणती घेऊयात. त्याच्यावर प्रक्रिया करून अतिरिक्त उत्पन्नाचा मार्ग काही होऊ शकतो का, त्याचा विचार करूयात. ते करत असताना देशातल्या आणि जगातल्या लोकांची मागणी आहे, त्याची पूर्तता होईल, अशी पिके घेणे शक्य आहे का, ती मागणीची पूर्तता करण्यासाठी आरोग्यासंबंधीची ज्या खबरदारी घ्यायला पाहिजेत, त्याची चैन जर आपण सातत्याने नजरेसमोर ठेवली, त्यातून जर पावले टाकली, तर ते शक्य आहे.

आज लोकसंख्येचा बोजा दिवसेंदिवस शेतीवर वाढत आहे. मी नेहमी सांगतो की, आपण स्वतंत्र झालो, तेव्हा देशाची लोकसंख्या 35 कोटी होती. आणि 35 कोटीच्या 70 टक्के लोकं शेतीवर अवलंबून होते. आज 55 टक्के लोकं शेतीवर आहेत. पण, लोकसंख्या मात्र 110-120 कोटीच्या आसपास जाऊन पोचली आहे. म्हणजे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या कितीतरी पटीने वाढली आहे. जमीन वाढली का. आताचा माझा दुष्काळी दौरा संपल्यानंतर मी पुणे- सोलापूर रस्त्याने आलो. आणि आपण ज्या रस्त्याने जातो, त्या रस्त्याच्या खुणा आपल्या नजरेस असतात. इथं अमुक अमुक रेस्टॉरंट होतं. इथं यांचे घर होतं. इथं यांची वस्ती होती. आता हे हायवे झाले आणि आता आमच्या या जुन्या खाणाखुणा कोणाच्या लक्षात येत नाहीत. याचा अर्थ या रस्त्याच्या विस्तारासाठी शेतीची जमीन गेली. आता या पुण्याच्या आजूबाजूला गेलो. या पिंपरी चिंचवडची गावं शेतीची होती. आता तिथं औद्योगीक वसाहत झाली. मोठे मोठे कारखाने झालेत. टाटा आले, बजाज आले. महिंद्रा आले. संबंध शेती गेली. मग पुढे विस्तारीकरण करायचे ठरले. मात्र, आम्ही लोकांनी ठरवले की, एका ठिकाणी कारखानदारी नको. मग जेजुरीला काढली. मग बारामतीला काढली. मग कुरकुंभ म्हणून येथून जवळ आहे दौंड तालुक्यात, मग तिथून इंदापूर तालुक्यात काढली. तिथून पुढे टेंभुर्णीला काढली. मग नगर रोडला पारनेरला काढली. रांजणगावला काढली. विकेंद्रीत स्वरूपात कारखानदारी काढली आणि त्याच्यासाठी औद्योगिक

केंद्रे सुरू केली. त्याचा लाभ झाला. पण, शेतीची जमीन गेली. या संबंध कारखानदारीसाठी लागणारी जमीन शेतीची संपादित केली. म्हणजे रस्त्यांसाठी जमीन गेली. कारखानदारीच्या औद्योगिक वसाहतीसाठी जमीन गेली. आणि शहरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठीही शेतीचीच जमीन गेली. मी जेव्हा पुण्याला महाविद्यालयात शिकायला होतो. त्यावेळी पुण्याची लोकसंख्या साडेतीन लाख होती. आणि आता पुणे- पिंपरी चिंचवड 60 लाखावर गेली आहेत. आणि सबंध तिथली शेतीही नागरीकरणामध्ये गेलेली आहे. आणि हे सर्वत्र आपल्याला पाहायला मिळते. याचा अर्थ असा, जमिनीवरचा लोकसंख्येचा बोजा वाढतोय. आणि त्याचा परिणाम शेती कमी होते आणि आर्थिक संकट येण्याची स्थिती दिसते. त्याच्यातून मार्ग काढायचा असेल, तर शेतीच्या पद्धतीमध्ये, पीक पद्धतीमध्ये प्रक्रियेमध्ये, मार्केटिंगमध्ये आपल्याला काही ना काही बदल करण्याची गोष्टींचा विचार करताय. आणि साधन संपत्तीचा वापर, शेतीचा ताळेबंद या गोष्टीचा विचार करताय, मत्स्य आणि तत्सम गोष्टींचा विचार करताय. मला वाटतंय यातलं जे तुमच्या हिताचे असेल, जे तुमच्या सोईचे असेल, आणि त्याच्या विक्रीतून कुटुंबासाठी उपयुक्तता असेल, त्या सगळ्या गोष्टींचा विचार तुम्ही केला पाहिजे. त्यासाठी एकटं करू नका. तुमच्या आजूबाजूचे सहकारी असतील, मित्र असतील, त्यांनाही बरोबर घ्या, त्यांनाही प्रोत्साहित करा. ज्याच्यात तुम्ही यशस्विता दाखवता, त्याच्यात तुम्ही यशस्विता दाखवा. मला खात्री आहे की, आपल्या समाजाचे चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही. आज आपल्याला त्या कामामध्ये खऱ्या अर्थाने लक्ष द्यायचे आहे.

मला आनंद आहे की, तुम्ही यामध्ये रस घेता. तुम्ही समजून घेता. तुम्ही यशस्वी झालेले आहात, ते सांगून तुम्ही इतरांना प्रोत्साहित करत आहात. या सगळ्या गोष्टीतून,



कल्पना केली पाहिजे. आणि मला समजले की, चैत्रपालवीचे हे सातवे वर्ष आहे आणि त्यात हे वेगवेगळे व्यवसाय, वेगवेगळे कार्यक्रम, वेगवेगळ्या पद्धती या सगळ्या गोष्टींचा विचार करून काय काय करता येईल, याचा विचार विनिमय तुम्ही करताय.

याचा मला आनंद आहे की, तुम्ही शेतकरी गटाच्या माध्यमातून शेतमालाच्या विक्री आणि बाजारपेठेचा विचार करताय. निर्यातीच्या संधीच्या संबंधीचा विचार करताय. भाजीपाला आणि इतर गोष्टीच्या मार्केटिंगचा विचार करताय. सेंद्रिय शेतीच्या संबंधीचा विचार करताय. दुग्ध आणि इतर

विचाराच्या, अनुभवाच्या देवाणघेवाणीतून आपण निश्चित शेतीत बदल करू शकतो. याचा अर्थ शेतीत बदल म्हणजे आपल्या




जीवनात बदल, आपल्या राहणीमानामध्ये बदल, आपल्या कुटुंबामध्ये बदल, सगळ्याची या माध्यमातून उपयुक्तता राहील, याची मला खात्री आहे. त्यामुळे तुम्हा सर्वांचे मी संस्थेचा अध्यक्ष म्हणून मनापासून स्वागत करतो. अध्यक्ष गैरहजर मालक. इथं काम दुसरे करतायेत. तसा माझा इथं दैनंदिन संबंध नाही. संबंध आहे. मी फक्त दिशा दाखवितो आणि इथं त्या दिशेला कृतीत आणणाऱ्या लोकांचा खूप मोठा संच आहे. हे सगळे करत असतात आणि त्याची पूर्तता ही दिवसेंदिवस होते.

इथं ॲग्रिकल्चरल कॉलेजला आम्ही थोडा वेगळा विचार केला आहे. हॉलंड हा दुग्ध व फळ उत्पादन आणि प्रक्रियेमध्ये जगातला महत्त्वाचा देश आहे. आणि इथं ज्यावेळी आम्ही या संस्थेच्या वतीने कृषी महाविद्यालय काढले, त्यावेळी आम्ही येथे ठरवले की, इथं महात्मा फुले विद्यापीठाचा कोर्स इथं शिकल्यानंतर इथले विद्यार्थी दोन वर्षे नेदरलँडला जातील. आणि तिथं जो कोर्स आहे, तिथं तो शिकतील. तिथली दोन वर्षे झाल्यानंतर त्यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठाची डिग्री मिळेल व नेदरलँड विद्यापीठाची डिग्री मिळेल. आणि युरोपमध्ये नियम असा आहे की, तिथे शेती संबंधी पदवीधर झाल्यानंतर ते सांगतील त्या ठिकाणी दोन वर्षे काम करावे लागते. मग कोणाला जर्मनीत काम करण्याची संधी मिळते. मग कोणाला इंग्लंडला काम करण्याची संधी मिळते. कोणाला फ्रान्सला मिळते. ती संधी त्यांचा दोन वर्षाचा खर्च निघायला मिळते. कधी तरी मी त्यांना भेटायला तिथं जातो. त्या मुला- मुलींमध्ये इतका आत्मविश्वास असतो, त्यांनी जग पाहिलेले असते. युरोप पाहिलेला असतो. आधुनिक शिक्षण घेतलेले असते. त्यांचा आत्मविश्वास वाढलेला असतो. तुम्ही कॉलेजमधील यादी बघा की इथं परत आल्यानंतर त्यातील मुलं कुठं गेलीत, कुठं जॉब करतायेत. स्वतःचा व्यवसाय करताहेत का? काय करतायेत? त्यातील प्रत्येक व्यक्ती वेगळ्या पद्धतीने उभी राहिली. तसं चित्र बघायला मिळते. पुढं मागं तुमच्या पुढच्या पिढीला त्याचा लाभ घेता येईल का, ते पहा.







# खाता न येणारे पिकवा...

## विजय बोराडे यांचा सल्ला



दौन गोष्टींवर चर्चा व्हायला हवी. एक चैत्रपालवीच्या कार्यक्रमाचे स्वरूप कसे असावे. आणि दुसरी चैत्रपालवीच्या कार्यक्रमातील शिस्त कशी असावी. शिस्त कशी असावी, हे संस्था सांगणार नाही. पण, आपण मंडळींनी हे ठरवले पाहिजे की, शिस्त कशी असावी. जर तुम्हाला वाटत असेल की, बेशिस्त हवी. तर आनंद आहे. पण, कदाचित त्यातून चैत्रपालवीचा उद्देश साध्य होणार नाही. कदाचित त्याच्यातून टुरिझम होईल. पण, चैत्रपालवीचा मुख्य उद्देश असा आहे की, गर्तेत सापडलेला शेतकरी येणाऱ्या व्याख्यात्याच्या माध्यमातून जे ज्ञान मिळणार आहे, त्याचा आधार घेऊन आणि इथं जमलेले जे शेतकरी आहेत, ते अनेक विषयात अनुभवी आहेत. यांची आदानप्रदान व्हावी, हा चैत्रपालवीचा मूळ उद्देश आहे. तो साध्य होताना दिसत नाही, अशी संस्थाचालकांची खंत आहे. आपण आता किशोरवयातून पुढे निघालो. सातव्या वर्षात पदार्पण करत आहोत. आपण शिस्त लावून घेणार आहोत की नाही, हे ठरवावे लागेल.

अनेक विषय झाले, मी तुम्हाला शेततळ्याबाबत जागृत करू इच्छितो. शेततळ्यातून उत्पादकाला काय मिळते, हे तुम्ही चव्हाण यांच्या तोंडातून ऐकलेले आहे. त्यांनी एका एकरातून उत्पादनाचा जो आकडा सांगितला आहे, तो विश्वास न बसण्यासारखा आहे. पण, गेल्या आठ- दहा वर्षाच्या प्रयत्नातून त्यांनी हे उभे केले आहे. आणि हा उद्योग प्रत्येक शेतकऱ्याने उभं करण्याची आवश्यकता आहे, ते दोन कारणासाठी. एक तर ते तुम्हाला नेमक्या जागेतून भक्कम उत्पादन मिळण्याची शक्यता मत्स्य शेतीतून आहे. आणि ही बदलत्या हवामानाला ताकद देणारी शेती आहे. मी नेमकेपणाने सांगतो की, बदलत्या हवामानात तुमची पारंपरिक शेती अडचणीत आलेली आहे. त्यावर फारसे पर्याय आपल्याकडे उपलब्ध नाहीत. पर्याय आहेत, पण ते फार कमी आहेत. पण, मत्स्य शेतीला त्याला ओलांडून जाऊ देऊ शकते. म्हणून त्याचा विचार करा. दुसरा विचार एक तुम्ही लक्षात ठेवा, शेतकऱ्यांपेक्षा जागृत समाज खूप आहे. तुम्ही शेतकऱ्यांनी शेततळ्याच्या माध्यमातून जबरदस्त क्रांती केलेली आहे. आता इथं बरेच शेतकरी आहेत की, ज्यांना तळं मिळालं, पण फिल्म मिळाली नाही. कारण, आता हमखास संरक्षित बारमाही पाणी देण्याची क्षमता तुमच्या विहिरीत राहिलेली नाही. ती कदाचित राहणार नाही. ती तुम्हाला केवळ शेततळ्याच्या माध्यमातून शक्य आहे.

आपल्या उशाला पाणी फक्त शेततळ्याच्या माध्यमातून आहे. पण आता त्या शेततळ्यावर कदाचित गदा येण्याची शक्यता आहे. आणि ती गदा संघटित वर्गाकडून येण्याची शक्यता आहे. मी तुमच्या मनात भीती घालत आहे. तुम्ही जागे होण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणवाद्यांनी शेततळ्यांच्या विरोधात भूमिका मांडायला सुरवात केलेली आहे. त्यांची मांडणी अशी आहे की, आणि ती चूक आहे, असं मी म्हणणार नाही. त्यांची मांडणी अशी आहे की, तुम्ही शेततळ्याच्या माध्यमातून पाण्याचे नॅशनल वेस्टेज करत आहात. ते बाष्पीभवनात परावर्तित होतं आणि ते पाणी नष्ट होतं आणि म्हणून ते पाणी शेततळ्यात साठू नये, अशी संघटित संकल्पना पुढे येत आहे. तुम्हीच विचार करा की, तुम्ही जगू शकणार आहात का, शेततळ्याशिवाय.

हेच मला तुम्हाला मत्स्य शेतीच्या माध्यमातून टायप करायचे आहे. पर्यावरणवादी जेव्हा म्हणतील की, हे बाष्पीभवन करतात. त्यावेळी तुम्ही म्हणायला पाहिजे की, आम्ही मत्स्यशेती करतो. आणि मत्स्य शेतीचे पाणी आम्ही संरक्षित पिकाला वापरतो. हे सूत्र तुम्हाला संघटितरीत्या वापरावे लागणार आहे. ही भविष्यात तरतूद आहे. या दृष्टिकोनातून तुम्ही शेततळ्याकडे आणि मत्स्यशेतीकडे पहा.

आता मत्स्य शेतीमध्ये चांगली संकल्पना रूढ होत आहे. ज्याप्रमाणे गणाचार्य मॅडमकडे रेशीमची चावी आहे, ते 30 दिवसांचे पीक 20 दिवसांपर्यंत खाली आणलेले आहे. माशामध्येही तसेच आहे. दीड ते दोन महिन्यांचे बोटुकले तुम्हाला मिळतात, आणि तुम्ही फेब्रुवारीपर्यंत माशांची शेती हार्वेस्ट करून मोकळे होता. इतका उत्तम पर्याय आहे. या बाजूने तुम्ही बघा. चैत्रपालवी या दृष्टीने आहे. त्याकडे तुम्ही बारीक नजर देऊन पाहिले पाहिजे.

मला शेळकेअप्पांबाबत बोलायचे आहे. द्राक्षाचे शेतकरी आहेत. ते प्रामाणिक शेतकरी आहेत. आपल्याकडे अप्रामाणिक शेतकऱ्यांचा बराच भरणा आहे. आज खूप थापा मारण्याची सिस्टिम सुरू झालेली आहे. असतं इंचभर पण ते फूटभर सांगण्याची सवय असते. आपणच आपल्याला फसवतो. आपलाच कोणी वर्ग आपल्याला फसवतो. असा वर्ग निर्माण झालेला आहे. म्हणून विषमुक्त हा शब्द जपून वापरावा लागतो.

रेसीड्यू फ्री हा शास्त्रीय शब्द आहे. आपण तिथं पर्यंत पोचण्याची गरज आहे. विषमुक्तच्या मागे जायचे का. जोपर्यंत चांगला पर्याय येत नाही, तोपर्यंत आमचा शेतकरी फिरू शकणार नाही. जगच तत्त्वज्ञानाच्या मागे जायचं आणि आपण तत्त्वज्ञानाच्या मागे राहायचे, हे नाही होणार. हे आम्हा शेतकऱ्यांना नाही परवडणार. आणि म्हणून आपल्याला व्यवहाराची सांगड घालून या उद्योगात यावे लागेल. म्हणून मला शेळके का प्रामाणिक वाटतात, कारण मुलाचा शेडनेट फिल्मचा व्यवसाय असतानासुद्धा त्यांनी सांगितले नाही. हे मला वैशिष्ट्यपूर्ण वाटते. पण, त्यांचा सांगण्याचा अट्टहास काय आहे की, इथून पुढे संरक्षित शेतीशिवाय शेती करता येणार नाही.

आपण अप्पासाहेब पवार सभागृहात बसलेलो आहोत. अप्पासाहेब जेव्हा इस्राईलला जायचे. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी पहिल्यांदा गेलो तेव्हा मला ठिबक व स्प्रींकलर हे सगळं दिसत होतं. आणि नंतर मी गेलो तर मला पाण्याचे स्प्रींकलर कुठेच दिसले नाही. कारण, त्यांनी मुळाभोवती पाणी द्यायला सुरवात केली होती. आणि आता त्यांनी तर सबसरफेस इरिगेशन सिस्टिम सुरू केली आहे. आणि त्यांनी आता संरक्षित शेती सुरू केली, असं शेळके सांगत होते.

तापमान वाढत आहे, हवामान बदलाचा पूर्ण परिणाम शेतीवर होत आहे. एक शास्त्रज्ञ सांगत होते की, तीन डिग्रीने तापमानात बदल झाला, तर फलोत्पादन शेती उद्‌ध्वस्त होणार. आणि ती परिस्थिती आपल्या पायाजवळ येऊन ठेपलेली आहे. आता तीन डिग्री कुठून मोजायचे, हा प्रश्न आहे. कारण, आता तुम्ही काही ठिकाणी 45 पर्यंत पोचलेला आहात. खरं म्हणजे 3 डिग्री हे 42, 43 मधून मोजायला लागतात. त्याचे परिणाम दिसायला लागले आहेत. आता फ्लोअर तेवढे तजेलदार दिसत नाहीत. तुम्हाला पीक येतंय, पीक उभं दिसतंय, पण सक्षम उत्पादन तुम्हाला दिसणार नाही. हे परिणाम त्या तापमानाचे आहेत. जसं आपल्याला सभागृह लागतं, छत लागतं आणि वर एसी लागतो. तसं आता पिकांनाही लागतं, हे मात्र आता ध्यानात घेण्याची आवश्यकता आहे. ती आता तुम्हाला संरक्षित शेतीच्या माध्यमातून करावी लागणार आहे. आमचे तायडे येथे आहेत. मागे दोन तीन शेतकरी टोपी घालून बसलेले आहेत. ते संरक्षित शेतीचा ध्यास धरतात. औरंगाबादचे ते आहेत. बीजोत्पादनाचा व्यवसाय ते करतात.

बांबूसंबंधीच्या काय चुकीच्या कल्पना आपल्या आहेत. बांबू लावायला लोकं आवर्जून पुढे येत नाहीत. मी नेहमी सांगतो की, वेळ करू नका. पहिल्या पंक्तीला बसायला शिका. पहिल्या पंक्तीला सगळा स्वयंपाक नीट असतो. भातात खडे नसतात. वरणात पाणी नसते. लोणचं, पापड लावलेले असतं. दुसऱ्या पंक्तीला ते बिघडलेले असते. म्हणून तुम्ही पहिल्या पंक्तीला बसा. योजना अशी आहे की, बांधावरही झाड लावण्यासाठी शासन पैसे देणार आहे. ही पहिली योजना आहे. आणि बांबू असे पीक आहे की, ते जगण्यापासून मरण्यापर्यंत. बांबूपासून एवढ्या पर्यावरणपूरक वस्तू निर्माण झाल्या की, उद्याची गरज निर्माण झालेली आहे. आता हॉटेलमध्येही टुथब्रशला दांडी ही बांबूची आहे. आता अमेरिकेत घरे





राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

मॉड्युलर सिस्टीमने बांबूची करत आहेत. एका दिवसात तुम्हाला दोन मजली घर करून देतात. ज्यांच्याकडे पैसे आहेत, ते या बांबूच्या महागड्या घरात राहू शकतात. हा जगाचा ट्रेंड आहे. बांबू उत्पादन आपण करू शकतो. आपण त्याच्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्यांनी बांबूसाठी पर्यावरणपूरक शब्द वापरला. मी तो वापरणार नाही. चिंता काय पर्यावरणाची फक्त शेतकऱ्यानेच करायची का. बाकीच्यांनी काय पर्यावरण दूषित करायचे का. सारखा मोबाईलवर मेसेज येतो की, झाडं लावा, झाडे फार





संपलेली आहेत. आणि वातावरण तापतयं. शेत तुमच्याकडे आहे म्हणून तुम्हालाचा सांगणार. शेतकऱ्यांना सगळेच शहाणपण सांगायला निघाले आहेत, आमच्यासारखे. असं वाटतं की, तो निर्बुद्ध आहे. पण, तो मुलखाचा शास्त्रज्ञ आहे. आणि टोकाचा विचार करून काम करणारा आहे. पण, तो फसतो का, तर तो शोधासाठी निघालेला आहे. अरे ते सांगतायेत तर करून तर पाहू, अरे ते सांगतायेत तर घेऊन तर पाहू, पण तो वेडा नाही. तर, तो प्रयत्नशील आहे. आणि म्हणून या सगळ्या प्रयत्नांमध्ये बांबू हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण, निसर्ग आता लहरी झालेला आहे. सर्वांनी शेतीपुढे आव्हाने निर्माण केलेली आहेत. निसर्गाने पण ती केली आहेत. आता तुम्हाला शेतीसाठी मोठ्या धरणांचे पाणी मिळणार नाही. ही, काळ्या दगडावरची रेघ तुम्ही काढून टाका. कारण, शासन या वर्षीच्या दुष्काळाने फार परेशान आहे. तुमच्या शेतीच्या विहिरींना उपकर बसवला जाणार. म्हणजे तो जिझिया कर असणार. आजही तुम्ही बागायतला कर देत आहात. आणि आता तुमच्या विहिरी बागयतला उपकर बसवणार आहेत. लोकांनी मते नोंदवली आहेत. शासन काय घ्यायचा तो निर्णय घेईल. पण तो तुमच्या मुळावर असणार आहे.

इथून पुढे पाण्याच्या संदर्भात काय विचार करावा लागेल, तो तुम्हीही करायला लागा. कमी पाणी, बिनपाण्याचे या जगाच्या पाठीवर काहीच नाही. प्रत्येक वनस्पतीला पाणी लागते, दव लागते. काही तरी लागते. पण, कमी पाण्यावर येणारे म्हणून त्याच्यात बांबूचा क्रमांक एक आहे. एक वर्षाचा दुष्काळ सहन करणारे ते पीक आहे, म्हणून ते घ्या. मी पर्यावरणपूरक आहे म्हणून घ्या नाही म्हणत. शेतकऱ्याला गारपिटीतही साथ देणारे. शेतकऱ्याला दुष्काळातही भक्कम साथ देणारे. आणि तुमच्या वेळेने मशागत करा म्हणणारे, एकमेव पीक म्हणजे बांबू पीक. त्या पिकाकडे तुमची दृष्टी नीटपणाने जाऊ द्या.

आपल्या येथे पिरंगुटला पुण्याजवळ सीएनजी प्लांट आहे. जो बांबूपासून गॅस तयार करतो. बायोमासपासून तयार करतो. बायोमासचा गॅस तुम्हाला विकता येणार नाही. कारण, ऑर्गनाईज उत्पादन नसते म्हणून. आणि म्हणून संकल्पना अशी येते की, त्यामध्ये गडकरीसाहेबांचा उल्लेख आवर्जून करता येईल. त्यांनी आपल्याला शेतीच नवीन पीक दिले आहे, आणि ते पीक म्हणजे बांबू. ते पूर्वी नव्हतं. ते पिकामध्ये आले आहे. क्लायमेटला भक्कम उत्तर देणारे ते सक्षम पीक आहे. हे पीक तुम्ही घ्या. साडेचारशे

एकरवर जर तुम्ही संघटित लागवड केली. त्यातून चाळीस गावांच्या सर्कलसाठी जे काही इंधन लागणार आहे, ते फ्यूएलच्या स्वरूपात असूद्या किंवा गॅसच्या स्वरूपात असूद्या, हे तुम्हाला साडेचारशे एकरातून चाळीस गावांची गरज भागवता येणार आहे. एवढं सक्षम







नियोजन तुम्हाला बांबूपासून करता येऊ शकतं. जगातील तेल आपल्याला बंद करायचे आहे. आयात बंद करायची आहे. त्यादृष्टीने त्यांनी योजना सांगितली. मी तुम्हाला योजनांमध्ये गुंतवू इच्छित नाही. योजनांचा जरूर आधार घ्यावा. पण, योजना आहेतच म्हणून जावे, हे चुकीचे आहे. प्रत्येक जण विचारतो की, त्याच्यात काही सबसिडी आहे का, पण आपल्याला जगण्याचा आधार, शेतीत उभे राहण्याच आधार म्हणून बांबू येतोय, असा विचार करा. म्हणून बांबूकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघण्याची आवश्यकता आहे. कारण, कुठल्याही गारपिटीत उत्पन्न देणारे ते पीक आहे.

लक्ष्मीराव यांनी तर धोक्याची सूचना दिली आहे. मधुमक्षिका संपल्यानंतर काय होणार, हे सांगण्याची आवश्यकता नाही. हा संदेश दिला की, बिनभांडवली आणि बिनजागेचा कोणताच व्यवसाय जगाच्या पाठीवर नाही. तो मधुमक्षिकापालन आहे. आणि हे व्यवसायातून रूपांतरित झाले आहे. हे आपण चैत्रपालवीतून घेऊन गेले पाहिजेत.

गणाचार्य मॅडम आहेत. टिपू सुलतान याने आणलेले तुती पीक आहे. ते फक्त महिलांसाठी आणलेले पीक आहे. मुस्लीम समाजातील महिलांसाठी टिपू सुलतानने आणलेले ते पीक आहे. आणि तिकडे ते परंपरेने आलेले आहे. आपल्या महाराष्ट्रात आतापर्यंत तीन लाटा येऊन गेल्या. तीन वेळा प्रयत्न झाला उभं करण्याचा. आता चौथा प्रयत्न आहे. आणि आता हा प्रयत्न बऱ्याचपैकी विसावलेला आहे. आणि ती आनंदाची गोष्ट आहे. आमच्याकडे एक रजपूत समाजाची अत्यंत सामान्य कुटुंबातील बाई आहे. अशिक्षित आहे. तिला फारसे बोलताही येत नाही. त्यांची कोरडवाहू शेती आहे. त्यात त्यांनी एक एकरवर तुती केली. त्यातून त्या महिलेने साडेतीन लाखाचे उत्पन्न काढले. आणि यात थापा वगैरे

काही नाही. यात थापा मारतात, हे मी तुम्हाला पहिलेच सांगितले. थापा असाव्यात पण त्या तपासून घ्या, या सदराखाली असाव्यात. कडेगाव नावाचे गाव आहे, बदनापूर तालुक्यातील आणि रजपूत




समाजाची बाई आहे. तिचा आता केंद्रानी हैदराबादला सत्कार केला. वर्षभरात तुतीची चार पिके तिने घेतली. एक फसलं तर दुसरं पक्कं, तिसरं फसलं तर चौथं पक्कं. हमखास तुम्हाला मिळणार. एवढी सक्षमता दुसऱ्या कोणत्याही पिकात नाही. आणि सरकारी नोकराप्रमाणे दर महिन्याला पगार देणारे, दुसरे कोणतेही पीक नाही. दर तीस दिवसाला पगार आणि त्यामध्ये दर महिन्याला चार सुट्या पण आहेत. कारण, त्या कातणीला जातात, त्यावेळी तुम्ही कडी लावून घरी निघून जावा. कामाला निघून जावा. गावाला जावा. त्यांना काहीही लागत नाही. एवढं गुणी पीक म्हणून त्याचे नाव आहे तुती. पण, हा शब्द जोडून नाही घ्यायचा. तू आणि ती असं करायचा, म्हणजे तु ती होते. महिलांशिवाय हा उभा राहू शकणार नाही. कारण, त्यात संगोपन आहे. लहान मूल तुम्हाला सांभाळता येणार नाही. ज्याला सांभाळता येईल, ते जरूर करतील. पण दोन तास लहान मूल सांभाळून पहा. शक्य होत नाही. तुम्ही पुरुषांना प्रशिक्षण देऊ नका आणि पुरुषांना द्यायचे असेल तर अमाप फी लावून द्या. मोफत देऊ नका. आमच्या कृषी विज्ञान केंद्रात आम्ही महिला आल्या तर त्यांना मोफत शिक्षण देतो. पण, पुरुषांकडून दाबून पैसे घेतो. पुरुषांना मोफत प्रशिक्षण देऊ नका. कारण, हे करणार काहीच नाहीत. करणार महिला आहेत. मी पण पुरुष आहे. पण, आपल्यातील तो दोष आहे. म्हणून तुतीकडे पाहण्याची दिशा आणि दृष्टिकोन बदला. क्लायमेट चेंजसाठी ही दोन पिके आहेत, बांबू आणि रेशीम.

तिसरं पीक मेडीस्टील आणि अरायसमेटेल ग्रासेस. आणि त्याच्यापासून डिस्टीलेशन करून तेल काढणे. हिमा रोझा. पामा रोझा, रोशा, जिरायमील, हे तेले आहेत. दोन हजार रुपयापासून ते 12 हजार रुपये लिटर याचा भाव आहे. हे अत्यंत कमी पाण्यात येणारे पीक आहे. गवत म्हणजे सर्वांत शेवटी जळणारी वनस्पती. मी तुम्हाला गवत का सांगितले तर शासन तुमच्या पाण्यावर गदा आणणार आहे. आपण सरकारशी भांडू, पण घरी संसार तुम्हालाच तुमचा करावा लागणार आहे. हे मात्र लक्षात ठेवा. संसार काही सरकार येऊन करणार नाही. भांडणं चालू राहतील. पण संसाराची नेमकी व्यवस्था आपण आपली चालू ठेवली पाहिजे. त्यासाठी चैत्रपालवी आहे. त्यासाठी तुम्ही याचा विचार करा. अरोम्याटीक आणि मेसलेल ग्रासेस अत्यंत कमी पाण्यावर करता येतं. हे सुद्धा क्लायमेट चेंजसाठी उपयुक्त आहे.

आता आपल्याला हवामान बदलासाठी अशा वेगवेगळ्या गोष्टी आणाव्या लागतील. आपल्याकडे शेतकरी संघटनेचे शरद जोशी होते. त्यांनी सांगितले होते की, आपल्यापुरते पिकवा. मी थोडसं सुधारित करतो की, भक्कम पिकवा. पण काय पिकवा, तर तुम्ही जे शेतीत पिकवता, ते प्रत्यक्षात तुम्हाला खाता येत नाही. असं काय काय आहे, त्याचा शोध तुम्ही घ्या. आणि त्यात आम्हाला सापडल्या आहेत ती गोष्टी. एक बांबू, प्रत्यक्षात खाता येत नाही. पण, त्याची भाजी करता येते. पण लिमिटेड, बांबू खाता येत नाही, पिकवा. रेशीम खाता येत नाही, पिकवा. आणि गवतं खाता येत नाही, पिकवा. म्हणजे शासन वठणीवर येईल आणि तुमची आठवण यायला लागेल. म्हणजे देशाची उत्पादकता घटवायची नाही, ती कमी करायची नाही. आणि न बोलता शासनाला वठणीवर आणण्याचा हा प्रयोग होऊ शकतो. आणि तुमची उत्पादकता तुम्हाला मिळू शकतो. प्रत्यक्षात खाता येत नाही, ते पिकवा.

चैत्रपालवी संदर्भात आपण काही दंडक घालून घेणे आवश्यक आहे. आपल्याला पुन्हा पुन्हा एकत्र यायचे आहे. चैत्रपालवी निमित्ताने नवीन मित्र जोडा. मित्रांची फोड करणे चैत्रपालवीत करणे गरजेचे आहे. दोन दिवस एकत्र राहिलो तर तो नवीन घरोबा चैत्रपालवीच्या निमित्ताने उभा राहील. ती खरी विचारांची आदानप्रदान होईल. तुम्ही कसे आहात. मी कसा आहे. तुमच्याकडे लग्नकार्य कशी होतात. आमच्या मराठवाड्यात कसे होतात. कोणते खर्च टाळले पाहिजेत. वारल्यानंतरचे दिवस कसे साजरे करतात. चैत्रपालवी या सर्वांसाठी आहे. एकूण संसाराचा गाडा नेमकेपणाने चालावा, यासाठी चैत्रपालवी आहे.



चैत्रपालवीचा उद्देश हा तुम्ही इथं येऊन कुठलं तरी सेमिनार अटेंड करणे, असा नाही. केव्हीकेच्या माध्यमातून आम्ही वर्षभर वेगवेगळे सेमिनार घेत असतो. अगदी लक्षद्वीपपासून काश्मीरपर्यंत आणि अगदी अफगाणिस्तानमधूनही लोकं इथं येत असतात. त्यांना शेती संबंधी जेजे विषय लागत असतील किंवा बँकेचे अधिकारी असतील, किंवा साउथचेही शेतकरी असतील, ते इथं येतात. दहा दहा दिवसांचे सेमिनार घेतात. आणि परत जातात. हा उद्देश चैत्रपालवीचा नाहीये. त्यामुळे तुम्हा सर्वांना विनंती आहे की, तुम्ही जर तो उद्देश घेऊन आला असताल तर तो उद्देश नाहीये. ज्याप्रमाणे आता कुंभ झाला. शंकराचार्यांनीही चार ठिकाणे निवडली होती. पण, त्या मागे एक अर्थ ध्यानात घ्या की, त्या मागे जरी धार्मिक भावना असली तरी, या खंडप्राय देशातून लोकं येऊन तिथे वैचारिक देवाणघेवाण करत होते. त्यातून धार्मिक, आध्यात्मिक किंवा इतर ज्ञानाची देवाणघेवाण होत असेल. आणि नेमका हाच विषय आपल्याला आख्ख्या महाराष्ट्रातून इथं घडवायचा आहे. अपेक्षा अशी आहे की, वेगवेगळ्या गावातले जे तज्ज्ञ शेतकरी आहेत, तज्ज्ञ आहेत असे नाही, तर ज्यांनी निरीक्षण शक्ती चांगली आहे. जो उत्तम शेती करतो. त्याने इथं यावं, त्याने या सर्वांशी चर्चा करावी. आणि आपल्या गावातील लोकांना मार्गदर्शन करावे. आणि आपला हा शेतीप्रधान महाराष्ट्र आणखी पुढे जावा, असा हा उद्देश आहे. कारण, प्रत्येक गावातील व्यक्ती येथे येऊ शकत नाही. काही मर्यादा आहेत. दरवर्षी ज्याप्रमाणे पांडुरंगाला तीच तीच माणसे जातात, वारी करतात, तशी आपणही या चैत्रपालवीच्या निमित्ताने यावे. या दिवसात आपण जरा मोकळे असता. त्यामुळे या काळात आपण चैत्रपालवी घेतो. गेली सात वर्षे आपण हा प्रयोग राबवत आहोत.

कदाचित या चैत्रपालवीबाबत मी जरा नाराज आहे. तुम्ही यशोगाथा पाहिलेल्या आहेत. त्याचा शेतकऱ्यांनाही फायदा झाला असेल. मला जे वाटते, तसे यश या चैत्रपालवीतून मिळत



# शेतीकडे व्यावसायिक दृष्टीने पहा

## बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष राजेंद्र पवार याचा सल्ला

नाही. किंवा जो उद्देश आहे, तो साध्य होत नाही. याचा उद्देश जास्ती करून आपल्याला सेमिनारसारखा होतोय, आणि मला ते नकोय. आख्खा महाराष्ट्रातला शेतकरी बांधला गेला पाहिजे. त्यांनी एकमेकांशी संवाद साधला पाहिजे. मिडियाचा उपयोग करून घेतला पाहिजे. तुम्हाला जर एखाद्या शेवग्याविषयी प्रश्न आला तर तो ग्रुपवर टाकून पुण्याच्या माणसाने गडचिरोलीच्या माणसाशी बोलले पाहिजे. आणि ते होत नाही. त्यासाठी तुम्ही यंदा नाही पण पुढच्या वर्षी होणाऱ्या चैत्रपालवीसाठी सांगितले पाहिजे. चैत्रपालवीचा फायदा लाखो लोकांना झाला पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे.

सगळे म्हणतात की, तुम्ही समाधानी नाहीत. हो, मी समाधानी नाही. कारण, या संस्थेचे जे चेअरमन होते, ते 19 वर्षांपूर्वी वारले. त्यांचा चांगला सहवास ज्यांना ज्यांना लाभला, इथं बोराडे सर आहेत, सुधीर भोंगळे सर आहे. त्यांना त्यांचा चांगला सहवास लाभला, जेवढा मला मुलगा असताना लाभला नाही. आपल्याकडे एक उक्ती आहे, ठेविले अनंते, तैसेची राहावे. परंतु अप्पासाहेब नेहमी म्हणायचे ठेविले अनंते, तैसेची का राहावे. चित्ती नसावे समाधान. हा त्यांचा स्वभाव होता. कदाचित त्याच पद्धतीचा माझा स्वभाव आहे. आपणही त्याच पद्धतीने राहिले पाहिजे. त्याशिवाय नवनिर्मिती होत नाही.

होस्टन गाईवर महाराष्ट्राचा बराचसा दुष्काळी भाग अवलंबून आहे, की ज्याचा मुख्य व्यवसाय दुग्ध व्यवसाय आहे. त्याची सुरवात कोणी केली, 70 सालामध्ये अप्पासाहेब पहिल्यांदा इस्राईलला गेले. त्यांनी तिथली गाय पाहिली. त्यांना पूर्वीची दोन- चार लिटरची देशी गाय माहिती होती. ते भारावले. त्यांनी परत आल्यानंतर मोठ्या प्रमाणात काम सुरू केले. त्यावेळी मणीभाई देसाई असतील, अण्णासाहेब शिंदे असतील, ते त्यावेळी मंत्री होते. त्यांची साथ घेऊन त्यांनी आख्ख्या महाराष्ट्र पिंजून काढला. होस्टन फ्रिजर गाय काय असते आणि दोन- चार लिटरचे दूध वीस लिटर कसे मिळते, ही किमया त्यांनी



दाखवली. कारण, ते कधीही समाधानी नव्हते. नाहीतर दोन लिटरच्या गायीवर ते समाधानी असते, तर ही 20 लिटरची गाय तयार झाली नसती. त्याचप्रकारे ड्रीपच्य बाबतीत असेल. 80 सालामध्ये ती इस्राईलला गेले. त्यांनी तिथे ड्रीप पाहिले आणि त्यांनी त्यांच्या आयुष्यातील 25 वर्षे ड्रीपसाठी आणि हा परिसर पिंजून काढण्यासाठी घालवले. आज आपल्याला ड्रीपशिवाय पर्याय नाही. कदाचित तरुणांना वाटत असेल की, ड्रीप ड्रीप काय, दुकानात जायचे आणि घ्यायचे. त्यावेळी ड्रीप तयारही होत नव्हते आणि ड्रीप काय असते, हेही माहिती नव्हते. लोकांचा त्याच्यावर विश्वासही नव्हता आणि ते काम अप्पासाहेबांनी केले. जर त्यांनी मनात समाधान ठेवले असते, तर या गोष्टी झाल्या नसत्या. मी चैत्रपालवीवरती समाधानी नाही. आपण त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात करून घेतला पाहिजे.





एक लक्षात ठेवा, आपण शेती करत आहे, शेतकऱ्याला सरकारने नक्कीच मदत दिली पाहिजे. आज हजारो वर्षे झाली. चंद्रगुप्त मोर्या असेल अशोक असेल, असे अनेक राजे होऊन गेले. त्या काळातही शेतकऱ्यांना दुष्काळात मदत केली जात होती. शिवछत्रपतींच्या काळातही पद्धत वेगळी असेल. तगई असेल. बी देण्यासंदर्भात असेल. त्या काळात लोकशाही नसतानाही ते राजे लोकांना मदत करत होते. तर आता सरकारने का मदत करू नये. मदत केली पाहिजे. पण, मला एक विनंती करायची आहे की, शेतकरी गरीब आहे, शेतकरी खूपच गरीब आहे, त्याला खूपच अडचणी आहे, असं आपण म्हणून घ्यायचे का? हात सारखा आपण पसरवायचा का? सरकार करेल ते करेल. अधिकारी करतील ते करतील. त्यांचे सर्व डिपार्टमेंट राबत असते. मग आपण काय करत असतो. आपण काय करायचे. कारण, शेवटी आपण शेती हा व्यवसाय आपण करतो. शेतीचा व्यवसाय करत असताना तो आपण आपल्यासाठी करत असतो. आपल्या लेकराबाळांसाठी करत असतो. आपल्या प्रपंचासाठी करत असतो. कुठला फायदा झाला तर तो आपण आपल्यासाठी घेत असतो. त्या पद्धतीने आपण जावे, असं मला वाटत असतं.

शेवट जग बदलत आहे. जग का बदलतय याचा विचार आपण करायला पाहिजे. कारण, इस्राईलसारखे देश तर आपल्या फार पुढे गेले आहेत. युरोपातील देशांनी आफ्रिकेतील केनियासारख्या देशात येऊन शेती केलेली आहे. साखर आपल्याच देशात आहे, असं नाही. आपल्याच देशातील अनेक उद्योजकांनी आफ्रिकेत पैसे गुंतवले आहेत आणि मोठ्या प्रमाणात उसाची शेती केली आहे. शेवटी जगात साखर जेवढी लागणार आहे, तेवढीच लागणार आहे. हा साखर किंवा उसाच्या व्यवसायावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. द्राक्षेसुद्धा केनियात वाढायला लागली आहेत. हे सगळे देश जर बदलतायेत, थायलंडसारखा देश फळांमध्ये पुढे जात आहे. बाजारात

थायलंडची किती फळे येतात. आपली का येत नाही. बऱ्याच वेळा मला दुःख वाटते की, दिल्लीसारख्या ठिकाणी जे अधिकारी लोकं आहेत, ते नेतेमंडळींना किंवा जे देश चालवतात, तिथं तेवढं बघितलं जात नाही. आपण सफरचंद आणि इतर फळे बाहेरून एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणायला लागलो आहोत, परंतु त्या देशांना टक्कर देऊ शकणाऱ्या व्हरायटी आपल्या ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी व खासगी युनिव्हर्सिटी करू शकत नाहीत. आणि बाहेरून रेडिमेड व्हरायटी आणायला आपल्याला परवानगी दिली जात नाही. या सगळ्या कात्रीत हा सगळा आख्खा देश सापडलेला आहे. ते आपल्या हातात नाही. व्हिएतनामासारखा देश अमेरिकेकडून कित्येक वर्षे बेचिराख झाला होता. कर्जसुद्धा त्यांना अजून देशाचे फेडायचे आहे. तोसुद्धा साध्या माशात पुढे चालला आहे. बासा नावाचा जो मासा आहे, तो कित्येक टन आपल्या भागात खपत आहे. बासा मासा इथं येतो आणि कित्येक प्रमाणात विक्री सुरू झालेली आहे. ते आणतात आपण का नाही. आंध्रमध्ये तोच मासा तयार होतो. मग आपण महाराष्ट्रात का तयार करत नाही. तुम्ही म्हणसाल की, आमच्याकडे पाणी नाही. पण, शेततळ्याचा काही उपयोग करून घेता येईल का. त्यांच्या प्रत्येक इंच आणि इंच आणि थेंब आणि थेंब वापर करून घेऊ शकू का. याचा आपण विचार करा.

ज्यावेळी तुम्ही बारामती ॲग्रिकल्चरल ट्रस्टचा परिसर पहाल, त्यावेळी होस्टन गायी पहा. चाळीस वर्षापूर्वी गायी आलेल्या आहेत. पण अजूनही शेतकऱ्याच्या गायी 10-20 लिटरच्या पुढे गेलेल्या नाहीत. आपण क्रॉस बिडिंगचा विचार करत नाही. फिडिंगचा विचार करत नाही. धंदा आपण करतो, तो समजून घेत नाही. की, धंदा बदलतोय कसा. हे आपण चैत्रपालवीत समजून घेतले पाहिजे. ते आपण ट्रस्टमध्ये बघा. आता आपण एम्ब्रियो ट्रान्सफरच्या माध्यमातून 40-45 लिटरच्या कालवडी तयार करत आहोत. ते तुम्ही समजून घ्या. देशी गाईंचे मोठे फॅड आलेले आहे. गाय आपण धार्मिकतेने बघायची की, व्यवसायाने पाहायची. धार्मिकतेने बघायची असेल तर रोज पूजा करा. तिच्याकडून बाकीच्या अपेक्षा करू नका. आणि बाकीच्या अपेक्षा करायच्या असेल तर ब्राझीलमधून गाय गेली. त्यांनी 70-70 वर्षे संशोधन केले. त्यांनी देशी गाय 20 लिटरच्या पुढे आणली. ती खरंच आणली का. तुमचं मोठ्या प्रमाणात गोंधळ उडवतात. 40 लिटर दूध देती सांगतात. अरे नाही देत. 20 लिटरच आहेत. ब्राझीलमध्ये सगळ्याच गायी तशा नाहीत. आपल्यापेक्षा त्यांचा देश उलटा आहे. आपला देश जसा वरती थंड होत जातो आणि खाली गरम आहे, तसा त्यांचा खाली थंड आणि वरती गरम आहे. जिथे सोसत नाही, तिथे आपल्या देशी गायी आहेत. आंध्रातील असेल ती मांसासाठी, जी गीर असेल ती दुधासाठी आणि खाली गेले तर पूर्ण होस्टेन आहे.





जिथे आहे, तिथे तसं करा.

तरुण मुलांना सांगितले जाते की, गीर गाया पाळा, देशी गाया पाळा. अरे पण तुम्ही करसाल. कर्ज काढसाल आणि खड्ड्यात जासाल. चाळीस वर्षापूर्वी तुम्ही त्या गायी कशासाठी केल्या आहेत. कशासाठी होस्टन गायी आणल्या आहेत. तो वादाचा विषय मी बाजूला ठेवतो. दूध हे दूध आहे. ए वन, ए टु हे सांगितले जाते. सगळं कन्फ्यूजन आहे. ज्याला सिल्कचे कापड परवडते त्याला सिल्कचे घ्या. ज्याला कॉटनचे परवडते त्याला कॉटनचे घ्या. पण आज तुम्हाला 150 कोटी जनतेची गरज भागवायची आहे. तुम्ही आणणार कुठून. देशी गायीतून. 80 वर्षे काम करावे लागेल त्याला. ज्याला प्यायचं त्याला पिऊद्या. पण त्याला 100- 125 रुपये द्यावे लागेल लिटरला. आपणही देशी गाईवर काम सुरू केले आहे, त्याचा अर्थ लगेच रिझल्ट भेटेल, असा नाही. वेगानी जाण्यासाठी आपण त्या एंब्रियो ट्रान्सप्लांन्ट कालवडी तयार करून शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न करणार आहे. आपले प्रयत्न चाललेले आहेत. अनेक प्रयोग चाललेले आहेत. कामाला लिमिटेशन आहे. ही संस्था म्हणजे काही सरकारी फंड्स नाहीत. काही प्रमाणात निधी मिळतात. तेवढा आपण त्याचा उपयोग करून घेतोय, मात्र एक नक्की आम्हाला गेल्या काही वर्षात अधिकारी वर्ग असतील, सरकार चालवणारे असतील, महाराष्ट्रातील असतील किंवा केंद्र सरकारचे असतील. दिल्लीतील अधिकारी असतील, या मंडळींनी कधीही दुजाभाव न करता आम्हाला सपोर्ट केलेला आहे. नीती आयोगानेही या ट्रस्टला मान्यता दिली. त्यांना पटलं की हे काम करू शकतात. त्यामुळे नीती आयोगानेही आपल्याला फंड्स दिलेले आहेत. गायीच्या संदर्भात संशोधन करण्यासाठी आपल्याला मदत केलेली आहे. वेळोवेळी हे कमिशनरपासून अधिकारी आपल्याला मदत करत असतात. त्याचा आपण येथे उपयोग केला आहे.

मला तुम्हाला एकच विनंती करायची आहे की, तुमच्यातले काही शेतकरी असे तयार झाले पाहिजेत की, ते संशोधन करतील. शेवटी आम्ही हे सगळं उभं करणार आहे. पुढच्या वर्षी तुम्ही येसाल त्यावेळी तुम्हाला इथं बिल्डिंग दिसेल. इथं रिसर्च कोण करणार आहे. आम्ही विद्यार्थ्यांना लावू. पण, बरेच शेतकरी असे आहेत की, दहावी- बारावी असले तरी त्यांच्या डोक्यात वेगळं काही तरी नवीन असतं. फक्त भारतातच असे आहे की, ते मार्क आणि डिग्रीवर चालतं, पण तसे नाही. जगात तसं चालत नाही. परदेशात तुम्हाला पीएचडी करायची असेल तरी तुम्हाला संधी मिळते. तसा शेतकरी यावा. तो तुमच्यातूनच आम्हाला सापडावा. महाराष्ट्रातून यावा. तो इथं



येईल आणि काही तरी शोधून काढीन. काही तरी नवीन शोधायचे आहे. शेवटी आपल्याला आपल्या गोष्टी करायच्या आहेत. त्याचा उपयोग आपण करून घेतला पाहिजे.

साध्या गोष्टी असतात. तुम्ही सेंट्रल ऑफ एक्सलंट पाहिले असेल, तिथे ग्राफटिंग बघता. तुम्ही गावाला बघा, कितीतरी वनस्पती आहेत की, त्या बिनपाण्याच्या वाढतात. त्या शोधा आणि आम्हाला सांगा. त्यातले सायन्स काय आहे, ते आमची लोकं बघतील. एखाद्या वांग्याचे झाड आहे, तर तुम्ही सांगा की, असं असं वांग्याचे माझ्या गावात झाड आहे आणि ते बीनपाण्याचे वाढते. आणि ते इथं आणू. त्याच्यावर प्रयोग करू. ते ग्राफ्ट करू. आणि ते कमी पाण्यात आणि कमी खतात कसं चांगलं वांगं देईल, ते बघू. कारण, भविष्यात आपल्याला स्पर्धा करणारे खूप आहेत. आपण शेतकरी गरीब म्हणून जगणार नाही. मला सांगा, उद्या पोलिस खात्याने ठरवले की, दंडूक घ्यायचा आणि सगळे कंट्रोल करायचे. तर ते जमणार आहे का. त्यांना हत्यारे लागतील. त्यांना सायबर लॉ संबंधी माहिती लागेल. आपले सैन्य आहे, त्यांना आपण सांगितले की, नाही आम्ही गरीब आहे भारत देश आणि आम्ही सीमेचे रक्षण साध्या तलवारीने नाहीतर कशाने तरी करतो. तर हे चालणार आहे का. त्यासाठी आपल्याला आधुनिकतेकडे जावे लागेल. पूर्वी चार मुले असतील, त्यातील हुशार तीन असतील तर ती शिक्षक व्हायची आणि वर जायची, आणि ज्याला काही जमत नाही, त्याला शेतीवर ठेवला जायचा. ते चालणार नाही. तुम्हाला जमीन कळाली पाहिजे. तुम्हाला खत खरंच घालावे लागणार आहे का. तुम्हाला औषधे मारायची कळाली पाहिजे. ते फळ विकायचे तर मार्केटिंग समजले पाहिजे. या सगळ्या गोष्टी ज्याला समजेल तोच भविष्यात शेती करेल, असं मला वाटतं. गरीब म्हणून चालणार नाही. आपण याबाबत नक्की विचार करून घ्या. एक क्रिएटिव्ह शेतकरी बना. आमचे एक ट्रस्टी आहेत मगरसाहेब, त्यांना माहिती आहे की, कोकणात राब भाजतात. ते राब का भाजतात, ते माहिती नाही. पण, ते आइन वृक्षाची पाने वापरतात. त्यात चांगला घटक असतो. मग तुम्ही का ती पाने जाळता. तुम्ही फक्त तुमच्यातला शेतकरी शोधा. फक्त रोजच्या रोज थकले भागलेले न राहता आपला मेंदू मोकळा ठेवून रोज विचार करा. तो घटक वापरून आपण झाडं वाचवू. अशा अनेक गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे. यातून प्रत्येक चैत्रपालवीत असे दहा तरी शेतकरी असे मिळाले, की ते काही तरी संशोधन करणार आहेत, तर याचा उपयोग या ट्रस्टला होईल आणि त्याचा उपयोग आम्हाला आख्ख्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना करून देता येईल. तुमच्या गावात जरी असा शेतकरी असेल, तर तुम्ही नावे नोंदवा. त्यांना आपण शोधू. इथं या आणि समजून घ्या. गेल्या अनेक वर्षापासून अधिकारी वर्गानी चांगली मदत केली. त्यामुळे आम्ही तुम्हाला प्रशिक्षण देवू शकलो.





# शेतीच्या ज्ञानाचा कण कण गोळा करा

## डॉ. सुधीर भोंगळे यांचे विचार

नवीन प्रकाराची शेती जी जगामध्ये विकसित होत आहे, तिची कास जर आपण धरली नाही, तर आपण कालबाह्य होत जाणार आहे. आणि बाहेरून माल येऊन तो बाजारपेठेत काबीज करणार आहे. मग आपण म्हणणार आहे की, 150 वर्षे लढून ब्रिटिशांना घालवलं आणि आज बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रूपाने परकीय माल आमच्या छाताडावर येऊन बसत आहे. म्हणून नवीन ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान याची कास आपण सगळ्यांनी धरायला पाहिजे.

शेतीचे नियोजन करत असताना आण्णासाहेब शिंदे हे राज्याच्या प्लॅनिंग कमिशनचे उपाध्यक्ष होते, त्यावेळी पवारसाहेब मुख्यमंत्री होते. ते त्यांना सारखे पत्र लिहायचे की, महाराष्ट्रात किमान 25 टक्के शेतीही फळबागांखाली गेली पाहिजे. आज काय चित्र आहे. महाराष्ट्रात 210 लाख हेक्टर जमीन आहे. त्यातले 25 टक्के म्हटले तरी, 50 लाख हेक्टर जमीन फळ बागाखाली पाहिजे. आज





दुर्दैवाने महाराष्ट्राचे चित्र असे आहे की, आपण फळबाग योजना 90- 91 ला पवारसाहेबांनी राबवली. प्राधान्याने केली. 18 लाख हेक्टरवर गेलो. पुन्हा मागे आलो आणि आज पुन्हा सात लाख हेक्टरवर स्थिर होऊन बसलेलो आहोत. नवीन तंत्रज्ञान फळबागांमध्ये विकसित झालेले आहे.

मिरजजवळ बेळंकी नावाचे गाव आहे. राजू गोंडा पाटील यांची शेती बघायला मी गेलो. त्यांनी चार बाय एक वर आंबा लावला आहे. म्हणजे दोन रोपांतील अंतर एक मीटरचे



आहे. आणि दोन ओळीतील अंतर चार मीटरचे आहे. एकरी एक हजार आंबे लावलेले आहेत. 2011 सालची आंब्याची लागवड आहे. दुसऱ्या वर्षीपासून उत्पादन सुरू झाले आहे. 16 एकर एकूण आंबा आहे. त्यातल्या 15 एकरवर जंबो केशर आहे. आणि एक एकरवर बारमासी आहे. प्रत्येक फळ हे सहाशे ते साडेसहाशे ग्रॅमचे आहे. झाड सात फुटाच्या वर वाढू द्यायचे नाही, सातवं पीक या वर्षी घेत आहे. आणि दक्षिण उत्तर लागवड करायची आहे. म्हणजे दिवसातील तीनही वेळेचा सूर्यप्रकाश हा त्या पानांना मिळाला पाहिजे. आणि प्रकाशसंस्लेषणक्रिया उत्तम झाली पाहिजे. पानं अगदी जमिनीलगत चिकटवून ठेवायची आहेत. झाडं लावताना चर खोदायचा आहे. त्या चरामध्ये झाड लावायचे आहे. दोन बाजूंनी ड्रीपर बसवायचा आहे. पाणी बरोबर झाडाच्या मुळाशीच पडलं पाहिजे. पाणी इतरत्र जाता कामा नये. दोन दोन ड्रीपर त्यांनी या पद्धतीने लावले आहेत. आज त्यांना आंब्यातून एकरी सात ते



आठ लाख रुपयांचे उत्पन्न दरवर्षी मिळत आहे. साधं गणित धरलेले आहे. एका झाडावर मोजून 50 फळे धरायची. बाकी फळं काढून टाकायची. सहाशे ते साडेसहाशेचे फळ जर तयार झाले, आणि साधारण 10 रुपयाला जरी एक फळ गेले, आपण बाजारात बघतो की, 90 ते 100 रुपये किलोने केसर आंबा मिळतो. हा तर जंबो केशर आंबा आहे. किती तरी पैसे अधिक होऊ शकतात. आज जर तुम्ही पाहिले तर आंब्याचे मागणी आणि खाणाऱ्यांचे प्रमाण 16 टक्क्यांनी वाढत आहे. अजून तरी जगातील 20 टक्के लोकांनीच आंबा खाल्लेला आहे किंवा पाहिलेला आहे. 80 टक्के लोकांना अजून आंब्याची चव माहिती नाही किंवा आंबा पाहिलेला नाही. याच्यावरून तुम्हाला लक्षात येईल की या फळाला वाढवायला आपल्याला किती मोठी संधी आहे.

मागच्या वर्षी मी एक महिना इस्राईलला हार्टिकल्चरचे ट्रेनिंग घेण्यासाठी गेलो. ते मला तासाला 100 डॉलर फी आकारत

होते. म्हणजे तुम्ही लक्षात घ्या, की एक माणूस जर मला एक तास शिकवत असेल तर तो माझ्याकडून 6 हजार रुपये घेत होता. मला त्याने ग्रीन हाउसमध्ये फळ, भाजीपाल्याचे उत्पादन कसे घ्यायचे, फळांचे उत्पादन कसे घ्यायचे, फळ बागा कशा नवीन उभ्या करायच्या, याचे एक महिना सर्व तंत्रज्ञान शिकवले. सर्वसाधारणपणे तुम्ही पाहिले तर इस्त्राईली माणसे तंत्रज्ञान शिकवायला अजिबात इच्छुक नसतात. आणि फुकट तर काहीच द्यायला इच्छुक नसतात. मूळ ज्यू लोक आहेत. व्यापारी वृत्तीचे लोक आहेत. त्यामुळे त्यांना सर्व माल विकण्यामध्ये रस आहे. तंत्रज्ञान ते कोणाला सांगत नाहीत. पण हे सर्व नवीन पद्धतीचे तंत्रज्ञान आहे. ते तुम्ही आत्मसात करण्याची गरज आहे. जर आपण दोन फळांच्या रांगा





लावणार असू, तर सूर्यकिरण ज्या बाजूने येणार त्याच बाजूने फळ धरायची. मग पूर्व पश्चिम दिशेने झाडाचे अंतर लांब न्यायचे, दक्षिण-उत्तर दिशेने झाडे चिकटायला आली तरी हरकत नाही. झाडे बुटकी ठेवायची आहेत. बोर्डो मिश्रणाचा भरपूर वापर करायचा आहे. कलटारचा वापर करायचा आहे. संजीवके वापरायची आहेत वेगवेगळी. आज उसामध्येही संजीवकांचा वापर फार मोठ्या प्रमाणात सुरू झालेला आहे. आणि मग दुसऱ्या लाईनीतील दुसरे, चौथे झाड मशिनने आख्खच्या आख्खे उचलायचे आणि ते झाड दुसऱ्या ठिकाणी नेऊन लावायचे. म्हणजे जी मोकळी जागा झाली, त्यातून भरपूर सूर्यप्रकाश मिळेल आणि बाकीच्या तीन झाडांना विस्तारासाठी आणखी संधी मिळेल. झाडं प्रचंड छाटायची. नऊ- दहा वर्षांचे झाले की, पूर्ण बोडके करायचं. त्याला नवीन पालवी फुटणार आहे. आपण काहीच करत नाही. आपण बघतो की, डेरेदार वृक्ष आहे, प्रचंड मोठे झाड आहे. आपल्या पूर्वजांनी लावलेली झाडं आहेत. 50- 100 वर्षांची झाड आहेत. अरे, झाडांना खतं द्यायला लागतं. पाणी द्यायला लागतं. त्याच मॅनेजमेंट आहे. आमच्या लक्षात येत नाही.

नवीन तंत्रज्ञान आहे, ते डोळे उघडे ठेवून पहा. 10 वर्षांपूर्वी फिनलंडला लाल भोपळा निघाला होता, 760 किलोचा. मागच्या वर्षी जर्मनीत भोपळ्याचे प्रदर्शन भरले. हे तुम्ही गुगलवर गेले तर हे चित्र बघायला मिळतील. 760 किलोचे 5- 50 भोपळे होते, सगळ्यात मोठा भोपळा जो होता, तो 912 किलोचा होता. तुम्ही कल्पना करा की, जगामध्ये काय पातळीवर काम चालू आहे आणि आपण त्या तुलनेत कोठे आहोत. आज आमची उत्पादकता काय आहे आणि त्यांची उत्पादकता काय आहे. उद्याच्या शेतीमालाचे युद्ध आपण लढून सक्षमपणे जिंकायचे ज्यावेळी म्हणतो, त्यावेळी उत्पादकतेचे अंतिम टोक गाठले पाहिजे. त्याचवेळी आपल्याला उत्पादन खर्च हा अत्यंत खालच्या पातळीवर आणला पाहिजे.

आपल्याला वऱ्हायटींचे संशोधन नीट पद्धतीने करायला लागणार आहे. जे लावतोय ते कशासाठी लावणार आहे. आज मी केळी लावणार आहे. आज जर तुम्ही बघितले तर सगळी लोक ग्रीन हाऊसमध्ये फळबागा करायला लागले आहेत. नाशिकला मेरिविंकल नावाची एक कंपनी आहे. ती आता द्राक्ष आणि आंबा यांची लागवडच त्या ग्रीन हाउसमध्ये करत आहे. मी केळीच्या चर्चासत्राला कोस्टारिकामध्ये गेलो होतो. त्यावेळी पाहिले की, एका एका माणसाची 50-50 हजार एकर केळी आहे. आणि त्याच्याकडे काम करायला दोन नाहीतर तीन माणसे आहेत. दोन आणि तीन माणसांवर पन्नास हजार एकर केळी सांभाळली जात आहे. सगळी विमानातून औषधांची फवारणी होत आहे.

घोड्याच्या मानेवर केळीचा घड ठेवला जात आहे. शेतात रेल्वेच्या रुळासारख्या तारा बसवल्या आहेत. आणि त्यावरून घोडा केळी वाहून आणत आहे. म्हणजे नऊच फण्या ठेवायच्या. दहावी फणी काढून टाकायची. फक्त एकच फळ ठेवायचे. जेणेकरून तो दांडा कुजणार नाही. मोठी साईज येणार आहे. विना डागाचे उत्तम फळ येणार आहे. ही केळी जगात जायला लागली. आपल्या खंत वाटते की, जगाच्या 63 टक्के आंब्याचे उत्पादन आपण करतो, पण आपला वाटा एक टक्काही नाही. तीच गोष्ट केळीची आहे. जगाच्या 46 टक्के वाटा आपला आहे. पण, अजून एक केळही आपण आंतरराष्ट्रीय बाजारात विकू शकलो नाही. आमच्या नाकावर टिच्चून फिलीपाईन्स माल घेऊन चाललाय. सगळ्या सौदी अरेबिया



आणि अरबी देशांमध्ये विकत आहे.

आपण स्वतःचे फार भूषण मिरवत राहतो. मी इतकं केलं, मी तितकं केलं. दुर्दैव आहे की ते शेतकऱ्यांशी मनमोकळा संवाद करत नाही. खरं काही सांगत नाही. मध्यंतरी क्लीक टिप नावाचा ड्रीपर आला होता इस्त्राईलमधून. तो मोरे नावाच्या शेतकऱ्याने पिंपळगाव बसवंतला बसवला. फार चांगली द्राक्ष बाग उभी केली होती. मी त्यांना भेटायला गेलो. मी जैन इरिगेशनच्या कृषी तीर्थ या मासिकाचा संपादक आहे, गेली तीन वर्षे. शेती व पाणी यातील जगात लेटेस्ट टेक्नॉलॉजी काय आहे आणि काय तंत्रज्ञान उपलब्ध आहे, याची माहिती आम्ही लोकांना देतो आणि हे मासिक आम्ही गेली तीन वर्षे लोकांना फुकट वाटतो. जैन कंपनीतून. पण आता आम्ही त्याची वर्गणी ठरवत आहोत. 100 रुपये वर्षाला ठेवणार आहे. म्हणजे फार मोठी नाही. पण तुम्हाला लेटेस्ट टेक्नॉलॉजी मिळेल. पवारसाहेबांच्या राष्ट्रवादी मासिकाचा मी गेली 13 वर्षे संपादक आहे. मी जेव्हा लोकांना भेटायला जातो, त्यावेळी लोकं म्हणतात की, कशाला छापता आमची माहिती. काही छापूबिपू नका. ती लोकं इथं उरावर बसायला येतील. रोज माहिती सांगायला लागेल. आमच काम धंदा सोडायला लागेल आणि माहिती सांगायला कोणाला वेळ आहे. तुम्ही छापू नका. अशा पद्धतीची मानसिकता जर शेतकऱ्याची असेल, तर आपण केलेले सगळे संशोधन, प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचणार ? तुम्ही प्रत्येक जण वेगवेगळे प्रयोग करता. तुमच्या सगळ्यांचा मेंदू हा संशोधकाचाच मेंदू आहे. तुम्ही सगळे जण अत्यंत हुशार आहात. पण तुम्ही सगळे कूपमंडूक बनलेले आहात. तुम्हाला त्या डबक्यातच राहायचे आहे. तुम्हाला जगाच्या समुद्रात पोहायला जायचे नाही.

जगाच्या पातळीवर काम चाललेले आहे, ते बघण्याची गरज आहे. चैत्रपालवी त्यासाठी आहे. एक नवीन ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. त्या ज्ञानाच्या यज्ञामध्ये आपण काय काय घेऊ शकतो आणि दुसऱ्याला देऊ शकतो, ही माहिती जी ज्ञानाची, विज्ञानाची, संशोधनाची जी देवाणघेवाण आहे, त्या करण्याचे सामर्थ्य संवादातूनच प्राप्त होणार आहे. आणि तो संवाद जर तुम्ही करू शकला नाहीत, जर तुमचे इथले तीन दिवस आणि येण्याजाण्याचे दोन दिवस फुकट गेले, याच्यापेक्षा तुमच्या पदरात काही पडणार नाही. मी थोडं स्पष्ट बोलतोय. माफ करा. पण, जोपर्यंत आपण मनमोकळे होत नाही, आणि उघडं होऊन लोकांना सांगत नाही, आपल्या मनातील चर्चा. काही बिघडत नाही. सगळ्या विषयात सगळ्या लोकांना ज्ञान असेल, असे नाही. पण, आपल्याला ज्या विषयाची माहिती नाही. आपल्याला ज्या विषयाची शंका येते, त्याबद्दल आपण मनमोकळेपणाने बोलले पाहिजे. दुसरं कोण काय म्हणेल, आपल्या अज्ञानाच प्रगटीकरण होईल, होऊद्या. त्याने काही बिघडत नाही. ज्ञानाचा एक कण कण गोळा करावा लागतो. तेव्हा कुठे जेव्हा तिरडीवर जाऊ त्यावेळी आपल्याकडे दहा टक्के ज्ञान गोळा झालेले असते.

मी असं म्हणतो की, गेली 35 वर्षे झाले मी पाणी या विषयात काम करतो. पण मला 10 टक्केही ज्ञान अजून कळालेले नाही. माझे गुरू माधवराव चितळे हे गेली 50-60 वर्षे या विषयात काम करतात. तेही सांगतात की, मला आताशी कुठे एखादे अंग कळाले आहे. जो माणूस होता जगाचा मुख्य पाणी या विषयाचा, तो माणूस सांगतोय की, मला अजून 10 टक्केच ज्ञान कळाले आहे. मला 90 टक्के पाणी हा विषय कळालेला नाही. जर एवढी मोठी माणसं एवढी नम्र असतील, आणि त्यांची शिकण्याची तयारी असेल, तर आपलीही खूप तयारी असायला पाहिजे. त्या मानाने मूठभर घुगऱ्या रातभर मचमच अशी अवस्था आपली करून घेऊ नका. जिथे जिथे ज्ञानाचा कण मिळेल, तो गोळा करा. त्याच दृष्टीने या चैत्रपालवीकडे पहा.

# शेतीसाठी संघटित व्हा टेक्नालॉजी वापरा

## रोहित पवार यांचे उद्गार

टेक्नॉलॉजी बदलत चालली आहे. कुणाला चार एकर, कोणाला पाच एकर जमीन असेल. आता तुम्हीच सांगा, जर नवीन जमीन घेतली नाही, तर तुमची जमीन वाढणार आहे का. जसं आपलं जमिनीवर प्रेम असते, आदर असते, ती आपल्याला काही तरी उत्पन्न देत असते. जसं एखाद्या कारखान्यात मशिन असते, तसं बघितलं तर जमीन हे आपल्याला उत्पन्न देण्याचे स्त्रोत्र असत. त्यामुळे त्या जमिनीचा वापर कसा करतो, त्याला म्हणतात व्यवसाय. त्यामुळे त्या जमिनीत तुम्ही ऊस लावता असाल तर त्याच्या जोडीने एखादे पीक घेऊ शकता. ऊस लावायचा नसेल, जोड पीक घ्यायचे नसेल तर तुमच्याकडे दुधाचा धंदा असेल, तर दुधाच्या चांगल्या गायी ठेवू शकता. त्यासाठी घास वगैरे शेतात करू शकता. घासाची शेती करत असताना तुमच्यातील काही लोकं जिरायती भागातील असतील. तिथे पाणी कमी असेल. तिथे तुम्ही सायलेज करू शकता. मग उन्हाळ्यात जनावरांना सायलेजचा वापर चारा म्हणून करू शकता.

मी अण्णा बोराडे यांना आल्याआल्या विचारले की, कडवंची गावाची काय परिस्थिती आहे. मी त्यांच्या गावाला गेलो होते. तिथे हजारच्या आसपास शेतकरी आहेत. 20 वर्षांपूर्वी तिथल्या त्या शेतकऱ्यांच उत्पन्न एक कोटी, दोन





कोटी, पाच कोटी होते. आज त्या हजार शेतकऱ्यांचे उत्पन्न 60 ते 70 कोटीवर गेले आहे. म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला 60 ते 70 लाख रुपये आले. त्यांचा परिसर जालन्याचा आहे. पाण्याची परिस्थिती तिथे नाही. पण जो काही पाऊस होतो तो तिथे अडवतात. तिथे त्यांनी शेततळे केले आहे. जर आपल्याकडे शेततळे एक कोटीचे असेल तर शेती एक एकर करावी. मग ते शेतकरी एकत्र बसतात आणि मग त्यांची चर्चा होती. आता पाऊस चांगला झालाय. विहिरीला पाणी आहे. त्यामुळे कदाचित आपण शेती एक एकर नाही, तर दोन एकर करू शकतो. आणि मग शाश्वत उत्पन्नासाठी त्यांनी तेथे द्राक्ष मोठ्या प्रमाणात वाढवली आहेत. या सगळ्या पाण्याचे नियोजन तिथे होत असते. मग आज तिथे शेतकरी कुठे तरी करोडपती झाल्याचे आपल्याला दिसतात.

मी बोरीला सहज शेती बघण्यासाठी गेलो होतो. शेती बघितल्यानंतर सांगितले की, चला घरी जाऊ. नवीन घर बांधलय, असं ते मला शेतामध्ये सांगत होते. मला आनंद झाला की, नवीन घर आहे. फार छोटे घर आहे, असं त्यांनी मला सांगितले. काही हरकत नाही. तुम्ही कष्टातून बांधले आहे. त्या घरात गेलो. तिथे चार गाड्या उभ्या होत्या. मला वाटले पाहुणे आले असतील. मी विचारले, कोण आलंय. तर म्हणाले, माझीच आहे. एक मिसेसची आहे, असं त्यांनी सांगितले. काही हरकत नाही.



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

पण, घर असे होते की, मला अर्धा तास लागला घर पाहायला. एक शेतकरी नाही, तर बहुतेकांची तशी परिस्थिती आहे. आज बोरीच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न 100 कोटीपेक्षा जास्त आहे. शेतकऱ्याचा मुलगा शेतकरी बनत नाही, असं म्हणतात. पण, युवक जर कष्टाळू असेल तर तो शेतकरी बनतो. तुम्हाला तिथे गेल्यानंतर कळेल की, त्याने तिथे कोल्ड स्टोअरेज टाकले आहे. म्हणजे शेतकऱ्याची मुले व्यावसायिक झाली आहेत. म्हणजे त्या ठिकाणी असणाऱ्या शेतकऱ्याचा मुलगा शेतकऱ्याचा माल विकत घेतो आणि भारताच्या बाहेर तो माल आता शेतकऱ्याचा मुलगा पाठवायला लागला आहे. त्यामुळे जर आपण अभ्यास केला. तिथे लक्ष दिले. कष्ट केले, आणि जसं हे चैत्रपालवी आहे किंवा असे कार्यक्रम आहेत, तिथे गेल्यानंतर काय होते, तुम्ही कुटुंबाचा भाग होता. तुम्ही जसं इथं झालात. त्यामुळे संवादाशिवाय विकास होऊ शकत नाही. इथं आल्यानंतर तुमचा आणि तुमच्या परिसराचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

आज परिस्थिती अवघड आहे. आम्ही मराठवाड्यात गेलेलो, साताऱ्यात गेलेलो. बारामतीत आज फिरत असताना तेथील 20-22 गावांची परिस्थिती फार अवघड आहे. प्यायला पाणी आज नाही. अशी परिस्थिती फक्त बारामतीत आहे का तर नाही. ठराविक गाव असतील. पण एका व्यक्तीला जरी अडचण असेल, तर ती आमच्यासाठी फार महत्त्वाची अडचण आहे. दादांनी सांगून तिथे कालव्याने पाणी आणून पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी तरी आहे. आज तिथे छावण्या आहेत. शेतकरी खूष आहे. कशीही परिस्थिती असेल तर खूष कसे राहायचे, हे पहायचे असेल तर शेतकरी आहे. पण तरीसुद्धा त्यांना अडचणी आहेत. तिथे फिरत असताना ते अडचणी सांगत होते. त्या अडचणी आम्ही साहेबांपर्यंत पोचवू. साहेब त्या अडचणी मुख्यमंत्री साहेबांपर्यंत पोचवतील. तिथे एक अजित खैरे नावाचे शेतकरी आहेत. मी त्यांच्याकडे गेलो. तिथे गीर गायी आहे. थारपरकर गायी आहे. मी त्यांना म्हणालो की, तुम्ही गोठा भारी केलाय. एक एक गाय तुम्ही 50- 90 हजारांची घेतली. खरच तुम्हाला विचारू का, परवडते का ओ. तर ते म्हणाले, नाही परवडत. तर मी म्हणालो, बघा शेतकऱ्याचा पोरगा आहे आणि शेतकऱ्याला विचारतो, खरं सांगा परवडतय का नाय. तर म्हणाले, परवडतय. मी विचारले की, कसं दूध विकता, तर म्हणाले, आमचे दूध 80-90 रुपये लिटरला जाते. अशी परिस्थिती आहे. शेतकरी येतात आणि म्हणतात की, दूध परवडत नाही. हे खर आहे की, जो छोटा शेतकरी असतो, त्याला ते परवडत नाही. कारण, दोन- तीन गायी असतात. मग तिथे जी सोसायटी असते, ती जो भाव देतो, तो घ्यावा लागतो. पण तो शेतकरी आहे, त्याने काय केले की, पुण्यासारख्या ठिकाणी जिथे मित्र आहेत, तिथे तीन दुकाने चालू केलीत. त्या ठिकाणी तो सकाळी काढलेले दूध दुपारपर्यंत पुण्यात पाठवत असतो. तिथे दूध आणि तूप विकतो असतो. त्यामुळे तिथे संध्याकाळपर्यंत एक लिटरही दूध वाया जात नाही.



असेच एक शिंदे नावाचे व्यक्ती आहेत. त्यांच्याकडे 600 म्हशी आहेत. गेली 100 वर्षे ते दुधाचा व्यवसाय करतात.



त्यांनीही पुण्यात दुकान काढले. तिथं श्रीखंड आहे, तूप आहे, बरच काही काही आहे. आणि तिथं रोज संध्याकाळी गोड दूध विकत असतात. तिथं त्यांना रोज सहाशे लिटर दूध विकावे लागते. त्यांच्याकडे मोठी गाडी आहे, मोठं घर आहे. हे सगळे शेतकरी आहेत.

मी समजू शकतो की, शासनानेही मदत केली पाहिजे. शेततळं हवं तर त्याला मदत केली पाहिजे. त्यासाठी जे आपले लोकप्रतिनिधी असतात, पवारसाहेबांसारखी लोकं असतात, ते सत्तेत असले काय किंवा नसले काय, ते भांडत असतात. फक्त ते सत्तेत असले की, ताकद अधिकची वाढती. त्यामुळे नॅशनल हार्टिकल्चर जेव्हा त्यांच्या ताब्यात होते, ते जेव्हा तिथे मंत्री होते, सगळ्यात जास्त शेततळी तिथे देण्यात आली. ड्रीप देण्यात आलं. मी राजकीय बोलत नाही. पण, मला हे सांगायचे आहे की, आपणही टेक्नॉलॉजी आत्मसात केली पाहिजे. म्हशी असणारे लोकं मला भेटतात. ते मला सांगतात की, अहो म्हशीला फार सांभाळून वाढवावे लागतं. एखाद्या व्यक्तीची दूध काढायची





सवय लागली तर आयुष्यभर तोच व्यक्ती तिथे लागतो. मग मी तुम्हाला विचारतो की, म्हशीचे दूध आपण मशिनने काढू शकतो की नाही. तर लोकं म्हणतात की, अहो ते करता येत नाही. पण, आता जिथे हजार हजार म्हशींचे गोठे आहेत, तिथे लोकं परवडत नाहीत म्हणून मशिन घेतल्या गेल्या. त्यातून कुठं तरी तो व्यवसाय परवडू शकतो.

मी व्यवसायात आहे म्हणून सांगतो, उत्पन्न वाढविण्यासाठी दूध अधिकचा व्यवसाय करू शकता. पोल्ट्री करू शकता. मधमाशा ठेवल्यानंतर उत्पन्न 20- 25 टक्क्यांनी वाढतं. हा विचार युवकांनी केला पाहिजे. बारामतीत एक युवकानी मधमाश्यांच्या पेट्या घरी आणल्या. तर त्याच्या डोक्यात विचार आला की, अशा पेट्या मी करू शकतो का. मग त्या युवकांनी तो व्यवसाय सुरू केला. आज त्यांच्या 60-70 पेट्या झाल्या आहेत. त्यांच्या पेट्या राजस्थान व राज्याच्या बाहेरही जातात. त्यांचा व्यवसाय चांगला चालतो. त्यामुळे त्या शेतातून काय काय व्यवसाय करता येईल, याचा विचार तुम्ही करू शकता.

बीटाच्या बाबतीतही काय करता येईल, याचा प्रयत्न आम्ही सर्व करत आहोत. याही प्रयत्नाला कुठं तरी यश मिळेल, असं मला वाटतं. बांबूचा व्यवसाय आहे. मला सुरवातीला वाटायचे की, बांबू फार पाणी पितो. मी कोकणात गेलो. कोकणात पाऊस फार असतो, हे मी समजू शकतो. पण पाऊस जास्त अडवता येत नाही. कारण, तिथे डोंगराळ भाग खूप आहे. तिथे बंधारे बांधत येत नाही. तिथे आम्ही पवारसाहेबांसोबत गेलो. आल्या आल्या ते म्हणाले, पवारसाहेब तुम्ही बांबूला फळबागमध्ये घेतले, त्याचा आम्हाला फायदा झाला. आता आमचा दिवसाला 200 ट्रक बांबू बाहेर निघतोय. बांबूला सहा ते सात रुपये दर मिळतो. मी गडचिरोलीला गेलेलो विदर्भात. तिथे आदिवासी बांधवांशी चर्चा करत होते. तिथे जंगल हे राखलं जातं. जंगल राखल्यानंतर त्यातून जो बांबू निघतो, त्याच्यातून त्यांच्यावर अन्याय होत असे. त्यातून ते आदिवासी बांधव एकत्र आले. त्यातून त्यांनी ग्रुप तयार केला. त्यातून सगळे एकत्र बांबू आणतात. आणि एकत्र विकतात. तिथं ज्यांना 3 रुपये 4 रुपये मिळायचे, तिथे त्यांना आता सात रुपये, आठ रुपये मिळतात.

मला तुम्हाला हेच सांगायचे आहे की, तुम्ही जर एकटे विकायला आलात, तुम्हाला कुठे तरी दाबले जाईल. आंदोलन कसे केले जाते. उपोषण केले जाते किंवा आंदोलनाच्या काही वेगवेगळ्या पद्धती असतात. एक पाच जण हायवेवर आंदोलन करत असतील, तर चालेल का. तर मोठ्या संख्येने

पुढच्यावर दबाव आणता येतो. त्यामुळे तुम्हाला मोठी संख्या आणावी लागते. मी म्हणत नाही की, आंदोलने करा. आंदोलने करण्यासाठी बाकीच्या पार्टी आहेत. पण, ज्यावेळेस तुम्ही एकत्र याल, आणि तुम्ही ड्रीप मागायला जाल आणि मी जर ड्रीप विकत असेल तर मी विचारतो की, किती एकर ड्रीप करणार आहे. तर तुम्ही म्हणतात की, एक दोन एकर. तर मी म्हणतो की, पर एकर चाळीस हजार रुपये तुझा खर्च. पण जेव्हा तुम्ही सहाशे लोकं एकत्र येता आणि म्हणता की, आम्ही सहाशे एकरावर ड्रीप करणार आहे, त्यावेळी मी काय म्हणणार. बस रे चहा पी. अजून काय थंड बिंड पाहिजे का. गरम होतोय. तिथे तुम्हाला बसवले जाईल. तुमच्याशी चर्चा केली जाईल. मला जर एका झटक्यात सहाशे एकर मिळत असेल तर मग चाळीस काय 35 हजार, 32 हजारने मिळेल. मग तुम्ही काय औषधे घेणार का. पूर्वी पाटाने पाणी द्यायचे. आता ड्रीपने दिल्यामुळे खते, औषधे त्याद्वारे दिली जातात. त्यामुळे एकत्र आल्यामुळे फायदे आहेत. त्यामुळे तुम्ही संघटित होणे तितकेच फायद्याचे आहे. नाही तर काय होते, बांधावरून भांडणे होतात. अरे बांधावर तू काय लावणार आहे. समजा 100 एकर जमीन असेल, 200 एकर जमीन असेल आणि ती शहराजवळ असेल, आणि जर तुम्ही तिथे ग्रीन हाउस केले, तिथे भाजीपाला केला, टोमॅटो केला आणि काही केले, मात्र ते करत असताना ते विषमुक्त केले, तर तिथे मोठ्या कंपन्या असतात. त्यांनी सीएसआर दाखवावा लागतो. ते तुमच्याशी चर्चा करतील. रिलायन्स वगैरे रिटेलर आहेत, त्यांनाही सीएसआर दाखवावा लागतो. ते म्हणतील, तुझी दोनशे एकर शेती आहे. तिथून माल मला दे. दोन ते तीन रुपये जास्त देतो. अशा गोष्टी तुम्हाला एकत्र येऊन कराव्या लागतील. तर मला वाटते की, अशा गोष्टी जर केल्या नाहीत, तर आपल्या शेतकऱ्याला या अडचणी वाढत जातील. त्यासाठी आपण सर्व संघटित व्हा, एकत्र या. नवीन टेक्नॉलॉजी घेणे, हे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी हे सगळं करत असताना चैत्रपालवी सारख्या ज्या गोष्टी आहेत, तिथे जावा. नियोजन करा. ओळखी वाढवा. तिथे असे काही जे मंडळी येतात, त्यांच्याशी चर्चा करा. वक्त्यांशी ओळखी करा आणि ज्या काही तुम्हाला अडचणी आहेत, त्या बोला. म्हणून मी झब्बा पायजमा घालत नाही. कारण, मी युवक आहे, त्यांच्यासारखीच जीन्स घालतो. काही स्पीकर कोट घालून येतात. आपल्याकडे तर कोणी स्पीकर कोट घालून येत नाही. जर आला तर आपण घाबरतो की अरे जाऊ नका. पण, जर आपल्याला वाटत असेल तर प्रश्न विचारून बघा. काय अडचणी असतील तर बोलून बघा. जर वाटत असेल की मी केलेली गोष्ट कशाला चार लोकांना सांगायची. पण जर तुम्ही पश्चिम महाराष्ट्रातील असाल आणि ती जर मराठवाड्याच्या शेतकऱ्याला सांगितली तर, म्हणून शेतकरी कधीच शेतकऱ्याचा स्पर्धा होऊ शकत नाही. त्यामुळे





तुम्ही ज्या काही मनात गोष्टी केल्या असतील, त्या लोकांशी शेअर करायला सुरवात करा. त्यातून लोकांशी चर्चा करायला सुरवात करा. त्यातून तुमचा लोकांशी संपर्क वाढेल. त्यातून तुमचा फायदा होईल.

आपण कृषक अप सुरू केले आहे. त्याचाही फायदा घ्या. अजूनही टेक्नॉलॉजीचा काय काय फायदा घेता येईल, ते समजून घ्या. आता आपण मेच्या अखेरीस आहे. अवकाळी पाऊस झाला का. गेल्या तीन वर्षात तरी झाला का. त्यामुळे असं म्हणतात की, पाऊस कमी कमी होतोय. किंवा कधी कधी ढगफुटीसारखा होतो. कधी कधी रोडने चालत असतो आणि डाव्या बाजूला पाऊस असतो आणि उजव्या बाजूला पाऊस नसतो. आता याबाबत आपण काहीच करू शकत नाही. फक्त प्रार्थना करू शकतो की, आमच्या भागात पाऊस पडला पाहिजे. पावसावर आपले काही नियंत्रण नाही. मग अशावेळी पाऊस येईल का नाही येईल, हे केव्हीकेला विचारा. आयएमडीला विचारा. आता काही लोकं सांगतात की, आयएमडी जे सांगतय, त्याच्या उलट होतं. तरीही ते जे काही सांगतात, त्याच्या 70 टक्के खरं होतंय. मग त्याच्या ज्या काही चर्चा होतात. त्याच्यात जो काही आपला अधिकचा खर्च होतो, त्यात आपण काय करतो की, पाऊस येईल, असं वाटतं म्हणून लागवड करतो. पेरणी करतो.



त्याच्यात जी अडचण होईल, त्याबाबत अभ्यास करणे, तितकेच महत्त्वाचे आहे. हाच अभ्यास तुम्ही करा.

फळबागेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. हे करत असताना टेकनॉलॉजीशिवाय पर्याय नाही. भारताबाहेर गेल्यानंतर एक शेतकरी पाचशे- सहाशे एकर शेती करत असतो. इथला शेतकरी पन्नास- शंभर एकर शेती का करू शकत नाही. तिथं जर तुम्ही पाहिले, शंभर रोपे लावलेली असतील आणि त्यातील दहा रोपांवर जर रोग असेल, तर तिथे ड्रोन असतो. आपल्याकडे लग्नात असते फोटो काढायला. ते आलेकी आपण



नवरदेवाऐवजी त्याच्याकडे पाहतो. ते आता औषध देण्यासाठी असते. का तर ते फोटो घेऊन बरोबर जिथे गरज आहे, तिथेच ते औषध देते. असे जग चाललेले आहे. आज गवत काढण्यासाठीही तिथे रोबोट तयार केले आहेत. भारतामध्ये मजुरी कमी असते. पण, भारताबाहेर मजुरी जास्त आहे. त्यामुळे तिथे टेक्नॉलॉजीकडे लोक जास्तीत जास्त चालली आहेत. पण त्यासाठी तुम्हीही समजून घेतले पाहिजे की, भारताबाहेर काय चालले आहे. तर आपल्याकडून बाहेर द्राक्ष पाठवली जातात आणि तिथे गेल्यानंतर कळते की, अरे त्याच्यात कोणते तरी औषध राहिले आहे. भारताबाहेर तर बीट असेल किंवा ऊस, यावर कोणते औषधे मारले जाते, याचा अभ्यास केला जातो. तिथे जर त्या गोष्टी चालत असतील, तर इथेही त्या चालतील. एक एक फॅड असत. कदाचित तुमच्यातील कोणी तरी ऑरगॅनिक फार्मिंगवर काम केलेले असेल. पण, भारताच्या बाहेर ऑरगॅनिक फार्मिंगला खूप वाव आहे. जर तांदळाचा रेट 35 रुपये असेल आणि जर तो ऑरगॅनिक असेल तर त्याचा रेट 90-100 रुपयांपर्यंत असतो. भारतात या महागड्या गोष्टी घेणारे फक्त दोन टक्के लोक आहेत. 98 टक्के लोकं हे घेऊ शकत नाही. त्यामुळे तुम्ही ऑरगॅनिक फार्मिंग करा. विशिष्ट लोकांसाठी करा. पण, या पुढे आपल्याला विषमुक्त फार्मिंग कशी करता येईल, याच्यासाठी लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि याच्यात आपला खर्चही कमी होईल. आणि घेणाऱ्यालासुद्धा ते परवडेल आणि जेव्हा घेणाऱ्यालाही परवडेल तिथं नक्कीच आपला विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

चर्चा करा. चर्चा केल्याशिवाय आपले विषय संपणार नाही. शासनाचे जे काही प्रश्न असतील ते साहेब व आम्ही असूच. ते राजकीय विषय असतील. पण, सामाजिक विषय म्हणून जेव्हा केव्हा तुम्हाला यायचे असेल तेव्हा या संस्थेचे दरवाजे चेअरमनचा मुलगा म्हणून आणि पवारसाहेबांचा नातू म्हणून, मी इथं ट्रस्टी बिस्टी नाहीये. मी तुमच्यासारखा कार्यकर्ता म्हणून इथं येत असतो. मी पवारसाहेबांच्या वतीने, चेअरमन माझ्या वडिलांच्या वतीने, ट्रस्टी माझ्या आईच्या वतीने, सर्व ट्रस्टीच्या वतीने, तसेच इथं कष्ट करणारे सय्यद सर असतील, भोईटे सर असतील, या सर्वांच्या वतीने सांगतो की, ही जी संस्था आहे, ती तुमचीच आहे, असं तुम्ही समजा. याचे दरवाजे तुमच्यासाठी कायम उघडे राहतील. येणारा काळ अडचणीचा असला तरी, आपण त्यामध्ये एकत्र राहिलो तर त्या काळावर आपण नक्कीच मात करू, अशी इच्छा व्यक्त करतो. तसेच, येणारा काळ चांगल्या पावसाचा असेल, अशी इच्छा व्यक्त करतो.



# मोदींचे मंत्रिमंडळ २०१९



# गुणवत्तेचा अभाव

तथागत

भाजपचे उपाध्यक्ष विनय सहस्रबुध्दे यांनी मोदी यांच्या पूर्वीच्या मंत्रिमंडळांवर चुकून आणि खासगीत केलेली एक टिप्पणी वादग्रस्त ठरली होती. त्यांनी ती मागे घेतली होती. परंतु एकदा बाण सुटल्यानंतर तो मागे घेता येत नाही. त्यांनी टिप्पणी केली होती की भाजपकडे 'टॅलेंटची कमतरता' आहे. टॅलेंट म्हणजे गुणवत्ता ! मंत्रीपदासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता नसल्यामुळे भाजपला मंत्रीपदासाठी उचित व्यक्ती निवडताना अक्षरशः जंगजंग पछाडावे लागते. त्याचे प्रत्यंतर मोदींच्या 'मंत्रिमंडळ-2019'च्या निमित्ताने पुन्हा आले.

2014मध्ये प्रथमच पंतप्रधान झालेल्या नरेंद्र मोदी यांचे पहिले मंत्रिमंडळ आठवा. त्या मंत्रिमंडळात मनुष्यबळविकास मंत्रालय सुप्रसिध्द टीव्ही तारका स्मृति इराणी यांच्याकडे देण्यात आले होते. त्यांच्या नेमणुकीवर अनेकांच्या भृकुटी वक्र झालेल्या होत्या. त्यांना मंत्रीपद देण्याबाबत कुणाचीच हरकत असण्याचे कारण नाही. मंत्री कुणाला करायचे हा पंतप्रधानांचा विशेषाधिकार असतो. पण इतके महत्वाचे खाते अशा अननुभवी व्यक्तीकडे ? हा प्रश्न सर्वत्र चर्चिला गेला. त्यानंतर या मंत्रीमहोदया वादग्रस्त ठरल्या. कारण त्यांनी अणुशास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांच्याबरोबरच अनुचित आचरण केले. अर्थात हा एक प्रसंग झाला. असे अनेक प्रसंग साठत गेले आणि अखेरीला त्यांची या खात्यातून बदली करण्यात आली.

मोदींच्या 2019च्या मंत्रिमंडळात मुष्यबळ विकास मंत्रालय रमेशचंद्र पोखरियाल उर्फ निशंक यांच्याकडे देण्यात आले आहे. निशंक हे नाव त्यांनी धारण केलेले आहे. त्यांनी 44 पुस्तके लिहिली आहेत. त्यात ज्योतिषशास्त्रापासून कविता व अन्य साहित्यिक पुस्तकांचा समावेश आहे. 2009 ते 2011 या काळात ते उत्तराखंडचे मुख्यमंत्री होते. उत्तराखंडमधील एका वीजप्रकल्पाच्या कंत्राटाच्या प्रकरणी त्यांच्याविरुध्द आर्थिक

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

गैरव्यवहाराचे आरोप होते. त्याच सुमारास कर्नाटकात येद्युरप्पा यांनाही आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे राजीनामा द्यावा लागला होता. त्याचाच आधार घेऊन भाजप हायकमांडने निशंक यांना राजीनामा देण्यास सांगितले होते.

निशंक यांची आणखी एक ओळख आहे. बहुधा त्यामुळेच त्यांना मनुष्यबळविकास मंत्रालय देण्यात आले असावे. त्यांनी गेल्या लोकसभेत भाषण करताना भारताच्या प्राचीन इतिहासाबद्दल मोठे गौरवपर उल्लेख केले होते. ज्योतिष व खगोलशास्त्र हे विज्ञानाचे जनक असलेले शास्त्र आहे. भारतात प्राचीन काळात कणाद ऋषींनी अणुविज्ञान विषद केले होते व त्यांच्या त्या माहितीच्या आधारे प्राचीन भारतात अणुस्फोट करण्यात आले होते. गणपतीचा दाखला देताना त्यांनी पंतप्रधानांप्रमाणेच मनुष्याच्या शरीराला हत्तीचे डोके चिकटविणे ही प्लॅस्टिक सर्जरीची किमया होती असेही सांगितले होते. त्यांच्या या भाषणाने काहीशा अस्वस्थ झालेल्या व थोडेफार आधुनिक विचार ठेवणाऱ्या अरुण जेटली यांनी निशंक यांना असे तथ्यहीन किंवा पुरावे नसलेले दाखले देत जाऊ नका असे सुचविले. परंतु निशंक कसले ऐकतात? त्यांनी जेटलींनाच सुनावले की त्यांच्याकडे काही जुन्या पोथ्या आहेत आणि त्यात या गोष्टींचे उल्लेख व दाखले आहेत. त्या पोथ्या किंवा ती पुस्तके पाठविण्याची तयारीही त्यांनी जेटलींना दाखवली. पण जेटलींनी त्यांना हात जोडले आणि धन्यवाद म्हणून संभाषण संपवले.

निशंक यांचे व्यक्तिमत्वही विलक्षण आहे. अत्यंत शांत व लाडिक आवाजात ते बोलतात. साधारणपणे श्रीश्री रविशंकर यांच्या सारखे ते बोलतात. आता अशा विद्वान व्यक्तीकडे मनुष्यबळविकास मंत्रालय देण्यात आले आहे. त्यामुळे मोदी हे आधुनिक विचाराचे आहेत आणि ते आधुनिक व जगातील वर्तमानाशी सुसंगत शिक्षणप्रणाली भारतात आणू पाहतात की निशंक दाखले देत असलेल्या प्राचीन भारतीय गौरवशाली परंपरेकडे त्यांना भारतातील विद्यार्थ्यांना न्यायचे आहे हे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शितावरुन भाताची परीक्षा होते म्हणतात. पण तरीदेखील इतर शितांचीही परीक्षा करुन पाहण्यास हरकत नाही.

अर्थमंत्री असलेले अरुण जेटली आणि परराष्ट्रमंत्री असलेल्या सुषमा स्वराज यांनी प्रकृतीच्या कारणास्तव मंत्रिमंडळात सहभागी होण्याचे नाकारल्याने नव्या मंत्रिमंडळात प्रमुख अशा खात्यांमध्ये फेरबदल अत्यावश्यक ठरणार होते. त्यानुसारच अर्थ, संरक्षण, गृह आणि परराष्ट्र या खात्यांमध्ये बदल करण्यात आले. 'रायसीना खाती' म्हणून त्यांना ओळखले जाते कारण या खात्यांची मुख्य कार्यालये रायसीना टेकडीवर राष्ट्रपति भवन व पंतप्रधान कार्यालयाच्या रांगेत आहेत. मंत्रिमंडळातील सर्वात महत्वाची खाती म्हणून ती ओळखली जातात. तर या खात्यांमध्ये पूर्ण फेरबदल झालेले आढळतात. पंतप्रधानांच्या खालोखाल महत्वाचे मानले जाणारे क्रमांक दोनचे खाते असलेल्या गृहखात्यातून राजनाथसिंग यांची बदली संरक्षण खात्यात करण्यात आली आहे. आता अमितभाई शहा देशाचे नवे गृहमंत्री असतील. अर्थमंत्रालयाची जबाबदारी निर्मला सीतारामन यांना देण्यात आली आहे. परराष्ट्रमंत्रीपदासाठी माजी परराष्ट्रसचिव एस.जयशंकर यांची निवड करण्यात आली आहे.



ही एक अनपेक्षित निवड मानली जाते. खरेतर अर्थखात्यासाठी अशाच एखाद्या त्या क्षेत्रातील तज्ञाची (टेक्नोक्रॅट) निवड केली जाईल असे मानले जात होते. प्रत्यक्षात परराष्ट्रमंत्रालयासाठी ती कल्पना अमलात आणण्यात आली. जयशंकर हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे जनक, सुरक्षाविषयक तज्ञ के. सुब्रह्मण्यम यांचे ते चिरंजीव आहेत. चीन व अमेरिकेसारख्या देशात त्यांनी महत्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. भारत-अमेरिका नागरी अण्विक ऊर्जाविषयक करारातही त्यांची भूमिका महत्वपूर्ण

होती. अमेरिकेत असताना त्यांनी मोदींच्या प्रतिमानिर्मितीसाठी बरेच प्रयत्न केले होते. त्याच बरोबर चीनमधील नेतृत्वाबरोबर मोदी यांची तार जुळविण्यातही त्यांचा वाटा मोठा होता. चीनबरोबरचे काही गुंतागुंतीचे प्रश्नही त्यांनी त्यांच्या मुत्सद्देगिरीने सोडविले होते. मूलतः ते अमेरिकन लॉबीचे मानले जातात अशी एक समजूत आहे. त्यामुळेच त्यांची निवड जशी सूचक आहे त्याचप्रमाणे यापुढील काळात भारत अधिकाधिक अमेरिकेकडे झुकण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. खुद्द मोदी यांना अमेरिकेचे विशेष आकर्षण असल्याचाही एक समज आहे. थोडक्यात नव्या परराष्ट्रमंत्र्यांच्या कारकिर्दीत भारत-अमेरिका संबंधांना नवी झळाळी येणे अपेक्षित आहे. अर्थात अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप यांचे काहीसे अनिश्चित व बेभरवशाचे नेतृत्व असल्याने

महत्वाचे अशासाठी आहे की मंत्रिमंडळातही राजशिष्टाचारानुसार गृहमंत्र्याचे स्थान दुसऱ्या क्रमांकाचे मानले जाते व पंतप्रधानांच्या गैरहजेरीत आणीबाणी उद्‌भवल्यास सर्वसाधारणपणे गृहमंत्रीच कॅबिनेटच्या बैठकांची अध्यक्षता करतात. याचा अर्थ मोदी परदेशदौऱ्यावर गेल्यानंतर अमित शहाच देशाचे सर्वेसर्वा राहतील. याचा अर्थ केंद्रीय मंत्रिमंडळात दोन सत्ताकेंद्रे तयार होणार काय असा एक प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतो. ही बाब कालांतराने लक्षात येईलच. परंतु अमित शहा यांना मंत्रिमंडळात घेतल्याने काही समीकरणे बदलणे अपेक्षित आहे व त्याचा पहिला पुरावा म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोभाल यांना कॅबिनेट दर्जा देण्यात आला आहे. 2014 ते 2019 पर्यंत गेल्या पाच वर्षात म्हणजे 'मोदी-पर्व-1' मध्ये मोदी आणि दोभाल हेच राष्ट्रीय



जयशंकर यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. भारताला अमेरिकन मालाच्या आयातीवर मिळणाऱ्या सवलती ट्रंप यांनी नुकत्याच रद्द करुन मोदी सरकारला एक शुभारंभाची भेटच दिली आहे. जयशंकर यांना सूत्रे हाती घेतल्याघेतल्याच या परीक्षेला तोंड द्यावे लागणार आहे.

पक्षाध्यक्ष अमित शहा यांचा मंत्रिमंडळातील समावेश अपेक्षिला जात होता. परंतु ते पक्षाध्यक्षपद सोडतील किंवा नाही याबाबत प्रश्नचिन्ह होते. त्याचबरोबर ते मंत्री असोत किंवा नसोत, त्यांचे पक्ष व सरकारमधील दुसऱ्या क्रमांकाचे स्थान हे निर्विवादपणे प्रस्थापित झाले आहे. त्यामुळे त्यांना मंत्रीपदाची आवश्यकता भासणार नाही अशी एक अटकळ होती. परंतु त्यांनी मंत्रीपद व तेही गृहमंत्रीपद घेतले ही बाब महत्वाची आहे. हे

सुरक्षा, अंतर्गत सुरक्षा आणि परराष्ट्रसंबंधांबाबतचे निर्णय करीत असत. किंबहुना जयशंकर यांची परराष्ट्रसचिवपदाची कारकिर्द संपल्यानंतर त्यांना राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराचे पद देण्याबाबतही विचार सुरु झाला होता.

परंतु त्यामुळे दोभाल यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असता. विशेष म्हणजे, कोणत्याही कारणाने का असेना, हा विचार प्रत्यक्षात येऊ शकला नाही हे महत्वाचे. कारण राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराचे पद निर्माण झाल्यापासून हे पद मुख्यतः परराष्ट्र सेवेतील उच्चपदःस्थांनीच भूषविलेले आढळते. अपवाद एम.के.नारायणन व आता दोभाल यांचा! हे दोघेही पोलिस सेवेतील आहेत. या घडामोडींमुळे जयशंकर यांनी टाटा उद्योगसमूहात जबाबदारी स्वीकारुन तेथे काम करु लागले होते.

परंतु सुषमा स्वराज यांच्या बहिर्गमनानंतर तज्ज्ञ अशा परराष्ट्रमंत्र्यांची गरज भासू लागली होती. मोदींना जयशंकर यांची आठवण झाली व ते परराष्ट्रमंत्री झाले.

हे विषयांतर असले तरी त्याचे परस्परनिगडित मुद्दे आहेत. 'मोदी-पर्व-1'मध्ये राजनाथसिंग हे गृहमंत्री होते परंतु गृहमंत्रालयात सत्ता व अधिकार दोभाल यांचा चालत असे. आता अमित शहा गृहमंत्री झाल्यानंतर त्यात गुणात्मक फरक पडणार आहे. आता गृहमंत्रालयात 'दोभाल-तंत्र' एकतर्फी चालणे अशक्य आहे. एकीकडे जयशंकर कॅबिनेटमंत्री, दुसरीकडे अमित शहा गृहमंत्री यात दोभाल यांचे अधिकारक्षेत्र मर्यादित होऊ लागल्याचे लक्षात आल्यानेच बहुधा त्यांनाही कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देण्याचे ठरविण्यात आले असावे. आता किमान दर्ज्यानुसार

लक्ष राहणार आहे. पूर्वीच्या काळात म्हणजेच काँग्रेसच्या काळात विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण करण्यासाठी गृह मंत्रालयाचा वापर केला जात असे. आता त्याची पुनरावृत्ती होणार काय यावर लक्ष ठेवावे लागणार आहे. पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे सरकार भाजपच्या डोळ्यात खुपत आहे. तेथे अमित शहा काय करतात हे पाहणे उत्कंठेचे राहणार आहे.

निर्मला सीतारामन यांची अर्थमंत्रीपदी निवड करण्यामागे अरुण जेटली यांचा हात असल्याचे मानले जाते. किंबहुना निर्मला सीतारामन यांना पुढे ठेवून अरुण जेटलीच अर्थमंत्रालय चालवतील असे मानले जाते. केवळ निर्मला सीतारामनच नव्हे तर त्यांचे अर्थ राज्यमंत्री म्हणून अनुराग ठाकूर यांची निवड



तरी अमित शहा, जयशंकर व दोभाल हे समकक्ष झाले आहेत आणि त्या नात्याने दोभाल यांच्याकडे फार दुर्लक्ष होणार नाही याची खबरदारी मोदी यांनी घेतली असावी. परंतु सत्ताकेंद्रातील व तेही अत्यंत महत्वाच्या अशा खाते व विभागांच्या पातळीवरील ही स्पर्धा व चढाओढ तसेच कुरघोडीच्या कारवायांना यामुळे जोर आल्यास कुणाला आश्चर्य वाटायला नको. मोदी यांनी एक नाजुक त्रिकोण तर तयार केला आहे परंतु या त्रिकोणाचा समतोल राखणे हे काम जिकिरीचे राहणार आहे.

गृहमंत्री या नात्याने अमित शहा यांना देशांतर्गत कायदा व सुव्यवस्थेच्या जबाबदारीबरोबरच केंद्र व राज्यांच्या संबंधांमधील समतोल राखण्याचे कामही करावे लागणार आहे. हे काम ते किती निःपक्षपातीपणे आणि पोक्त व तटस्थपणे करतात याकडे सर्वांचे

करण्यामागेही जेटलीच असल्याचे सांगितले जाते. अनुराग ठाकूर हे हिमाचल प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री प्रेमकुमार धूमल यांचे चिरंजीव व क्रिकेटमध्ये त्यांची विशेष रुचि आहे. ते क्रिकेट खेळतही असत आणि क्रिकेट संघटनांशी ते संबंधित आहेत. जेटली यांचे प्रतिनिधी म्हणूनच ते क्रिकेट जगतातही ओळखले जातात. त्यामुळे त्यांना राज्यमंत्री करुन जेटली यांनी या खात्यावरील आपली पकड कायम राखल्याचीच चर्चा आहे. 'मोदी-पर्व-1' मध्ये अनुराग ठाकूर यांना मंत्री करण्यासाठी हिमाचल प्रदेशातील काही भाजपनेत्यांनी मोदी यांच्याकडे रुजवात करण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा मोदी यांनी 'घराणेशाही'चे तसेच त्यांच्याविरुद्ध असलेल्या काही आरोपांचे कारण पुढे करुन त्यांना मंत्री करण्याचे स्पष्ट नाकारले

होते. आता 'मोदी-पर्व-2' मध्ये बहुधा निकष बदलले असावेत असे म्हणावे लागेल. अर्थमंत्रीपदासाठी पियुष गोयल यांचे नाव आघाडीवर होते. परंतु अलीकडच्या काळात त्यांची व अमित शहांची जवळीक फारच वाढलेली होती. जेटली यांना बहुधा ती खपलेली नसावी. त्याचप्रमाणे गोयल यांच्याबाबतही काही मतमतांतरे आहेत आणि मोदी यांना त्याची माहिती असल्याने बहुधा पियुष गोयल यांची ही बस चुकली असे मानण्यास जागा आहे. अन्यथा जेटली यांच्या अनुपस्थितीत दोनवेळेस त्यांनी ही जबाबदारी सांभाळली होती आणि हंगामी अर्थसंकल्प देखील त्यांनीच सादर केलेला होता. प्रत्यक्षात मात्र त्यांना या पदापासून शपथविधि झाला आहे. या शपथविधीसाठी भाजपने काही निकष ठरविले होते. त्यानुसार भाजपच्या मित्रपक्षांना केवळ एकच कॅबिनेट मंत्रीपद देण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार अकाली दलाच्या हरसिम्रत कौर बादल, लोकजनशक्ति पक्षाचे रामविलास पास्वान, शिवसेनेतर्फे अरविंद सावंत यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात आले. या तिघांकडे त्यांची पूर्वीचीच खाती कायम राखण्यात आली. नीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलासही एक कॅबिनेट मंत्रीपद देऊ करण्यात आले होते. परंतु त्यांनी 'प्रतीकात्मक स्थान' देण्याचा हा भाजपचा निर्णय नापसंत असल्याचे सांगून मंत्रिमंडळात सामील होण्याचे नाकारले.




डावलण्यात आले हे यानिमित्ताने स्पष्ट झाले. मात्र त्यांच्याकडे रेल्वे व बरोबरीने वाणिज्य व उद्योग खातेही देण्यात आले आहे व ही जबाबदारी देखील मोठी आहे. नितिन गडकरी हे सक्रिय मंत्री होते आणि त्यांनी पूर्वीचेच परिवहन, रस्ते व महामार्गाचे खाते स्वतःकडे राखले. यापूर्वी त्यांना जलमार्ग व नदीविकास, जलसंपत्तीचे खातेही देण्यात आले होते. त्यात बदल करुन त्यांना अतिलघु, लघु व मध्यम उद्योगांचे खाते देण्यात आले आहे. अर्थव्यवस्थेला गति देणे आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने हे खाते सर्वात महत्वाचे मानले जाते व त्यामुळेच गडकरी यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे.

मंत्रिमंडळ रचना करताना पश्चिम बंगालला झुकते माप मिळेल असे मानले जात होते. प्रत्यक्षात तसे घडले नाही. केवळ दोन राज्यमंत्र्यांवर बोळवण करण्यात आली. परंतु मंत्रिमंडळाच्या या पहिल्या टप्प्यात फक्त 58 (पंतप्रधानांसह)जणांचाच एकप्रकारे सुरुवातीलाच हे नाराजीचे गालबोट लागले असे म्हणावे लागेल. 2014 मध्ये भाजपला स्वबळावर बहुमत मिळाले होते व त्यावेळी भाजपला 282 जागा मिळाल्या होत्या. आता 2019 मध्ये भाजपला 302 जागा मिळाल्या असल्याने त्यांना तशीही मित्रपक्षांची आवश्यकता नाही. त्यामुळेच त्यांनी मंत्रीपदाचे काही तुकडे या मित्रपक्षांपुढे फेकण्याचे ठरविले. त्यातही पक्षाने पक्षपात अन्यायाचे धोरण कायम ठेवले. अकाली दलाला या निवडणुकीत फक्त दोनच जागा जिंकता आल्या परंतु या पक्षाच्या हरसिम्रत कौर यांना मात्र अन्नप्रक्रिया(फूड प्रोसेसिंग) सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. रामविलास पास्वान यांच्या जागा सहा आहेत परंतु त्यांनाही अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली. शिवसेनेचे संख्याबळ 18 असूनही त्यांना अत्यंत नगण्य, महत्व नसलेले अवजड व सार्वजनिक उद्योग खाते देण्यात आले. त्यात काहीच काम नसते. जे उरलेसुरले सरकारी उद्योग आहेत

ते बंद करुन विकायला कसे काढायचे एवढेच या मंत्रालयाचे काम आहे. परंत दात काढलेल्या वाघाला हे खाते स्वीकारताना कोणताच कमीपणा वाटला नाही. नीतीशकुमार यांनी मात्र किमान मंत्रिमंडळात सामील होण्यास नकार देऊन किंचितसा स्वाभिमान दाखवला. एवढेच नव्हे तर लगोलग बिहारमध्ये राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करुन आठ मंत्र्यांना सामील करुन घेताना भाजपच्या एकाही मंत्र्याचा समावेश केला नाही.



मोदींनी आपल्या दुसऱ्या इनिंगमधले मंत्रिमंडळ स्थापन केले व राज्यकारभार सुरु केला. या मंत्रिमंडळात जयशंकर सोडल्यास चटकन नजरेसमोर येईल असा कोणताही चेहरा नाही. राहूल गांधी यांना अमेठीत हरविल्यानंतर स्मृति इराणी यांना कोणतेतरी बडे खाते मिळेल असे मानले जात होते. परंतु त्यांच्याकडे पूर्वीचेच वस्त्रोद्योग खाते कायम ठेवण्यारोबरच महिला व बालकल्याण विभागाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली. राज्यघटनेच्या सुधारित कलम 91 खालील कायद्याप्रमाणे केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या संख्येवर मर्यादा घालण्यात आली आहे. त्यानुसार लोकसभेच्या एकंदर संख्याबळानुसार म्हणजेच 545च्या 15 टक्के इतके मंत्री नेमता येतात. म्हणजेच केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या 80 राखता येऊ शकते. मनमोहनसिंग यांच्या मंत्र्यांची संख्या 78 होती. म्हणजेच 58 मंत्र्यांच्या शपथविधीनंतर अजुनही 22 मंत्री नेमणे शक्य आहे. काही काळाने ते शक्य होईल. त्यामुळे ज्यांना मंत्रीपदाची आस – आशा आहे त्यांना अद्याप वाव आहे.

मोदींनी आपल्या दुसऱ्या 'इनिंग'मधील मंत्रिमंडळातून पूर्वीच्या अनेक सहकाऱ्यांना वगळलेले आहे. त्यातील काही प्रमुख मंत्र्यांचा उल्लेख करायचा झाल्यास मनेका गांधी, राधामोहनसिंग, सुरेश प्रभु, महेश शर्मा, वीरेंद्रसिंग यांचा उल्लेख करावा लागेल. हे कॅबिनेट मंत्री होते. अरुण जेटली व सुषमा स्वराज या दोघांनीही प्रकृतीच्या कारणास्तव मंत्रिमंडळात सामील होण्याचे नाकारले. परंतु प्रभु, मनेका आणि राधामोहन यांना वगळण्यामागे त्यांच्या कामगिरीबद्दलचे असमाधान हेच कारण आहे. राज्यवर्धन राठोड यांनाही वगळण्यात आले. त्यांचीही कामगिरी असमाधानकारक होती आणि त्यांच्या एकंदरच आचरणाबद्दल तक्रारी होत्या. अनंतकुमार हेगडे या अत्यंत वादग्रस्त नेत्याला वगळण्यात आले. कर्नाटकातील या सद्‌गृहस्थांनी निवडणूक प्रचारातच नथुराम गोडसेचे समर्थन केले होते. मनेका गांधी यांनी मुस्लिमांना मते देण्याचे आवाहन करताना मते न दिल्यास त्यांची कामे त्या करणार नाहीत असा दमही दिला होता. जयंत सिन्हा हे भाजपचे बंडखोर नेते यशवंत सिन्हा यांचे पुत्र. त्यांनी एका मुस्लिमांना मारणाऱ्या काही गोरक्षकांचा हार घालून सत्कार केला होता. परंतु चौधरी वीरेंद्रसिंग(हरयाणा) आणि सांस्कृतिक मंत्री महेश शर्मा(उत्तर प्रदेश) यांना वगळण्याचे कारणही गूढ आहे. बहुधा वीरेंद्रसिंग यांच्या हरयाणाच्या राजकारणातल्या कारवाया भाजपला नापसंत पडल्या असाव्यात. बिहारमधून लालूप्रसाद यांच्या कन्या मिसा भारती यांना पराभूत केल्यानंतर देखील रामकृपाल यादव यांना मंत्रीपदाला मुकावे लागले. विजय गोयल यांनी मोदींचा अतोनात प्रचार दिल्लीत केला, मेट्रोमध्ये हिंडून तरुणांशी संपर्क साधून त्यांनी मोदींचा प्रचार केला पण एवढे करुनही त्यांना मंत्रीपद मिळाले नाही.

मोदींच्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर त्याचे सर्वसाधारण स्वागत झाले. परंतु फारच कमी ठिकाणी त्याची प्रशंसा झाली. हे एक खटकणारी बाब आहे ! मोदींना त्यांच्या राज्यकारभारासाठी गुणवत्तेचा शोध घ्यावाच लागेल. अन्यथा गेल्या वेळेप्रमाणेच त्यांच्या राज्यकारभाराची सूत्रे केवळ त्यांच्याच हाती केंद्रित राहतील.



‘मोदी-पर्व-2’ सुरु झाले आहे. सरकार स्थापन झाले आहे. अरुण जेटली यांच्या जागेवर निर्मला सीतारामन यांच्याकडे अर्थमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. नव्या सरकारचा अर्थसंकल्प 5 जुलै रोजी सादर करण्यात येणार आहे. गेल्या पाच वर्षातील म्हणजे ‘मोदी-पर्व-1’मधील अर्थव्यवस्थेच्या आघाडीवरील सरकारी कामगिरी किती चांगली राहिली आहे याची वर्णने सर्वत्र येऊ लागली आहेत. सरकारने दडविलेली आकडेवारी आता उघडकीस येऊ



# आर्थिक आव्हानांची कसोटी

गहिनीनाथ



लागली आहे. त्यातून बेकारीचा उच्चांक, खालावलेला विकास दर, शेतीक्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष, अर्थव्यवस्थेला चालना देण्याऐवजी लोकांवर खैरात करुन त्यांची मते मिळविण्याचा सवंग व हलका प्रकार, यातून वाढत चाललेली वित्तीय तूट या सर्वच बाबी चिंता ओलांडून आता संकटाच्या पातळीवर जाऊन पोहोचल्या आहेत. या सरकारला या गोष्टी अडचणीच्या ठरत असल्यानेच भाजपच्या सूत्रधारांनी विकास व प्रगतीबाबत मारलेल्या फुशारक्या बासनात गुंडाळून ठेवल्या आणि त्याऐवजी लोकांना भावनिक वाटणाऱ्या हिंदुत्व,

राष्ट्रवाद, जवानांचे बलिदान, त्याच्या प्रत्युत्तरादाखल केलेली कारवाई व दाखविलेले धाडस या मुद्यांवर मोठ्या हुशारीने निवडणुका लढल्या आणि भरघोस मते पदरात पाडून घेतली. मात्र आता आर्थिक आव्हानांना तोंड देतादेता या सरकारचा कस लागणार आहे. यात सवंग पावले उचलण्याचा प्रयत्न झाल्यास अर्थव्यवस्थेचे अपरिमित नुकसान होणार आहे.

लोकसभेच्या निवडणुका संपल्या. नवे सरकारही स्थापन झाले. राजकारणाची लगबग, गजबज आता संपावी. राज्यकारभारावर लक्ष केंद्रित करण्याची वेळ आली आहे. याची काही कारणे आहेत. देशाचे अर्थकारण कोणत्या धोक्याच्या वळणावर येऊन ठेपले आहे याकडे बहुधा कुणाचेच लक्ष नसल्याची अवस्था आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला आलेल्या मंदगतीकडे अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या मार्च महिन्यात जारी अहवालात प्रकाश टाकण्यात आला आहे. महागाई किंवा चलनवाढीचा दर ऐतिहासिकरीत्या कमी झाल्याचा दावा करणाऱ्या सरकारला हे कळेनासे झाले आहे की बाजारात मागणी आणि खप नसल्याचा तो परिणाम आहे आणि अर्थव्यवस्थेच्या सुदृढपणाचे ते लक्षण नव्हे. परंतु आर्थिक व सांख्यिकी बनवाबनवीत वर्तमान सरकारचा हात कुणी धरु शकेल असे वाटत नाही. अर्थव्यवस्थेच्या विकास-वाढीच्या दराबाबत(ग्रोथ) या सरकारने 'एमसीए-21' आकडेवारी आधारभूत मानण्याचे जाहीर करुन देशाचा विकासदर साडेसहा टक्क्यांपर्यंत राहू शकतो आणि भारत ही जगातली वेगवान व सर्वाधिक विकासदर असलेली अर्थव्यवस्था कशी आहे अशा बढाया मारण्यास सुरुवात केली. 'एमसीए-21 डाटा बेस' म्हणजे 'मिनिस्ट्री ऑफ कंपनी अफेयर्स'ची आकडेवारी. दुर्दैवाने 'नॅशनल सँपल सर्व्हे ऑर्गनायझेशन' - 'एनएसएसओ' या सरकारी विभागातर्फेही आर्थिक आढाव्याची प्रक्रिया निरंतर चालू असते. ही देखील सरकारी संस्थाच आहे. त्यांना या 'एमसीए-21' आकडेवारीत काही मूलभूत त्रुटी आढळून आल्या आणि त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार 'एमसीए' आकडेवारीतील 35 टक्के कंपन्या या अस्तित्वातच नसल्याचे त्यांनी आढळून आले. म्हणजे एका सरकारी विभागाने दुसऱ्या सरकारी विभागाचे बिंग फोडले असेच म्हणावे लागेल. थोडक्यात अशा खोट्या व बनावट माहितीच्या आधारे देशाचा विकासदर जगात कसा सर्वाधिक आहे हे दाखविण्याची फसवाफसवी हे सरकार करीत आहे. खोटी माहिती, खोटी आकडेवारी व सर्वच खोटारडेपणाचा खेळ !




वरील फसवेगिरीच्या पार्श्वभूमीवरच पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फिनान्स अँड पॉलिसी'चे संचालक रथिन रॉय यांची सर्वत्र प्रसिध्द झालेली मुलाखत अर्थव्यवस्था कोणत्या धोक्याच्या वळणावर पोहोचली आहे याची जाणीव करुन देणारी आहे. त्यांच्या म्हणण्याचा सारांश हा की भारतीय अर्थव्यवस्था 'मिडल इन्कम ट्रॅप'मध्ये प्रवेश करीत आहे. दक्षिण आफ्रिका व ब्राझील या देशात ही स्थिती आढळून येते. ही स्थिती कशी निर्माण होते? भारतीय अर्थव्यवस्था ही मागणी आणि खपावर(कन्झम्प्शन) मुख्यतः आधारित आहे. अमेरिका, चीन यासारख्या महा-अर्थव्यवस्था या मुख्यतः निर्यात आणि उत्पादनावर आधारित आहेत. 1991च्या आर्थिक सुधारणांनंतर भारतात एक मोठा ग्राहकवर्ग(कन्झ्युमर) तयार झाला. त्या वर्गाला आर्थिक सुधारणांमुळे पैसा मिळाला व त्यातून जो खप व मागणी निर्माण झाली तिचा जोर पंचवीस ते सव्वीस वर्षे टिकला. आता हा जोर थांबून स्थिरावण्याच्या अवस्थेला आला आहे. म्हणजेच मागणी व खप वाढण्याची प्रक्रिया थांबलेली आहे. ही प्रक्रिया पुन्हा तेव्हाच सुरु होईल जेव्हा रोजगार वाढतील, त्यातून नवी मागणी व खपाला चालना देणारा ग्राहकवर्ग तयार होईल व त्यातून पुन्हा अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकेल. परंतु सध्या रोजगाराची स्थिती सर्वांना माहिती आहे. रोजगारनिर्मिती थांबलेली आहे. नोकरी-व्यवसायात असलेल्यांना देखील वेतन व नोकरकपातीच्या तणावाला तोंड

द्यावे लागत आहे. यामुळे बाजार बसलेले आहेत. मागणी व खप नाही, तुटपुंजी गुंतवणूक व मंदावलेली निर्यात याची ही फलनिष्पत्ती आहे. रथिन रॉय यांच्या मते यातून गरीबी आणि गुन्हेगारीमध्ये वाढ होऊ शकते.













तूर्तास अर्थव्यवस्थेशी निगडित काही आकडेवारीही लक्षात घ्यावी लागेल. ही आकडेवारी सरकारी आहे. वर्तमान आकडेवारीनुसार कररुपी महसुलात 1.6 लाख कोटि रुपयांची तूट अपेक्षित असून त्यामुळे वित्तीय किंवा राजकोषीय तूट 3.9 टक्क्यांवर जाणार आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेची आणखी घसरण अपेक्षित आहे. ऑक्सफॅम ग्लोबल इनइक्वॉलिटि रिपोर्ट'(2018) नुसार 2017-18 मध्ये भारतात तयार झालेली संपत्ती अतिश्रीमंत अशा 1 टक्क्यांच्या खिशात गेली. अति-गरीब लोकसंख्यातील केवळ पन्नास टक्के लोकांच्या संपत्तीत केवळ एक टक्क्याने वाढ नोंदली गेली. बाकीचे पन्नास टक्के तसेच वंचित राहिले. 'एनएसएसओ'च्या सरकारतर्फे दाबून टाकण्यात आलेल्या अहवालानुसार बेकारीचा दर 6.1 टक्के(2017) राहिला असून गेल्या 45 वर्षातील हा सर्वाधिक दर आहे. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकनॉमी' संस्थेनुसार 2018 मध्ये 88 लाख महिलांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. ही केवळ महिलांची



आकडेवारी आहे. पुरुषांची वेगळी आहे आणि त्यानुसार या वर्षात 15 ते 29 वयोगटातील पुरुषांमधील बेकारी तिपटीने वाढलेली









आहे. रुपयावर वाढता ताण येत आहे. विशेषतः अमेरिकेच्या दबावामुळे इराणकडून तेल आयात थांबविल्यानंतर अमेरिका आणि सौदी अरेबियाकडून वाढीव तेल आयात करावे लागणार आहे. इराणवरील अमेरिकन निर्बंधांमुळे तेल बाचार तेजीत येणार आहे. त्याचा दबाव रुपया आणि अर्थव्यवस्थेवर राहणार आहे. ताज्या हवामानाच्या अंदाजानुसार मध्य आणि पूर्व भारताला यंदा अवर्षणाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. मध्य भारतात मराठवाडा व विदर्भाचा समावेश होतो.

म्हणजेच याचा अन्नधान्य उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होणार आहे. अर्थव्यवस्थेच्या मुळातीलच हालाखीची 'सुलतानी' आणि वर दुष्काळाची 'आस्मानी' असे गंभीर आर्थिक संकट उभे ठाकण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्या सरकारपुढील आव्हाने अत्यंत गंभीर अशीच असतील. प्रगती व विकासाच्या आधारे मते मागण्याचे ढोंग पुरते फसले आहे. परंतु राष्ट्रवाद, देशभक्ति, सर्जिकल स्ट्राईकच्या बढायांमुळे दुपारी बारा वाजता कुणाचे पोट भरत नसते. लोकांना रोजगार हवा असतो, आर्थिक स्थिरता हवी असते आणि त्यासाठी देशात सामाजिक शांतता व स्थैर्य आवश्यक असते. सतत संघर्षाचे वातावरण ठेवून कोणतीही अर्थव्यवस्था लोकांना आर्थिक न्याय देऊ शकत नाही. गेल्या पाच वर्षात भारतीयांना आर्थिक न्याय मिळणे दूरच वर नोटबंदीसारखे आघात सहन करावे लागले आणि वर त्या आघातांच्या समर्थनाची बळजबरीही सहन करावी लागली आहे. ही बनवाबनवी थांबण्याची गरज निर्माण झाली आहे !

या सरकारने बेकारी तसेच विकासदराबाबतचे सांख्यिकी संस्थांचे अहवाल दाबून ठेवले होते. निवडणुकीच्या ऐन तोंडावर बेकारी व विकासदराची झालेली दैना लोकांसमोर यायला नको या हेतुने ते दडपण्यात आले. आता सरकारस्थापन

झाल्यानंतर कोणतीही लाजलज्जा न बाळगता हे अहवाल जाहीर करण्यात आले. त्यामध्ये बेकारीची टक्केवारी गेल्या 45 वर्षातील सर्वाधिक नोंदली गेल्याचे नमूद करण्यात आले. त्याचप्रमाणे वर उल्लेख केल्याप्रमाणे विकासदरातील घसरणही नोंदविण्यात आली आहे. आता पाच वर्षे कुणी विचारणार नसल्यामुळे बिनधास्तपणे ही आकडेवारी जाहीर करण्यात आली. 'एनएसएसओ'च्या आकडेवारीनुसार गेल्या पाच वर्षातील सर्वात नीचांकी विकास दर नोंदविला गेला आहे. तो केवळ 5.8 टक्के इतका नोंदला गेला आहे. याच्याच बरोबर जागतिक अर्थव्यवस्थेला आलेल्या मंदगतिमुळे निर्यात देखील प्रतिकूल पध्दतीने प्रभावित झाली आहे. त्याचाच एक परिणाम भारतातील रोजगारनिर्मितीवर अत्यंत विपरीत असा झालेला आहे. निर्यातीचे क्षेत्र हे रोजगारनिर्मितीचे एक प्रमुख क्षेत्र मानले जाते.

या सर्व पार्श्वभूमीवर देशातील उद्योगक्षेत्राने सरकारकडे गंभीर चिंता व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. देशातील औद्योगिक उत्पादन घटलेले आहे.(0.1 टक्के) आणि त्याने उचल खाण्याची चिन्हे नजीकच्या भविष्यात दिसत नसल्याचे उद्योगक्षेत्राचे म्हणणे आहे. याचे कारण बाजारात खप व मागणीचा अभाव आहे. त्यामुळे उद्योगक्षेत्राची चिंता पराकोटीला जात आहे. मध्यमवर्गीय खरेदी करीत असलेल्या लहान मोटारी, दुचाकी वाहने यांचे खप कमी झालेले आहेत. साडेचार टक्क्यांनी हा खप शब्दशः कोसळलेला आहे. ही घट तीव्र स्वरुपाची मानली जाते. या पार्श्वभूमीवर सरकार व उद्योगांचे प्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीत कॉर्पोरेट टॅक्स कमी करण्यासाठी दबाव सुरु झालेला आहे.

सध्या भारतात कॉर्पोरेट टॅक्स हा 25 टक्के आहे आणि तो 21 टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची मागणी केली जात आहे. अमेरिका व युरोपात याच पातळीवर हा कर असल्याने भारतानेही आंतरराष्ट्रीय स्तरावर हा कर आणावा अशी सूचना सरकारला करण्यात आलेली आहे. याच्याच जोडीला वैयक्तिक प्राप्तीकराच्या दरांची फेररचना करावी व सवलतीच्या उत्पन्नाची मर्यादा वाढवावी अशा सूचनाही केल्या जात आहेत.

नव्या सरकारने सूत्रे हाती घेतल्याबरोबर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जणू काही या सरकारला एखादी भेटवस्तु द्यावी त्याप्रमाणे भारताला व्यापाराच्या संदर्भात असलेला विशेष दर्जा म्हणजेच त्या अंतर्गत असलेल्या सवलती रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. यामुळे भारताच्या निर्यातीला 54.4 अब्ज डॉलर्सचा फटका बसणार आहे अशी आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये ज्या क्षेत्रांना फटका बसणार आहे त्यामध्ये दागदागिने-जडजवाहीर, शेती उत्पादने, वाहनांचे सुटे भाग, औषधे आणि इतर क्षेत्रांना दणका बसणार आहे. ही सर्व क्षेत्रे रोजगार निर्मितीची क्षमता असलेली आहेत. या फटक्याने रोजगारक्षेत्राचे किती नुकसान होईल याची कल्पनाच केलेली बरी.

सरकारने रोजगारनिर्मितीला चालना देण्याऐवजी बाजारात खप व मागणी निर्माण करण्याच्या हेतुने निरनिराळ्या योजनां अंतर्गत शेतकरी व अन्य वर्गांच्या खात्यात पैसे भरण्याच्या घोषणा केल्या आहेत. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे किंवा ग्रामीण भागातून मागणी निर्माण करण्याचा सरकारचा हेतु असला तरी तो फारसा यशस्वी होताना आढळत नाही. या पार्श्वभूमीवर शहरांची काय अवस्था आहे हे पाहिल्यास परिस्थितीवर प्रकाश पडू शकतो. डॉइश बँकेच्या संशोधन विभागाने भारतीय शहरांमधील राहणीमानाच्या संदर्भात नुकतीच एक पाहणी केली. या पाहणीनुसार मासिक पगार गेल्या पाच वर्षात घटताना दिसतात परंतु त्या तुलनेत खर्चात मात्र वाढ होताना आढळलेली आहे. बंगलुरु, दिल्ली आणि मुंबईत घरभाड्यांमध्ये सतत वाढ होताना आढळली आहे. याचा परिणाम म्हणून लोकांनी बाहेर हॉटेलात जाऊन खाण्यापिण्यावरील खर्च कमी केलेला आढळतो. पगाराच्या संदर्भात दिल्लीचे उदाहरण घेतल्यास पगार हे सरासरी 44730 रुपयांवरुन(2014) 36470 पर्यंत खाली(2019) आले. मुंबईत या पाच वर्षात सरासरी पगार 45780 रुपयांवरुन 41440 रुपयांपर्यंत खाली आहे. परिणामी लोकांना त्यांच्या खर्चात कपात करावी लागलेली आढळते. याचा परिणाम बाजारपेठेतील खप व मागणीवर झालेला आढळतो. ही परिस्थिती दीर्घकाळ टिकल्यानेच अर्थव्यवस्थेला मंदगति आलेली आहे.

अशा रीतीने अनेक क्षेत्रांची आकडेवारी देता येईल. ती अगणित आहे. परंतु या सरकारने किंवा सरकारचे नायकत्व ज्यांच्याकडे आहे त्या नायकांनी अर्थव्यवस्थेच्या पातळीवर ते कोणती ठोस पावले उचलू इच्छितात याची साधी रूपरेषाही सादर केलेली नाही. याउलट आल्याआल्या त्यांनी खैरात करण्याची भूमिका घेऊन पैसे वाटण्याचे निर्णय जाहीर केले. नुसते पैसे वाटून अर्थव्यवस्थेला गति मिळत नसते. वित्तीय तूट ही 3.9 टक्क्यांपर्यंत पोहोचलेली आहे. रिझर्व बँकेकडे असलेल्या राखीव निधीतून सरकारने उचल घेतलेली आहे. हा प्रकार प्रथमच घडत आहे. रिझर्व बँकेकडे 9.6 लाख कोटि रुपयांचा राखीव निधि होता. सरकारने त्यातून 3.6 लाख कोटि रुपये उचलले आहेत. ही निव्वळ दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल आहे. पूर्ण बहुमत मिळाल्याने पुढची पाच वर्षे राजकीयदृष्ट्या चिंता नसल्याची बाब खरी असली तरी आर्थिक आघाडीवर या सरकारची केवळ दमछाक होणार नसून प्रसंगी दम तोडण्याची पाळी देखील येऊ शकते अशा संकटांमध्ये अर्थव्यवस्था गुरफटलेली आहे. त्यातून नोटबंदीसारखी आततायी पावले उचलण्यात आल्यास अर्थव्यवस्थेचे बारा वाजल्याखेरीज राहणार नाहीत ! रात्र वैऱ्याची आहे!!


Nanded City, Pune
The Maximum City
Sinhagad Road, Pune
A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.
आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.
आनंदी संकुल
कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण
• इको पार्क व ऑक्सिझोन
• १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
• १२० एकर्सची हिरवाई
CBSE व ICSE शाळा
विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण
• CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
• दर्जेदार शिक्षण
• वॉक-टू-स्कूल मॉडेल
जिमखाना
तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी
• सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
• २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
• क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
• विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग
नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!
A project by
MAGARPATTA CITY
The pride of Pune
Call: 020-67275300 / 1 / 2
CREDAI PUNE METRO
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.
tempestadvertising.com

# भीती स्वातंत्र्याच्या गळचेपीची

दि. १० जून २०१९ ला आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २० व्या वर्षात प्रवेश करतो आहे. एखाद्या सिनेमातील फ्लॅशबॅकप्रमाणे आज नजरेसमोर येते ती तारीख म्हणजे दि. १० जून १९९९. कार्यकर्त्यांनी ओसंडून वाहणारं शिवाजी पार्कच मैदान आणि पवार साहेबांच्या नावांनी जयघोषाने



दुमदुमलेला संपूर्ण महाराष्ट्र. मी नेहमी विचार करतो जून महिन्यातच इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटना घडत असतात. त्यातली अगदी पूर्वीची तारीख मला आठवते ती म्हणजे २२ जून, १८९७ च्या ब्रिटीशांच्या काळातली. याच दिवशी ब्रिटीशांचे साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी चापेकर बंधूंनी इंग्लिश अधिकारी रँडचा वध करुन हौतात्म्य प्राप्त करुन घेतलं. स्वातंत्र्याच स्फुलींग फुलवलं ते अशा देशभक्तांनी. त्यानंतरचा सगळा इतिहास आणि भारताला मिळालेलं स्वातंत्र्य लोकशाहीची स्थापना आणि स्वतंत्र भारताच्या लोकशाहीत आलेले दुसरं संकट म्हणजे स्वर्गीय इंदीराजी गांधी यांनी जाहिर केलेली आणीबाणी. तारीख होती २५ जून, १९७५. त्यानंतरचा काँग्रेसला लागलेली उतरती कळा. झालेली प्रचंड उलथापालथ आणि २१ व्या शतकात प्रवेश करेपर्यंत मजबूत राहिलेली या देशाच्या लोकशाहीची चौकट.

थोडं आपण आपल्या शेजारी राष्ट्रांकडे बघितलं तर पुन्हा आठवतेय, चीनच्या राजधानी बिजींगमध्ये तिआनान मेन चौकात ४ जून, १९८९ ला लोकशाहीवाद्यांच्या निदर्शनावर करण्यात आलेल्या निष्ठूर कारवाईत १००० हून अधिक नागरिक रणगाड्यांना सामोरे जात मृत्युमुखी पडले. या घटनेला आता ३० वर्षे पूर्ण झाली. जुलमी राजवटीत एवढे प्रचंड नरसंहार होऊन सुद्धा केवळ दहशतीच्या जोरावर या घटनेवर फारशा प्रतिक्रिया येऊ शकल्या नाहीत. पुढे जाऊन २०१२ मध्ये जिनपिंग यांनी हाती सत्ता घेतल्यानंतर नागरिक समुदायाची प्रचंड गळचेपी केली. आज चीन बदलला आहे. तिथे आता तुमच्याजवळ पैसा असेल तर सर्व काही आहे, पण एवढी आर्थिक सुबत्ता येऊन सुद्धा या नरसंहाराबद्दल एक शब्दही कोणी उच्चारु शकत नाही. नुकत्याच झालेल्या देशाच्या निवडणुकीनंतर सर्वसामान्य नागरिक स्वातंत्र्याचे आणि लोकशाही चौकटीचे काय? असाही प्रश्न आपल्यासमोर येऊ शकतो आणि यातून जर बाहेर पडायचे असेल तर नागरिक स्वातंत्र्यावर प्रचंड निष्ठा असणाऱ्या सगळ्यांनी एकत्रितपणे भविष्यात येणाऱ्या कठीण प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी आताच करावी हा आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त संदेश.



## शेवटचे पान



